Regd. NO N. 150

# वऱ्हाडसमाचार.

Berar Samachar.

वर्ष ४७ ] आकोला-- सोमवार तारीख ७ माहे जुलै सन १९१३ इ० [ अंक २६

## वर्गणीचे दर

आकोल्यांतील लोकांस........१ रुपया
बाहेरगांवीं ट हां. ........ २ रुपये
वर्गणी आगाउच घेण्याची वहिवाट ठेविली आहे.

## नोटीशीचे दर

दर ओळीस दीड आणा.
हेडिंगच्या दोन ओळी धरल्या जातील-
नोटीस सुवाच्य असली पाहिजे.
सूचनाः- गुरुवारच्या आंत येणाऱ्या नोटीसा त्याच आठवड्यांत घेतल्या जातील. पाठुदें येणाऱ्या नोटिसास स्पेशल चार्ज पडेल.

### जाहिरात

**मुंबई ब्यांकेची सेव्हिंग ब्यांक.**

ह्या बँकेंत खालीं दिलेल्या अटींवर ठेवी ठेवितां येतात..

कोणत्याही वर्षाचे १ ले जानेवारी आणि ३१ दिसेंबर याच्या दरम्यान एक हजार रुपये पर्यंत पैसा ठेविला जाईल.

ठेवी दोन अथवा अधिक इसमांच्या नांवावर ठेवतां येतील आणि तो पैसा त्यापैकीं एकास अथवा जास्त इसमांस अगर त्यापैकीं मयताचे मागें राहील त्यांस काढतां येईल

व्याज दर साल दर शेंकडा तीन रुपयाप्रमाणें दिलें जाईल. व्याजाची आकारणी प्रत्येक महिन्याची जी कनिष्ठ शिल्लक असेल तिजवर केली जाईल. मात्र पांच हजारावरील शिल्लक रकमेस व्याज नाहीं. नियमांच्या प्रती बँकेंत अर्ज केला असतां मिळतील.

मुंबई ब्यांक } G. A. Phillips.
आकोला ९।९।०९ } एजंट
नं १

## मुंबई बँकचें सोनें.

मुंबई बँकचा छाप असलेल्या उत्तम कसाच्या सोन्याच्या चिपा मुंबई बँकच्या आकोले आणि उमरावती येथील ऑफिसांत विकत मिळतील. गिऱ्हाइकानें जास्त माहिती करितां बँकेंत तपास करावा.

एका चिपचें वजन २६⅔ तोळे [illegible]
साधारण भाव वऱ्हाड [illegible]
व जारभाव [illegible]
[illegible]
[illegible] एजंट

### जाहिरात

सर्वत्र लोकांस जाहीर करण्यांत येते कीं श्रीसमर्थ गजानन आवलीया महाराज संस्थान शेगांव यांचे समाधीचें ( मंदिराचें ) काम बांधण्याचे सुरू आहे यास लागणारा खर्च फार असून तो लोकाश्रयावर अवलंबून आहे. वर्गणीचें काम संस्थानाकडून हरी कुकाजी आणि बंकटलाल भवानीदास व गोपाळ मारुती लउळ व रावजी नारायण महाजन यांस वसूल कर्ते नेमिले गेले आहे. कांहीं लोक हरदास संन्याशी वगैरे हे या मठाचें कामासाठीं वर्गणी वसूल करतात ह्मणून समजतें त्यांस वर्गणी न देतां या वरील ४ इसमासच वर्गणी देत जावी. चार इसमाबद्दल ज्यास संशय येईल त्यांनीं वर्गणी शेगांवकर भिकाजी खंडुजी पाटील यांचे दुकानी मनीआर्डरीनें पाठवावी. व्यवस्थापक

रामचंद्र कृष्णाजी पाटील
नो० नं० ३

## वऱ्हाडांत खात्रीची उत्तम नवीन सोय.

## खरे गारेचे थंडचष्मे

आह्मीं **मुद्दाम** वऱ्हाडच्या लोकाकरितां **डोळे तपासून** सर्व तऱ्हेच्या फ्रेमीसहित **खरे गारेचे थंड चष्मे माफक दरानें** विकण्याचें दुकान काढलें आहे. मुंबई वगैरे मोठ्या ठिकाणच्या भपक्यावर मंडळी कशी फसतात हें सर्वांना श्रुतच आहे सर्व गरजूनी अनुभव घेवून पहावा.

**गोपाळ पांडुरंग आणि कंपनी**
नो० नं० ४ आकोला

**अपूर्व लाभ ! अपूर्व संधी ! ! अपूर्व संधी !!!**

## उत्तम कलप.

—:*-:-*:—

जर तुह्माला तरुण दिसावे अशी इच्छा असेल तर आमचा कलप वापरा. त्या योगें केंस काळे कुळकुळीत होऊन ते पुनः पांढरे होत नाहीत इतकेंच नाहीं तर त्या पासून केंस रेशमासारखें मऊ होतात. पुष्कळ श्रीमंत लोकांनी आमचा कलप वापरून अनुभव पाहिलेला आहे एक पेटी ६ महिने पुरते. त्याच्या उपयोगापुढें किंमत फारच स्वस्त [illegible] ह्मणजे दर पेटीस फक्त [illegible] करण्यात [illegible] आहे.
ट [illegible] निराळे [illegible]
[illegible]
[illegible] मौलाना आशके यानदानी
जनाब हाजी पीर सयद
नूरशाह हामदानी
पोष्ट ३ मुंबई
नो० नं० ५

## अजब करामत.

**बालक्षुधा निवारण-** लहान मुलांस वर दूध घालण्यानें होणारें संग्रहणी, उडतें इत्यादि सर्व विकारावर हें सत्व अप्रतीम गुणकारी आहे. मुलें हैसेनें घेतात. किं० १ तो० ८२ आणे.

**हेमसुधा-** धपणी हा रोग पुष्कळ स्त्रियांना जडतो. यावर खात्रीचा उपाय न मिळाल्यानें कित्येक स्त्रिया कुचमत आहेत. या औषधानें कसलीही धुपणी नाहींशी होऊन अंगांत तरतरी येते. परमा व गरमी यावर ही याचा तात्काल गुण येतो. कित्येकांची खात्री झाली आहे किं० १ बाटलीस ३ रु०

**कामधेनुगुटिका-** अलीकडील निरानिराळ्या परिस्थितीमुळें लेकुरवाळ्या आयांना दूध येत नाहीं. त्यामुळें मुलें अशक्त व रोगी होतात. याचे सेवनानें पुष्कळ निरोगी दूध येते. पुष्कळांना अनुभव आला आहे. किं० ३ गोळ्यास ८६ आणे.

जानकीबाई रानडे } सांगली,
नर्स ॲण्ड मिड्वाईफ. }
नो० नं० ६

## रामबाण उपाय.

### रक्तपिती व कोड

दहाहजार पुड्याफुकट. आह्मीं आमच्या औषधाची खात्री पटावी ह्मणून १०००० नमुन्याच्या पुड्या करण्याचें योजिलें आहे या पुड्या वरील महारोग दुरस्त होण्यासारख्या आहेत. हे त्या निःसंषय सिद्ध करितील. या पुड्या वापरून अनुभव पहावा ह्मणजे खात्री होईल. नमुन्याच्या पुडीची किंमत फक्त ८= ठेविली आहे. ही किंमत फक्त टपाल हशील वगैरे खर्चापुरतीच आहे

२ आह्मीं रक्तपिती, कोड, हे कसे उद्भवतात त्याची शुश्रुषा कशी करावी? वगैरे माहितीचे इंग्रजी व बंगाली भाषेंत पुस्तक तयार केलें आहे तेंही पण गरजूंनीं अवश्य वाचण्या लायक आहे. ह्मणजे त्या पासून त्वचे संबंधीं रोगाची पूर्ण माहिती होईल किंमत फक्त ट. ख. सह ॥=सर्व पत्र व्यवहार इंग्रजींत करावा.

पण्डीत कृपाराम
८ नंदीबागानेलेन पो. सालकिया जि. हावरा.
नो० नं० ७

### शास्त्रोक्त वशीकरणयंत्र

इसे सीधी भुजामें बांधकर जिस किसी स्त्रीपुरूषसे प्रीति करोगे तो वही आपके वशमें होगा दक्षिणा ।॥। पैकींग डा० म० जुदा पत्र हिन्दी इंग्रेजीमें देना. डोडूवाला चमत्कारी कार्यालय जलेसर जिली एटा
नों. नंबर ८

### अनायासें देवदर्शन.

**नोटपेपर्सः-** श्री गजानन, दत्तात्रय, मारुती, शंकर व नरहरी या पैकीं कोणती ही एक मूर्ती रंगांत दाबून उठाव (एम्बास) छापलेले, १०० ग्रेग्रनाईट नोट पेपर्स व त्याच्या बेताची चौकोनी १०० कव्हरें प्रत्येकीं किंमत ८८ व्हीपीनें ८१२ दोन्हीमिळून किंमत रु. १ व्हीपीनें रु. १८६




**सर्वत्र एजंटस् पाहिजेत**

पताः- बेंद्रे आणि कंपनी पुणे सिटी
नो० नं० ९

### हिंदुस्थानावर अरिष्ट.

हिंदुस्थानातील राहिवाशांच्या पाठीस ज्वर व हिंवताप यांचें अरिष्ट सदोदित लागलेलें आहे पण त्याचा प्रतिकार **करण्यास बाट**लीवाला यांचें हिवतापाचें औषध व गोळ्या हे रामबाण आहेत. ताप किंवा शीतज्वर येणारसें वाटतांच हें औषध घ्यावें. किं. १ रु

**बाटलीवाला यांच्या निस्तेज लोकांसाठीं शक्तिकारक गोळ्या**

हें औषध घेतल्यानें भागवटा, मेंदूचे श्रम, पौरुषनाश, अशक्तता व क्षयरोगाचें स्वरूप, त्याप्रमाणें अजीर्ण इ. इ. विकार. तावडतोब दूर होतात. किं रु. १८८

**बाटलीवाला यांचें दंतमंजन.**

हें दंतमंजन मायफळाशीं कांहीं इंग्रजी औषधांचा वैद्यकीय रीतीनें मिलाफ करून बनविलें आहे. किं. ८४

**बाटलीवाल्याचें गजकर्णावर मलम**

यानें गजकर्ण, कुनली [illegible] विकार एका दिवसात नाहींसा होतो. किं. ८४

हीं औषधें सर्व औषधी विकणाऱ्या दुकानावर व डॉ. एच. एल. बाटलीवाला जे. पी. मु वरली लेबोरेटरी दादर, मुंबई यांजकडे मिळतात.
नो० नं० १०

## NOTICE

Notice is hereby given to the public that the Municipal Committee of Ellichpur City, in the Amraoti District, propose to make the following rules for the assessment and collection of scavenging tax, under Section 42 of the Berar Municipal Law, 1886, in supercession of the rules sanctioned under Hyderabad Residency Orders Notification No: 115 and 164 dated 16th June 1887 and 28th June 1897 respectively. Any person objecting to these rules may put in his objection Within 30 days from the date of publication of this notice.

I. For the purpose of these rules buildings and lands shall be divided into two classes:——

Class I—Those to which a private latrine is attached and served through Municipal agency.

Class II—Those to Which no such private latrine is attached.

3. The tax shall be levied at the following rates:——

| | Class I | Class II |
|---|---|---|
| on buildings and lands the estimated annual rental of which is Rs 3/ and below | 0.8.0. | Exempt |
| ...Do...over Rs. 3. but does not exceed Rs. 6. | 2.0.0. | Exempt |
| ...Do....over Rs 6. but does not exceed Rs. 9. | 3.0.0. | 1.0.0. |
| ...Do....over Rs.9 but does not exceed Rs. 15. | 4.8.0. | 1.8.0. |
| ...Do...over Rs. 15. but does not exceed Rs. 24. | 6.0.0. | 2.0.0. |
| ...Do...over Rs. 24. but does not exceed Rs. 48. | 9.0.0. | 3.0.0. |
| ...Do...over Rs. 48. but does not exceed Rs. 60. | 12.0.0. | 4.0.0. |
| ...Do... over Rs. 60. but does not exceed Rs. 96. | 15.0.0. | 5.0.0. |
| ...Do... over Rs. 96. | 18.0.0. | 6.0.0. |

Exceptions ——Buildings Which are solely used as granaries (Malkothas) or shops Which have no privies attached there to Will be cessed at the rate fixed for Class II.

3. The Committee may decline to undertake the cleansing of latrines attached to factories, Workshops, Hospitals, Markets, Government buildings and Offices situated in its limits and the tax on such buildings shall be levied at class II rates. The Committee may under special agreement, in each case, undertake to cleanse the latrines attached to such buildings in which case this tax will not be levied, but a special rate agreed upon between the Municipal Committee and the occupier shall be charged.

4. An occupier of a building or land, who wishes to make his own arrangements for cleansing his private latrine must first obtain the written permission of the Committee to do so. In such cases the tax shall be levied half of the class I rates.

5. Temples, Mosques, churches and other places of public worship shall be exempted from the tax if they fall in class II.

6. Sets of quaretrs or apparments in a building in which one or more latrines are provided for the Common use of the occupants shall be included in class I and the tax shall be recovered from the separate occupants accordin to the rental paid by each. A building includes a house or a block of houses with out-houses and godowns having a common [illegible]rance, and occupied by one family including servants and the tax on such building shall be calculated according to the rental value of the house or a portion of the house occupied by the family

7. The tax shall be payable in advance in quarterly instalments falling due on the 1st April, 1st July, 1st October and 1st January respectively.

Buildings or lands which are occupied for any portion of a quarter shall be charged the full rates of the entire quarter. If they remain unoccupied for the entir quarter, no tax shall be levied.

9. Occupants desiring to have their latrines cleansed both in morning and evening shall be charged eight annas for the quarter in addition to the ordinary tax.

10. The valuation and assessment of buildings and lands shall be made once a year by the Committee or such members as the Committee may appoint in that behalt and shall in the latter case be subject to the confirmation of the Committee.

Ellichpur Gity, June 1913. — K. V. Mhaskar. Secretary City Municipality. Ellichpur.

No. N. 15

## पत्र व्यवहार

### महिला समाज यवतमाळ

यवतमाळ ( वऱ्हाडप्रांत ) येथील महिलासमाजानें येत्या आक्टोबर महिन्यामध्यें **स्त्रियांच्या कलाकौशल्याचें प्रदर्शन** किंवा **फॅन्सी फेअर** भरविण्याचें ठरविलें आहे. समाजाच्या सुदैवानें आपल्या प्रांताचे अधिपती मेहेरबान कमिशनरसाहेब यांच्या पत्नी मिसेस स्टँडन यांनीं हें प्रदर्शन आक्टोबर ता० ४ रोजीं उघडण्याचें कबूल केलें आहे. महिलासमाजानें आजपर्यंत तेरा वर्षांमध्यें कोणती कामगिरी केली आहे व हल्लींहा काय करीत आहे हें आपल्याला साधारणपणें महीत असेलच. तरीही थोडक्यांत या समाजाच्या हल्लींच्या कामाचें स्वरूप सांगितल्यास वावगें होणार नाहीं असें वाटतें.

या समाजामध्यें दर बुधवारीं व शनिवारीं स्त्रिया जमून उपयुक्त पुस्तकांतील व वर्तमानपत्रांतील निवडक उतारे वाचतात व शिवणकाम करीत असतात. या समाजानें प्रौढ वयाच्या स्त्रियांकरितां मराठी व इंग्रजी शिकविण्याचा वर्ग काढला असून त्यावर एक पगारी मास्तरीण ठेविली आहे. हा वर्ग रोज भरत असतो. या समाजामध्यें दर महिन्याला सुशिक्षीत स्त्रीपुरुषांकडून उपयुक्त विषयांवर व्याख्यानें दिलीं जातात. शिवाय निरनिराळ्या सार्वजनिक प्रसंगीं स्त्रियांना सार्वजनिक प्रश्नांची माहिती व्हावी व तशा कामाचें वळण लागावें या हेतुनें स्त्रियांच्या जाहीरसभा होत असतात. पुण्याच्या सुप्रसिद्ध श्रीमती रमाबाई रानडे, तसेंच उमरावतीच्या विलायतेस जाऊन मोठी डाक्टरीची पदवी मिळवून आलेल्या कुमारी नागूताई जोशी यांना मानपत्रें देण्यासाठीं स्त्रियांच्या सभा भरल्या होत्या. त्या प्रसंगीं सुमारें ३०० स्त्रिया हजर होत्या.

समाजाच्या कामाची मर्यादा उत्तरोत्तर वाढत चालल्यामुळें त्याला स्वतंत्र जागेची व इमारतीची अत्यंत अवश्यकता भासूं लागली आहे. ही उणीव दूर करण्यास बरेंच द्रव्यसाहाय्य जरूर आहे. यासंबंधानें मिसेस स्टँडन यांची इतकी सहानुभूति आहे कीं, त्या आपल्या पत्रामध्यें ह्मणतात:- "मी प्रदर्शन उघडण्यासाठीं यवतमाळला येईन त्याच वेळां तुमच्या महिलासमाजाच्या इमारतीच्या पायाचा दगड बसविता आला तर माझ्या आनंदांत विशेष भर पडणार आहे.", स्त्रियांच्या कलाकौशल्याचें प्रदर्शन भरविल्यानें थोडेंबहुत द्रव्यसाहाय्य होऊन शिवाय अशा प्रकारच्या कामाचा स्त्रियांमध्यें अधिक प्रसार होईल अशी उमेद वाटत आहे.

या प्रदर्शनामध्यें सर्व तऱ्हेचें शिवणकाम, रेशमी काम, लेंकरीचें काम, जरीचें व कलाबतुचें काम, पोलकें, झबलीं, टोप्या, रुमाल, कुशन्स, नेक्टॉय, टेबलक्लॉथ, लहान मुलांचीं खेळणीं वगैरे कामें ठेवण्यांत येतील. शिवाय इतर कोणत्याही प्रकारच्या योग्य अशा जिनसा आल्यास त्यांचाही समावेश करण्यांत येईल.

महिलासमाजासारख्या स्त्रियोन्नतीच्या कामीं मनःपूर्वक झटणाऱ्या संस्थेला या प्रदर्शनामार्फत मदत करण्याची ज्या स्त्रीपुरुषांची इच्छा असेल त्यांनीं खालील प्रकारांनीं मदत करावी अशी त्यांना नम्रपूर्वक विनंति आहे.

(१) द्रव्यसाहाय्य करणें व मित्रमंडळीकडून अशा तऱ्हेची मदत मिळवून देणें.

(२) स्वतःमाल तयार करून ( व इतरांकडून माल मिळवून ) तो महिलासमाजाला धर्मार्थ ह्मणून पाठविणें.

(३) याप्रमाणें माल धर्मार्थ पाठवितां येत नसल्यास तो विक्रीकरितां पाठविणें.

पहिल्या व दुसऱ्या प्रकारानें साहाय्य झाल्यास त्याचा समाजाला विशेष उपयोग होणार आहे हें उघड आहे. माल सप्टेंबर ता. १९ पर्यंत पाठवावा. माल पाठविला जाईल त्याचा येण्याजाण्याचा खर्च मालकावर राहील मालकानें मालावर नफा मुळींच किंवा फारसा न घेतां आपली किंमत लिहावी. या किंमतीपेक्षां अधिक किंमतीला माल विकला गेल्यास तेवढा तो अधिक भाग समाजाकडे जाईल व मालकाची किंमत मालकाकडे पाठविण्यांत येईल. मालकानें लाविलेल्या किंमतीसच जर माल विकला गेला तर त्यापैकीं एकचतुर्थांशभाग समाजाकडे घेण्यांत येईल. व बाकीचा मालकाकडे पाठविण्यांत येईल.

पुण्याला गेल्या वर्षीं जें मोठें प्रदर्शन झालें त्यावरून अशा कामाच्या अवश्यकतेची व उपयुक्ततेची लोकांना चांगली कल्पना झाली आहे. स्त्रीशिक्षणाचें पाऊल पुढें पडावें व आपल्या स्त्रीसमाजामध्यें कलाकौशल्यासारख्या उद्योगाचा प्रसार व्हावा यासंबंधानें हल्लीं मतभेद ह्मणून राहिला नाहीं. तेव्हां महिलासमाजानें [illegible] व नेटानें चालविलेल्या [illegible] कार्यास सर्व बंधुभगिनी हातभार लावून तें यशस्वी करतील अशी महिलासमाजाला बळकट आशा आहे. ही आशा निराधार न ठरो व स्त्रियोन्नतीच्या कार्यीं महिलासमाजाचे हातून उत्तरोत्तर अधिक सेवा घडो हीच परमेश्वरापाशीं प्रार्थना आहे. कळावें लोभ असावा हे विनंति.

**सीताबाई लांडगे.**
सेक्रेटरी, फॅन्सी फेअर कमिटी,
यवतमाळ.

वऱ्हाडसमाचार

आषाढ शुद्ध ४ शके १८३५ प्रमादी

## ज्ञानाचा प्रकाश.

पुण्याचें 'ज्ञानप्रकाश' पत्र दिवसेंदिवस अधोगतीला चाललेलें पाहून कोणाही महाराष्ट्रीयास अत्यंत दुःख झाल्यावांचून राहणार नाहीं. हें पत्र आज ६६ वर्षें अनेक विद्वान् व लेखनकुशल संपादकांच्या हातून महाराष्ट्राची उत्तम प्रकारें सेवा करवीत ज्ञानप्रसाराचें महत्कार्य करीत आलें आहे. पण अलीकडे त्याला वाईकर भटजींपेक्षां अधिक योग्यतेचें संपादक मिळत नसल्यानें कोलफील्डस ह्मणजे कोळशाचीं शेतें, डॉगकार्ट ह्मणजे कुत्र्याची गाडी, पाणी हा पदार्थ दोन भाग आक्सिजन व एक भाग हायड्रोजन वायु मिळून झाला आहे, अशा प्रकारची अपूर्व माहिती या पत्रांतून वरचेवर येत असते. ता. २६ जूनच्या अंकांतली पुढील बातमी वाचून तर वाचकांची खरोखर मोठीच करमणूक होईल. सदर पत्रांत ह्मटलें आहे 'नागपूर येथील गंगेच्या कांठच्या दहनभूमींत हिंदूंचीं प्रेतें नेऊन पोंचविण्याकरितां लखनौ येथें एक कंपनी निघाली आहे' इ० नागपूर कोठें आहे, तेथें गंगानदी कोठून आली, व तेथील प्रेतांना पोंचविणारी कंपनी लखनौ येथें कशी स्थापन झाली वगैरे प्रश्न सदर प्रतिभावान लेखकाच्या मेंदुला यत्किंचितही शिवले नाहींत. हें आश्चर्य आहे. वरील गमतीची बातमी वाचून पुष्कळांना रा. खरे यांच्या गुणोत्कर्ष नाटकांतला कर्नाटकांतल्या खाडींतला लाहोरचा किल्ला घेतल्याची बातमी सांगणारा विदुषक 'ज्ञानप्रकाश'च्या विद्यमान संपादकाच्या अंगांत संचरला कीं काय असा भास झाल्यावांचून खात्रीनें राहणार नाहीं. हल्लीं 'ज्ञानप्रकाश' पत्र सर्व्हंटस् ऑफ इंडिया सारख्या संस्थेच्या स्वाधीन असतां अशी स्थिती कां व्हावी तें कळत नाहीं. ना. गोखले यांच्या अस्थानीं विश्वासाचा तर हा परिणाम नसेलना?

## बंगाल्यातला कायमचा बंदोबस्त.

हिंदुस्थानातल्या निरनिराळ्या प्रांतांतून जमीन महसुलाच्या बंदोबस्ताचे निरनिराळे प्रकार आहेत, व ते तसे होण्यास निरनिराळ्या प्रकारचीं कारणें ही झालीं आहेत. ह्मणून त्या निरनिराळ्या प्रकारांच्या उपयुक्ततेचा विचार केवळ प्रस्तुतच्या युक्तिवादानें करून चालावयाचें नाहीं, त्याचें ऐतिहासिक दृष्टीनेंच परीक्षण केलें पाहिजे. तें न करतां बंगालच्या कायमधाऱ्याच्या बंदोबस्ताला नांवें ठेविल्या बद्दल मि. रॅमसे मॅकडोनल्ड यांचेवर आमचे बंगाली बंधु घुस्सा भरले आहेत. आहेत तें योग्यच आहे. बंगाल्यांत ही पद्धत सुमारें एक शतकापूर्वीं लॉर्ड कॉर्नवालिस गव्हर्नरजनरल यांनीं सुरू केली. त्यावेळचीं त्यांचीं कारणें त्यांनीं एका ठिकाणीं नमूद करून ठेविलीं

आहेत तीं विचार करण्यासारखी आहेत. त्यांत त्यांनीं म्हटलें आहे कीं एखादा देश परक्या सत्तेखालीं आला म्हणजे तेथील लोकांची भक्ति नव्या सत्तेवर जडविण्याचा उत्तम उपाय तेथल्या लोकांची स्वार्थ बुद्धि सदर सत्तेनें आपल्याशीं पूर्णपणें निगडित करून घेणें हाच असतो. आपल्या स्वार्थाच्या आड परकी सत्ता येत नाहीं हें एकदां सामान्य लोकांना कळून चुकलें कीं ते सहसा राज्यक्रांतीची इच्छा करीत नाहींत. परकी सत्ता हीच हळू हळू त्यांना स्वकीय वाटूं लागून ते तिच्या विषयीं एकनिष्ठ होतात. बंगाली लोकांची भक्ति ब्रीटिश सत्तेनें आकर्षून घेण्याचा जो हा उत्तम उपाय तो लॉर्ड कॉर्नवालिस यांनी कायमधाऱ्याच्या पद्धतीच्या रूपानें अजमावून पाहिला, आणि तो पूर्णपणें यशस्वी ठरला. आतां त्या उपायांत बदल करणें म्हणजे लोकांच्या मनातला श्रद्धेचा पाया डळमळीत करण्या सारखें मूर्खपणाचें होईल. बंगाल मध्यें अजून थोडी अस्वस्थता आहे अशावेळीं तरी कायमधाऱ्या विषयीं असंमतिप्रदर्शक उद्गार काढणें, किंवा ती पद्धति मोडून दुसरी एखादी अस्थिर पद्धति सुरू करण्यास सुचविणें अप्रयोजक पणाचें होईल. मि. रॅमसे मॅकडोनल्ड हे श्रमकरी [लेबर] पक्षाचे असल्यामुळें बंगाल्यांत कायमधाऱ्यामुळें जमीदारांचें माजलेलें प्रस्थ त्याच्यानें पहवत नाहीं व ते त्यांना सामान्य प्रतींच्या लोकांच्या दर्जाला मिळवूं पाहतात; पण हा प्रयत्न इतिहासदृष्ट्या अत्यंत घातुक आणि ब्रिटिश राज्याच्या अहिताचा आहे हें त्यांना उघडपणें सांगणें भाग आहे.

## इराणचें कर्ज

राण देशाला तूर्त बंदोबस्तासाठीं अधिक सैन्य ठेवण्याची व व्यापारवृद्धीसाठीं रेल्वे वगैरे बांधण्याची अत्यंत अवश्यकता आहे, आणि या दोन्ही गोष्टी द्रव्याधीन असल्यामुळें त्यासाठीं कर्ज काढण्यासही तेथील सरकार तयार आहे. हें कर्ज देण्यानें आपणास स्वतःचा कांहीं फायदा सहज करून घेतां येईल या आशेनें युरोपांतलीं पुष्कळ राष्ट्रें हें कर्ज देण्यास तयार आहेत. त्या प्रमाणें ब्रिटिश सरकारनेंही इराणचे सावकार बनविण्याची महत्वाकांक्षा धरणें मानवी स्वभावास अनुसरूनच आहे. पण ब्रिटिश सरकार ह्या कर्जाच्या रकमेपैकीं १.५ लक्ष रु० हिंदुस्थानसरकारपाशीं मागत आहे तें कशासाठीं हें आह्मांस कळत नाहीं. हिंदुस्थानचा इराणाशी काय संबंध आहे! त्या देशापासून हिंदुस्थानाला काय लाभ होणार आहे! इराणासाठीं हिंदुस्थानावर जो सैन्याचा ज्यादा खर्च लादण्यांत आला आहे तोच अगोदर अन्यायाचा आहे अशी ओरड आहे. त्यांत या कर्जाच्या रकमे बद्दल ब्रिटिशसरकारनें हिंदुस्थानसरकारला भीड घालून तो अन्यायाचा भार अधिक जड करावा हें आह्मांस प्रशस्त वाटत नाहीं. इराणांत राशियाचें प्रस्थ जड होऊं नये ह्मणून ब्रिटिश सरकारनें ज्या राजनीतीचा अवलंब केला आहे तो हिंदुस्थानाला पसंत होण्यासरखा नाहीं. ब्रिटिश व रशियन राजनीतीचें हें डावपेंच इराणच्या अधःपाताला कारण होतील कीं काय अशा सकारणाह्मणा, अकारणह्मणा, त्याला भीती वाटत आहे. अशावेळीं त्या देशाच्या अधःपाताला कारण होण्याचें पाप माथी घेण्यास भारतवर्ष कधीं तयार होणार नाहीं. ब्रिटिशसरकारनें स्वतःच्या तिजोरींतून हवें तवढें कर्ज इराणला द्यावे, भारतवर्ष त्याच्या आड येत नाहीं. पण आपले हात त्या कर्मानें मळिण होऊं नयेत येवढीच हिंदुस्थानची इच्छा आहे.

## नाटकांचा नाद

आमच्या सुशीक्षितांमध्यें अलीकडे नाटकाचा नाद लागलेला विशेष दृष्टीस पडूं लागला आहे. आमच्यांतले रा. हरिभाऊ आपटे, रा. खाडिलकर, कोल्हटकर, केळकर वगैरे चांगले चांगले लेखक आपलें लेखनकौशल्य तत्वज्ञान, इतिहास, चरित्रें, चिंतनपर निबंध, धर्म, सुधारणा इ० विषयांवर न अजमावून पाहतां आपल्या बुद्धीच्या टांकसाळींतून भराभर नाटकें बाहेर टाकीत आहेत. पुणें, मुंबईकडे कॉलेजांतल्या विद्यार्थ्यांमध्यें तर हा नाद इतका सार्वत्रिक झाला आहे कीं आपल्या गरीब आईबापांनीं खर्चण्यासाठीं पाठविलेल्या रकमेंतून हा विद्यार्थीगण किर्लोसकरासारख्या नाटककंपन्यांची संभावना करण्यांत स्वतःला धन्य मानून घेत असतो. नाटक कलेला मिळत असलेलें उत्तेजन तिच्या योग्यतेपेक्षां पुष्कळच अधिक आहे. ती कला उत्तम खरी, पण तिचें कार्यकरत्व अल्प आहे. तिचें ध्येय मोठें असेल, पण तिची उपयुक्तता अत्यंत परिमित आहे हें विसरतां कामा नये. सुशिक्षितांनीं तिचे फाजिल गुणानुवाद गाऊन तिला नसतें महत्व दिलें आहे, आणि सध्या विद्यार्थिवर्गाला वशिक्षित वर्गाला लागलेला नाटकाचा छंद हा त्याचाच परिणाम आहे. इतके दिवस ब्रह्मी लोक सर्वांत नाटकाचे अत्यंत नादी असा समज होता. त्यांच्यांत मुलाच्या नामकरणाचे वेळीं, त्याच्या व्रतबंधाचे वेळीं, विवाह वगैरे मंगल प्रसंगीं सुखवस्तु लोकांनीं आपपल्या घरीं नाटकें करविण्याचा प्रघात आहे. मंगलप्रसगाला कदाचित् नाटकें समयोचित मानतां येतील. पण अशौच, प्रेतवहन, अग्निक्रिया, वगैरे अशुभ प्रसंगीं हा नाटकाचा अभिनय प्रयोग करण्यांत आनंद मानणें ह्मणजे अप्रयोजकतेची परिसिमा ह्मटली पाहिजे. आमच्या सुशिक्षितांना लागलेली नाटकांची ही चटक इतक्या मर्यादेला अद्याप गेली नसली तरी विद्यार्थ्यांनीं आपला विद्यार्जनाचा अमोलिक काळ नाटक पहाण्यांत व नाटक करण्यांची संभावना करण्यांत घालविण्याची वेळ येणें हें लक्षण कोणत्याही प्रकारें अभिनंदनीय नाहीं हे कबूल केलें पाहिजे. अलीकडे पुण्याच्या पत्रांतून नामांकित सुशिक्षित लेखकांनीं लिहिलेल्या नाटकग्रंथावर जी टीका येत असते तिजवरून आमची नैतिक परागति ऊर्फ पीछेहाट करण्यांत नाटकांची केवढी मदत होत आहे हें उत्तम प्रकारें दिसून येतें. नाट्यकलेसासन अशा प्रकारें समाजहानि व्हावयाची असेल तर अशा लोपासून समाज जितका लवकर पराङ्मुख होईल तितकें इष्ट नाहीं काय?

## अपघात.

गेल्या महिनादीड महिन्यांत अतिवृष्टि व आगगाडीचे अपघात यामुळें जी प्राणाची हानि झाली ती कांहीं अपूर्व यांत शंका नाहीं. पालिठाणा व भावनगर येथल्याप्रमाणेंच बंगाल इलाख्यांतही कांहीं ठिकाणीं अतिवृष्टि झाली; खुद्द कलकत्ता शहरांत मोठाल्या राजमार्गांतून कमरे इतक्या पाण्यांतून लोकांना जावें यावें लागलें! शेंकडों घरें पडलीं, पण सुदैवानें विशेषशी प्राणहानि झाली नाहीं. पण गेल्या आठवड्यांत ई. आय. रेल्वेवर जे दोन तीन अपघात झाले ते फार भयंकर होते. तिन्ही ठिकाणीं नद्यांना महापूर येऊन ऐन प्यासेंजर गाडी येण्याचे वेळीं पूल वाहून गेले व त्यामुळें एका गाडीचे इंजन व उतारूंचे पुष्कळसे डबे दींत गडप झाले. दुसऱ्या एका पुलावर ही असाच प्रकार पण अल्प प्रमाणावर घडला. जवळ जवळच्या दोन ठिकाणीं असे प्रकार घडल्यामुळें जवळून मदत येणें ही शक्य नव्हतें. अशा स्थितींत मानवी प्रयत्नाला जेवढ्या गोष्टी करणें शक्य होतें तेवढें करून संकटांत सांपडलेल्यांना मदत करण्यांत आली. तरी सुमारें दोनशें प्राणांची हानि झाली असावी असा अंदाज आहे. पूल पडलेला, नदीचा प्रवाह झपाट्यानें धोधो वाहत आहे, अशावेळीं स्वतःच्या जिवाकडे न पाहतां संकटांत सांपडलेल्यांच्या मदतीला धावून येणारीं थोडीं तरी माणसें पुढें आलीं हेंच आश्चर्य आहे!

## तुर्कस्थानची दुर्दशा.

'छिद्रेष्वनर्था बहुलीभवन्ति' असें संस्कृत भर्षेत एक वचन आहे त्याची मूर्तिमंत सत्यता तुर्कस्थानचें ठायीं सध्यां दिसत आहे. बाल्कन संस्थानांशीं झालेल्या लढाईंत तुर्कस्थानची उडालेली फजीति व त्यामुळें तुर्की सत्तेचा झालेला नाश ह्या दोनच गोष्टी त्या देशाच्या प्राचीन वैभवावर काजळ फासण्यास पुरेशा होत्या. पण तुर्कस्थानची ग्रहदशा येवढ्यावरच थांबली नाहीं. सत्ताधिकाऱ्यांत झालेली क्रांति, सेवकत पादशहाचा खून, संशयी अपराध्यांस पकडून फाशीं देणें, व त्यापासून लोकांत फैलावलेला जबर असंतोष इ० गोष्टींमुळें तुर्कस्थानला शांतता सुखाचा लेशही मिळणें अशक्य झालें आहे. राजसत्तेंत कोणाचा पायपोस कोणाच्या पायांत नाहीं, गुतकट व मसलती यांचें जाळें पसरलेलें व खजीना रिकामा झालेला, अशा स्थितींत राज्याचा गाडा कसा चालवयाचा? कर्ज काढावें तर तें कोण देणार? कर्जाला तारण काय लावावयाचें? परकीय राष्ट्रांपासून कर्ज घेण्याचा अनुभव इजिप्त व ईराण यांना आहेच. अर्थात जमिनीवरची सत्ता विकून पैसे उभे करण्याचा जो क्रम तुर्कस्थानच्या प्रधानमंडळानें सुरू केला आहे तो अपरिहार्य आहे युरोपांतली तुर्कस्थानची सत्ता अस्तंगत झालीच आहे. आतां एशिया खंडांत तरी तुर्की सत्तेला अब्रू संभाळून राहतां आलें तर भाग्य ह्मटलें पाहिजे.

## मुसलमानांचें शिक्षण.

असें समजतें कीं हिंदुस्थान सरकारनें सगळ्या प्रांतिक सरकाराकडे एक सर्क्युलर याविषयासंबंधानें पाठविलें आहे व त्यांत अशी इच्छा प्रदर्शित केली आहे की दरेक प्रांतांत मुसलमान धर्माच्या मुलांच्या शिक्षणासाठीं स्वतत्र शाळा उघडण्यांत याव्या, व त्यांत कुराणही शिकविण्यांत यावें. मुसलमान समाजासंबंधी धडे असलेलीं पुस्तकें मुसलमान शिक्षकांकडून मुसलमान इन्स्पेक्टरांच्या देखरेखीखालीं शिकविण्यांत यावीं, गरीब मुसलमान विद्यार्थ्यांना जरूर पडल्यास शिष्यवृत्ति देण्यांत याव्या. शाळांच्या व्यवस्थापक कामिटींत मसलमान गृहस्थांची मोठी संख्या असावी, व वार्षिक रिपोर्टींत मुसलमानांच्या शिक्षण प्रगती संबंधानें विस्तार पूर्वक विवेचन असावें. फार उत्तम! मुसलमानांच्या शिक्षणाकडे सरकारचें इतकें लक्ष लागलें आहे ही अभिनंदनीय गोष्ट आहे. दुसऱ्याही एका दृष्टीनें हिंदु समाजानें या गोष्टीबद्दल आनंद मानिला पाहिजे. मुसलमानी शाळेंत कुराण शिकविण्याविषयींची जशी सरकारनें आज्ञा केली आहे तशी हिंदु मुलांच्या शाळेंत वेदांचें अध्यापन करविण्यांत असाही हुकुम पुढें मागें सरकार करील हें संभवनीय आहे.

## हिंदूंची शस्त्रचिकित्सा.

हिंदु वैद्यकाची माहती शब्दांनीं व्यक्त करण्याचें कारण नाहीं, अनुभवानेंच ती प्रत्यक्ष जाणतां येते. पण पूर्वींच्या काळीं शस्त्रक्रियेची प्रगति हिंदु लोकांत किती होती हें कळण्याचें साधन दुर्लभ झालें आहे. त्यांच्यात शस्त्रक्रिया होती यांत शंका नाहीं. कारण गोस्तन देवी सारख्या देवी काढण्याची पद्धति यांच्या ग्रंथांतून वर्णिली आहे. त्याचप्रमाणें मनुष्याच्या शरीराच्या व्यवच्छेदनाचीं कित्येक शस्त्रेंही त्यांच्या ग्रंथांतू सांगितलीं आहेत. हीं शस्त्रें कशा प्रकारचीं होतीं व त्यांच्यांत आणि हल्लींच्या पाश्चात्य शस्त्रांत अधिक फायदेशीर कोणतीं वगैरे तुलनात्मक ज्ञान होण्यास पूर्वींच्या शस्त्रक्रियेविषयींचा शोध करणारीं माणसें पुढें आलीं पाहिजेत. आह्मांस कळविण्यास संतोष वाटतो कीं अशा प्रकारचा कोणी महाराष्ट्रीय विद्वान जरी या कार्यास प्रवृत्त झाला नाहीं, तरी प्रो. नियोगी यांच्या सारख्या तरुण बंगाली विद्वानानें ही उणीव भरून काढण्याचें मनावर घेतलें आहे. पूर्वींचीं शस्त्रक्रिया ज्या उपकरणांनीं चालत असे तीं कशीं असत त्यांचीं चित्रें काढणें तीं कोणत्या धातूचीं असत व त्यांचे गुणधर्म कोणते होते इ. गोष्टींचा शोध लावणें व नमुन्यासाठीं तशीं शस्त्रें एक दोन तयार करणें या कामासाठीं त्याच आग्रहावरून बंगीय साहित्य परिषदेनें आयुर्वेदी धन्वंतरी, पाश्चात्य वैद्यकांतले निष्णात डाक्तर व शास्त्रीय विषयांचे प्रोफेसर यांची एक कमिटी नेमिली असून तिच्या खर्चासाठीं दोन हजार रुपयांचा फंडही जमविण्याची तजवीज केली आहे.

यथाशक्ति साह्य
R. N. Trivedi
Senior Sub Judge
तर्फेनें
N. 18 Akola

वैद्यकावर दरमहा हजारों रुपये कमावणाऱ्या डाक्तरांचें कर्तव्य नाहीं काय? या लोकांनीं अशा सत्कार्यास मदत करण्यासाठीं धावून जावयास पाहिजे. या कामीं महाराष्ट्र-साहित्य परीषद नागरी, प्रचारणी, सभा कन्नडपरीषद, आंध्रपरीषद व इतर शास्त्रीय आणि साहित्य विषयक परीषदा यांनीं विद्वान लोकांची उभारणी केली असतां फार उपयुक्त कार्य सहज होणार आहे.

## सर गाय फ्री. विल्सन.

हिंदुस्थानचे माजी फडणीस सर गाय फ्री. विल्सन यांच्यासारखे थोर व उदार मनाचे, कर्तव्य परायण, आणि समदर्शी अधिकारी हिंदुस्थानला अधिकाधिक लाभतील तर येथील राज्यकारभारांतल्या अर्ध्या अधिक विषमतेचा तावडतोब निकाल लागेल. हिंदुस्थानांत इंग्रजासारख्या मूठभर लोकांनीं राज्य मिळविणें ही अपूर्व व कल्पनातीत गोष्ट आठराव्या व एकोणिसाव्या शतकाचा विजय ह्मणून मांडली तर या पेक्षा ही अपूर्व विजय हें विसावें शतक करून दाखवील यांत शंका नाहीं. मात्र तें घडून येण्यास सर गाय फ्री. विल्सनसारखे अधिकारी उच्च पदारूढ असावयास पाहिजेत. एकोणिसाव्या शतकांतले ब्रिटिशराज्य स्थापनेसारखे चमत्कार वर्णितांना त्यांनीं त्या गोष्टीचें श्रेय एकट्या इंग्रजांनाच दिलें नाहीं, तर ब्रिटिश राज्याचा पाया दृढ करण्यास साह्यभूत झालेल्या इतर कित्येक महत्वाच्या गोष्टी ह्मणजे शिक्षण, धर्मसुधारणा, समाजसुधारणा इ० चळवळी निर्माण करून आपलीं चिरकाल स्मारकें करून ठेवणाऱ्या राजाराम मोहनराय, सर सय्यद अहमद व रानडे यांच्या नावांचा ही उल्लेख मोठ्या आदरानें व अभिमानानें केला. पुष्कळ इंग्रज लेखक व वक्ते इंग्रजी राज्याची महती व इंग्रजाचें कर्तृत्त्व याचें स्तुतिस्तोत्र गाण्याच्या भरात हिंदी लोकाना त्या श्रेयाचा योग्य वाटा देण्यास विसरतात. पण तशी चूक सर गा. विल्सन यांनीं केव्हांही केली नाहीं. त्याच्या मनाच्या थोरपणाचें आणि समतेचें आणखी उदाहरण कोणतें पाहिजे?

## सरकार व सुशिक्षित लोक.

सुशिक्षित लोक हे हिंदुस्थानचे खरे हितकर्ते किंवा हितचिंतक नव्हेत, तर अधिकारी वर्ग हा हिंदी समाजाचा खरा माहितगार, व खरा मित्र होय अशा प्रकारचे उद्गार कायदे कौंसिलमध्यें व मेजवानीच्या प्रसंगीं भाषणें करतांना काढलेले कोणी ऐकलें नाहींत? तसेंच हिंदुस्थानांत अशांतता उत्पन्न करणारा खरा बदमाष जर कोणी असेल तर तो सुशिक्षित वर्ग, त्याला चांगला ठेचला पाहिजे तरच या असंतोषाचें निर्मूलन होईल अशी सल्ला ही पायोनियर, इंग्लिशमन प्रभृति आंग्लोइंडियन पत्रांतून वेळोवेळीं देण्यांत येत असते. पण याचा परिणाम ह्मणजे असंतोष उलट वाढतो असा झालेला आहे हें आपण पाहतों. सर [illegible]फ्री. विल्सन यानीं या असंतोषाची [illegible] तो निर्मूळ करण्या[illegible] आणि

२० नोटीसींत [illegible]

डागिन्यांची अफरातफरी केल्यास

ते ह्मणतात कीं 'सुशिक्षितांवर विश्वास टाका. व त्यांना प्रेमानें जवळ करा, ह्मणजे ब्रिटिशराज्याच्या रक्षणार्थ वाटेल तो स्वार्थत्याग करण्यास हिंदुस्थानचें सुशिक्षित तयार होतील. मला वाटतें सुशिक्षितांवर अशा प्रकारें विश्वास टाकण्याचा काळ येऊन ठेपला आहे. राज्यकारभाराच्या जबाबदारीचा वाटा पूर्वीं पेक्षां अधिक मोठ्या प्रमाणांत त्यांना देण्याची व हा तुह्मी उचला असें त्याना मोकळ्या मनानें सांगण्याची अत्यंत जरूरी आहे. आपल्या राज्याचें ध्येय काय आहे हें लोकांना समजावून सांगण्याचा अधिकार खरोखर या सुशिक्षित वर्गाचा आहे आणि हिंदुस्थानांत जसजसा शिक्षणाचा प्रसार सामान्य जनतेंत होत जाईल, तसतसें हें ध्येय सहानुभूतिपूर्वक आणि राजनिष्ठायुक्त रीतीनें लोकांना समजावून देण्याची अवश्यकता अधिकाधिक वाटेल'. किती शहाणपणाचे उद्गार हे! राज्यकारभाराविषयींच्या जबाबदारी विषयीं ज्यांना पूर्ण ओळख पटली आहे अशा मोर्ले साहेबासारख्या उच्च पदस्थ मुत्सद्यांना सर गा. फ्री. विल्सन साहेबांचे हे अमृतमय उद्गार पूर्णपणें पटतील. पण वर पासून खाल पर्यंत सगळ्या अधिकाऱ्यांच्या हृत्पटलावर या उद्गारांचें महत्त्व बिंबेल तो दिवस हिंदुस्थानच्या इतिहासांत सुवर्णांकित अक्षरानीं लिहून ठेवण्यास पात्र ह्मटला जाईल. सुशिक्षित हिंदी लोकांच्या वर्तानें येवढी योग्य प्रकारची तरफदारी येवढ्या उच्च पदस्थ अधिकाऱ्याकडून आजपर्यंत केव्हांही केली गेली नव्हती. सर गा. विल्सन साहेब यानीं प्रथमतः सुशिक्षितांची खरी योग्यता सरकारचे नजरेस आणून दिली आहे व फार सुंदर राजनीतिसूत्राचें प्रवचन केलें आहे, आणि त्याबद्दल ते आह्मा लोकांच्या धन्यवादास सर्वथा पात्र झाले आहेत.

## महाराष्ट्रांतले संत.

इतर देशांच्या इतिहासापेक्षां महाराष्ट्र देशाच्या इतिहासांत जर कांहीं विशेष असेल तर तो हाच आहे कीं महाराष्ट्रांतले मराठी राज्याची स्थापना ही केवळ आकस्मिक किंवा मुत्सद्देगिरीनें घडवून आणलेली गोष्ट नसून साधुसंतांनीं सुरू केलेल्या धार्मिक चळवळीची प्रत्यक्ष मदत तिला पुष्कळ झालेली आहे. ही गोष्ट न्या. रानडे यानीं आपल्या इतिहासांत सप्रमाण सिद्ध करून दाखविली आहे. तरी पुनः संतांनीं आह्मांला दुर्बळ करून सोडलें असें दूषण त्यांना देण्यांत येतेंच. संतांचीं ही राष्ट्रीय कामगिरी रामदास स्वामीपासून सुरू झाली असा पुष्कळांचा समज आहे पण तो खरा नाहीं. संतानीं राजकारणावर आपली छाप बसविल्याचीं उदाहरणें रामदासाच्या पुष्कळ पूर्वीं घडलेलीं आहेत. प्रत्यक्ष राजकारणांत न पडतां आपल्या आंगच्या योगबलानें व ज्ञानबलानें यवन राजांना नादीं लावण्याचें व त्यांच्याकडून हिंदुधर्मीयांना होणारा उपद्रव शमविण्याचें श्रेय रामदासापूर्वीं श्रीपादश्रीवल्लभ, व त्यांचे शिष्य श्री नृसिंहसरस्वती, मुधेशचांगदेव, राघवचैतन्य, व महालिंगदास यांस दिलें पाहिजे. या [illegible] संतानें रचिलेल्या विक्रमवृत्तिशी [illegible]ची कल्पना ओतप्रोत भरलेली आहे. याप्रमाणें रामदासांच्या अगोदर वरील संतांनीं एक प्रकारें राष्ट्रीय कामगिरी बजावली आहे. येथें राष्ट्रीय शब्दाचा अर्थ हिंदुसमाजापुरती येवढाच संकुचित अर्थ घेतला पाहिजे. विविधज्ञान विस्ताराच्या जूनच्या अंकांत या विषयावर लेख लिहिणारानें हें ध्यानांत ठेविलें असतें तर त्याचा सुंदर व माहितीनें पूर्ण असा निबंध अव्यंग ह्मटला गेला असता. असो. रामदासाच्या मागून ब्रह्मेंद्रस्वामी यांनीं ही तोच मार्ग स्वीकारला. त्यांच्या मागून मात्र कोणी संत राजकारणाला प्रत्यक्ष मदत करण्यासाठीं अवतीर्ण झाल्याचें दिसून येत नाहीं. कदाचित् त्यांच्या कार्य क्षेत्राचें व कार्याच्या स्वरूपाचें रूपांतर झालें असेल. तें झालें अशी आमची समजूत आहे. अलीकडच्या काळींही ब्राह्मसमाज, आर्यसमाज, वगैरे धार्मिक संस्थांचे राजाराममोहनराय व स्वामी दयानंद यांच्या सारखे संस्थापक समाजातली विषमता काढून टाकून एक प्रकारें राजकारणाला साह्य करीत आहेत असेंच ह्मटलें पाहिजे. तसेंच एकनिष्ठतेनें व स्वार्थत्याग पूर्वक शिक्षणसंस्थाचालवून शिक्षण प्रसाराच्या द्वारें राजकारण सुगम कारणारे ही संतमालिकेंतच गणिले पाहिजेत. असे संत आजही महाराष्ट्रांत आहेत ही केवढी भाग्याची गोष्ट आहे?

## वऱ्हाडवृत्त

**हवामान**—थोडीशी उघाडी आणि नंतर आर्द्रा नक्षत्राच्या जोरदार सरीवर सरी यानीं शेतीच्या कामाला सेन्या सारखी उत्तम मदत दिली आहे. नवीन बीज अंकुरावर जोमानें येत आहेत. चालू ऋतुमान इतकें सुखकर वाटतें कीं पुढें होणारी धान्याची समृद्धि आतां पासूनच आशानदींत पोहण्याला शिकवित आहे. रोगराई नाहीं आणि उलटें सार्वजनिक आरोग्य मनोरम आहे.

अलिशान सर बेंजामिन राबर्टसन चीफ कामिशनर आज उमरावतीला असून तेथें नवीन स्थापावयाच्या आर्ट कालेजाच्या संबंधानें खल होणार आहे. नागपूर युनिव्हर्सिटीचा प्रश्न विचारांत घेण्यांत येणार आहे या कार्यानिमित्त प्रांतांतील शेलकी शेलकी मंडळी एकत्र बोलावण्यांत आलेली आहे.

बेळगांवकर संगीत नाटक मंडळीनें परवां शनिवारीं 'कट्टा कर्मयोगी' या नाटकाचा प्रयोग करून दाखविला. या मंडळीचीं नाटकें अगदीं निराळ्या धर्तीवर असून लोकांची मनें प्रस्तुत मनूच्या अध्यात्म विषेकडे वळवीत आहेत.

रा. रा. स्टांडन साहेब कमिशनर यांची स्वारी येत्या गुरुवार पासून येथें येणार असून पंधरा दिवस मुक्काम होणार आहे.

क्याप्टन फौलर साहेब सिव्हील सर्जन यांनीं चार्ज घेतला. ते लोकप्रिय असल्यामुळें त्याच्या आगमनानें विशेष आनंद झाला.

## जाहिर नोटीस.

आमचें मिशनरीचें वर्कशाप जवळील माडीचा बंगला भाड्यानें देणें आहे. भाडे दरमहा २९ रुपये चोहींकडून हवा खुली प्लेग येथें आजपर्यंत झाला नाहीं ज्या कोणास घेणें असेल त्यांनीं खालील पत्त्यावर भेटावें अगर ताजनापेठ पोष्ट ऑफीसांत फामरोज अरदेसर यांना भेटावें.

पत्ता रुस्तुमजी मॉडन पेनशनर

नं. २३ नाजर गूटास्ट्रीट पुणें.

## नोटीस

### इजारदार व इनामदार सभा यवतमाळ.

मे. डेप्युटी कमिशनर साहेब बहादूर जि० यवतमाळ यांनीं रावसाहेब बळवंत रामचंद्र लांडगे, इजारदार सभेचे व्याइस-चेअरमन, यांस पत्र लिहून या जिल्ह्यांतील इजारदार लोकांना भेटून त्यांशीं इजाऱ्याच बाबतींत कांहीं विचारपुस करण्याची इच्छा दर्शविल्यावरून आपणांस कळविण्यांत येते कीं, शनिवार ता० १२ माहे जुलै सन १९१३ इ० रोजीं सकाळीं सातवाजतां यवतमाळ येथें रा. रा. यशवंतराव देशमूख यांचे बगल्यांत साहेब बहादुरांचे मुलाखतीकारिता इजारदार सभेची स्पेशल मिटींग भरविण्याचें ठरलें आहे. तरी आपण सदर सभेस जरूर हजर राहण्याचें करावें.

"आपण या नोटिसींतला मजकूर आपले शेजारचे व भेटतील ते सर्व इजारदार यांस कळवून त्यांसही सभेस येण्याविषयीं आग्रह करावा."

"याच दिवशीं इजारदार व इनामदार सभेची **वार्षिक सभा** होऊन सालाबादप्रमाणें सभेच्या कामाचा **रिपोर्ट व जमाखर्च** हीं सभेपुढें मांडण्यांत येतील; व सभेपुढें असलेल्या दोनतीन महत्वाचे प्रश्नांवर विचार करण्यांत येईल."

"सभेस येतांना इजाऱ्या संबंधाचे कांहीं विशेष महत्वाचे कागदपत्र आपले जवळ असल्यास ते समागमे आणावे. कळावें ही विनंती."

आपला

यवतमाळ ता. १-७-१९१३ इ. } दत्तात्रेय कृष्णाजी काणे सेक्रेटरी

इजारदार व इनामदार सभा यवतमाळ.

नो० नं० २४

## जाहिर नोटीस

वि० सीनीअर सबजज्ज साहेब बहादूर कोर्ट आकोले.

सक्सेशन सरटीफिकीट नंबर २ सन १९१३ ई० सक्सेशन सरटीफिकीट मिळण्याचा अर्ज. अर्जदार

शंकर राघव देशपांडे ब्राह्मण सबरजिष्ट्रार कारंजा तालुका मुर्तिजापूर जिल्हा आकोला.

सर्वत्र लोकांस कळविण्यांत येतें कीं, वरील अर्जदार यानें सक्सेशन सर्टीफिकीट मिळण्याचा अर्ज आमचें कोर्टांत ता. २८-६-१३ ई॥ रोजीं दिला असून त्याची चौकशीची ता० २-८-१३ आमचें कोर्टांत नेमली आहे तरी त्या तारखेस ज्याची कांहीं तकरार असेल त्यानीं सकाळीं १० वाजतां आमचें कोर्टांत वरील तारखेस हजर व्हावें. तसें न केल्यास पुढें कोणतीही तकरार ऐकली जाणार नाहीं. कळावें

ता. २।७।१३

R. N. Trivedi
Senior Subjudge
Akola.

नो० नं० २५

## नोटीस

नोटीस बेशमी कृष्णजी रामजी मुनीम ऑफ रामजी कान्नव रा० पो० कारंजालाड ता. मुर्तिजापूर यांसः—

खालीं सही करणार यांजकडून नोटीस देण्यांत येते कीं तुमची मुलगी माझी लग्नाची बायको असून, जोंपर्यंत तुमचा आमचा मेळ होता. तोंपर्यंत मी तिच्यासह तुमचे जवळ राहिलों. पण आतां तसा योग जमत नाहीं. व मला पोटा करितां नोकरी करण्यास कोठें तरी फिरलें पाहिजे व मी असा फिरतों ह्मणून तुह्मी तुमचे मुलीस पाठवीत नाहीं, हें बरोबर नाहीं.

माझ्या खाण्यापिण्याची व संसाराची गैरसोय होऊं नये ह्मणून तिला आणण्यास माझे वडील बंधु तुमचे घरीं आले असतां तुह्मी तिला रवाना न करितां एकदम वराच्या आंत मारामारीवर प्रसंग आणल्या वरून पोष्ट र० नो० नंबर ४९ नें १५ दिवसांची मुदत देऊन तींत नोंद केलेल्या आंगावरील डागिन्यासह व आंदणाच्या भांड्यासह आणून घालून माझ्या सहीची पावती घ्यावी, असें बजाऊन सांगितलें असतां तुह्मी पोष्ट र० नो० नं० २९ नें कळविलें कीं ": — लग्न करितांना माझी मुलगी अशा शर्तीवर दिली गेली आहे कीं तुह्मी जन्मभर माझें घरीं राहावें. आणि स्वतः नोकरी करून उभयतांचें पोट भरावें. माझी मुलगी घर सोडून कोठेंही पाठविणार नाहीं.":—

अशा बद्दलचा लग्नाच्या वेळचा पंचा समक्षचा माझ्या स्वदस्तुरचा लेखी ठराव वगैरे कांहींच नसून तुह्मी फक्त आविचाराचीच तोंडी शर्त पक्की करून पहात असून आह्मास धमकी देत आहां, ती आह्मास मुळींच मान्य नाहीं.

ज्या प्रमाणें स्वतःच्या तोंडची वरील शर्त लेखी व खरी करूं पाहतां त्याप्रमाणेंच तुमची व माझी तिला नेण्या बद्दल तारीख ५-७ १९१२ इ० रोजीं तक्रारीचा प्रसंग मारामारी पर्यंत आल्यावरून त्याच दिवशीं भाड्यानीं घेतलेल्या घरांत व्यवस्था करून एकटा राहिल्यामुळें कांहीं दिवसांनीं एकदम आजारी पडलों.

आजारांत असतांना लोकांनीं तुह्माला दोष दिल्यावरून त्या अडचणीचें वेळीं मजजवळ येऊन तुमच्या घरांतील मंडळीच्या सांगण्यावरून तुह्मी हट्टानीं व स्वइच्छेनें आज सरासरी १० महिन्या पूर्वीं ह्मणजे ता० २६-८-१२ इ० रोजीं लिहून घेतलेलें खानगी पत्र खरें करूं पाहतां तर तें खानगी पत्र माझी शरीरप्रकृती सुधरेपर्यंत तुमचा व तुमच्या घरांतील मंडळीच्या समजुती पुरतें दिलें असून तें मला व कायद्यास लागू नसे.

आतां तिला आठ दिवसांचे मुदतींत आंदणाच्या सर्व भांड्यांसह व सर्व डागिन्यांसह आणून न घातल्यास तिला अन्नवस्त्रांचा लागलेला व लागणाऱ्या खर्चाचा मी जबाबदार होणार नाहीं.

वरील मुदतींत असें न केल्यास पोष्ट र० नोटीसींत नोंद केलेल्या भांड्यांची व डागिन्यांची अफरातफरी केल्यास जबाबदार तुह्मास धरलें जाईल. व मग रिती प्रमाणें लग्नाचा खर्च नोटीस खर्च कोर्ट खर्च व इतर खर्च भरून घेतला जाईल.

भांड्याची व डागिन्यांची पावती व फारकती बनावट केल्यास गुन्ह्यास पात्र व्हाल. मग कोणत्याच प्रकारची तक्रार ऐकिली जाणार नाहीं. कळावें ता० २८ ६-१९१३

सही

व्यंकटेश मानाजी कुळकर्णी दस्तुर खु० रा० फुली ता० मलकापूर पो० बडनेरभोलजी

नो० नं० १६

## नोटीस

नोटीस बेशमी सयाबाई जवने गंगाराम ब्राह्मण रा० पातुर्डा ता. जळगांव यांस

खालीं सही करणारी कडून नोटीस देण्यांत येतें कीं तुह्मी माझ्या सासू आहांत माझ्या चुलत सासऱ्यानीं आपली कांहीं इस्टेट माझे नवऱ्यास बक्षीस केली. या गोष्टीचें फक्त बक्षीस पत्र होऊन इस्टेट मरे पर्यंत त्यांनीं आपलें ताब्यांतच ठेविली होती. आतां ते वारल्या मुळें त्या इस्टेटीचा हक्क मला प्राप्त झाला. असे असतांना तुह्मी जिनगी जबरीनें आपलें ताब्यांत घेतली असून ती बिघडविण्याचा तुमचा मानस आहे. तरी तुह्मांस या नोटीसीनें कळविण्यांत येते कीं माझी स्थावरजंगम इस्टेटीवर आपला हक्क दाखविणें वृथा होय. इतकेंच नाहीं तर माझ्या वरील जिनगी तुह्मी गहाण खरेदी अगर कोणास बक्षीस देऊं नये दिल्यास त्या बद्दल सर्व प्रकारें तुह्मास जबाबदार धरून कोर्टामार्फत योग्य तजवीज केली जाईल. ता. १ जुलई १३ इ.

निशानी आंगठा

चंद्रभागा जवजे रामचंद्र

आत्माराम बळीराम याचें घरीं आडोळा बाजार ता. दर्यापूर पोष्ट आडोळ.

नो. नं. १७

## नोटीस

नोटीस बेशमी संपत पुंनाजी देशमूख रा० खांबोरें हल्लीं मु० पिंजर ता० आकोला यांसः—

खालीं सही करणाराकडून नोटीस देण्यांत येते कीं, ता० २२-६-१३ रोजीं मारण्याची भीती दाखऊन तुह्मी माझे बंधू नथु सखाराम रा० पिंजर यांज पासून कजबे पिंजर येथील. शेत स० नं० १२० बद्दल जबरदस्तीनें हक्का संबंधी १ कागद लिहून घेतला. वरील इस्टेट आमच्या वाडिलांनीं संपादन केली तीस आज वहिवाटीस ५० वर्षें होतात. या शेताचें खातें फक्त तुमचे नावें असून तें पोकळ आहे. तरी त्या शेताचा हिस्सेदार कायदेशीर मी ही असल्यानें यापुढें माझे भावाकडून लिहवलेला एक द्वितीयांश हिस्सा या बद्दल दिलेला कागद मी रद्द केला आहे. तुह्मी आमचे शेतांत कोणतीच वहिवाट करूं नये व हक्क दाखऊं नये. विनाकारण आगळीक केल्यास कायदेशीर फौजदारी तुमचेवर करण्यांत येईल. व त्यासंबंधाचा खर्च तुमचेकडून वसूल केला जाईल ता० ३० जून १९१३

सही

गोविंद सखारामजी भारस्कार राहणार कोळंबी ता. आकोला

नो. नं. १८

## नोटीस

बेशमी मुकाजी वल्लद भगवानजी निमकाळे रा. आळसन ता. खामगांव यासः—

खालीं सही करणार याजकडून नोटीस देण्यांत येते कीं, मौजे आळसण ता० खामगांव जिल्हा बुलडाणा येथील घर एक धाब्याचे खांब २८ आहेत. ही मिळकत माझा मयत आजा मुरारी वल्लद मोरोबा याचे मालकीचा आहे. तो शके नजकुरचे चैत्र आखेर मरण पावला. तो जीवंत असतांना सन १९०५ सालामध्यें त्यानें जाहिरात दिली होती कीं, माझा धाकटा मुलगा नामें दत्तु वल्लद मुरारी हा वाईट लोकांचे नादी लागून बिघडला आहे. त्यास कोणी पैसे वगैरे दिल्यास माझे इस्टेटीस लागू नाहींत देणारा. इसम त्याचें आंगावर देईल असे असतां आपण माझे बापापासून लबाडीनें एक गहाणखत रुपये ५० चे व एक खरेदीखत रुपये ५० चे असे कागद बिनभरण्याचें करून घेतलें आहेत. तरी ह्या नोटिशीनें कळविण्यांत येते कीं सदर्हू मिळकतीवर (माझा बाप) दत्तु मुरारी याचा कोणतेही प्रकारे हक्क नाहीं व त्यानें वरील करून दिलेले दोन कागद कायदेशीर नाहींत करितां मुद्दाम आपणास ह्या नोटिशीनें कळविले आहे कळावें तारीख २७।६।१३ इसवी.

सही

बाबु वल्लद दत्तु आ. पा. क. आई देवकी मर्दे दत्तु मानभाव नि० बांगडी

दस्तुर गोविंदा मुरारी

नो० नं० १९ मु० आकोला

## नोटीस

रा० रा० वामन गणेश पांडे ब्राह्मण रा० मंगरूळ कांब्याचे ता० मोर्तीजापूर यांस—

खालीं सही करणार याजकडून नोटीस देण्यांत येते कीं माझा वडील भाऊ डेबाजी सोनाजी कांबे हा मरून आज सुमारें १२।१३ महिने झाले आहेत. त्याचें नांवानें मौजे मंगरूळ ता. मोर्तीजापूर येथील शेत सर्वे नंबर ५४ एकर २२ गुंठे ३६ आ. रुपये ४५ सालीम शेत याचे खातें व नोंदत्याचें नावें आहे. त्याची नोंद बुकांत आह्मी उभयतां भाऊ ह्मणजे १ कालुजी २ राजाराम वल्लद सोनाजी याच्या नांवची नोंद आपण केली किंवा नाहीं हें आह्मास माहीत पडलें नाहीं तरी ही नोटीस पावल्या दिवसापासून मजला आठ दिवसाचे आंत रिकार्ड ऑफ राईटचें नोंदबुकांत आमचीं नांवें शरीक केलीं आहेत याबद्दल लेखी समज मिळावी कळावें तारीख २९।६।१३

सही

काळुजी वा। सोनाजी कांबे

नो. नं. २० दस्तुर खुद्द

## नोटीस.

नोटीस बेशमी बाळमुकुंद कस्तूरचंद मारवाडी रा. अंत्री व श्रीराम खेतसीदास मारवाडी रा. शेगाव यांस खालीं सहि करणारा कडून नोटीस देण्यांत येते कीं शंकरराव भाऊराव देशमूख यांचा तुह्मी निकाल केला व त्यांचे पैसे तुह्मा पासून घेणे आहेत ते ६००शें रुपये हे तुह्मांस मागीतले असतां मलगा अज्ञान ह्मणून तुह्मी ते देत नाहीं. परंतु मुलाची मी पालन कर्ती असून सांप्रत अज्ञानाचें मकान बसविण्यां करितां मी त्या रुपयाची मागणी करीत आहे तरी ही नोटीस पावतांच वरील ६०० रुपये देऊन माझी पावती घ्यावी या प्रमाणें १५ दिवसांत न केल्यास व्याजासुद्धां कोर्ट मार्फत फिर्याद करून पैसे वसूल केले जातील कळावें ता. ५ जुलाई १९१३

सही.

राधाबाई जवजे भाउराव तर्फे मुकत्यार आनंदराव बापुराव देशमुख राहणार तुदगांव द खु.

नो. नं. २१

## नोटीस

मी खालीं सही करणार याजकडून सर्वत्र लोकांस कळविण्यास येते कीं सखाराम रामजी बांबल राहणार कामरगांव ता० मूर्तिजापूर जिल्हा आकोला याची जी इस्टेट आहे त्याचा मालक चंद्रभान सखाराम बांबल हा आहे. सखाराम याच्या पार्वती मर्दे सखाराम व जानकी मर्दे सखाराम बांबल अशा दोन विधवा बायका आहेत त्यांस अन्नवस्त्राकारितां खालीं लिहिलेली जमीन —

| सर्वे नंबर | एकर गुंठे | आकार रुपये |
| --- | --- | --- |
| ४८ | ११।१३ | २१॥=॥ |
| १६३ | १९।१२ | २१।=॥ |
| १७५ | १७।२८ | २७।- |

येणें प्रमाणें जमीन व राहण्याकरितां गायवाडा याची चतुःसिमा पुर्वेस बळिराम गांजरे यांचें घर पाश्चिमेस चंद्रभान सखाराम ह्याची हवेली दाक्षिणेस गोसाव्याचा मठ उत्तरेस देमा सोनाराचें घर येणें प्रमाणें चतुःसिमा पूर्वक गायवाडा व वर लिहिल्याप्रमाणें जामिनींपैकी फक्त १२ टिपण जमीन हयातींत उपभोगण्यास दिली आहे व त्यांच्या दिचे त्यांनीं मरेपर्यंत उपभोग घ्यावा त्यांचे पगाचें त्यांस दिलेली जमीन व गायवाडा वकार. मालक चंद्रभान सखाराम हाच आहे सदरहु बायापासून कोणीही गहाण, खरेदी वगैरे घेऊ नये जर कोणी घेतल्यास त्याची गहाण, खरेदी पोकळ ठरून त्याचें नुकसान होईल. व त्याबद्दल आह्मी कोणत्याही प्रकारें जबाबदार नाहीं कारण सदरहु बायांस विकण्याचा किंवा दुसरें कोणास देण्याचा कोणत्याही प्रकारें अधिकार नाहीं. कळावें ता० २७-६-१३ इ.

सही

चंद्रभान सखाराम बांबल राहणार कामरगांव ता० मू०

नो० नं० दस्तुर खुद्द तर्फे

R. N. Trivedi
Senior Sub Judge
Akola

N. 18

अमूल्य संधी ? अप्रतीम नासिक चूर्ण ! ! अमुल्य रत्न.

## टि. सि.

### सुगंधी औषधी तपकीर.

जगत प्रसिद्ध असें हें सुगंधी तपकीर, दिर्घ काला पासून कोट्यावधि लोकांच्या उपभोगानंदास पात्र झाले आहे. अलीकडे सर्वत्र याचा जास्त प्रचार झाल्या कारणानें युरोप खंडांतील बहुमान्य गृहस्थांच्याही अंतःकरणांत यानें मकोबनस्या विषयीं तिटकारा उत्पन्न करून स्वतंत्रपणें त्यांना फार प्रिय झाले आहे. लक्षावधि एतद्देशीय लोकांनीं हे वापरून याच्या अलौकिक गुणांबद्दल आपला संतोष प्रकट केला आहे.




मस्तकशूल, ज्ञानतंतूंची दुर्बलता, स्मरण शक्ति कमी होणें, मानासिक चिंता, औदासिन्य, चक्कर येणें, डोळ्या पुढें अंधेरी येणें इत्यादि विकार हे सुगंधी तपकीर वापरल्यानें एका घटकेंत जातात. विद्यार्थी, शिक्षक, गवयांस, वकील, ब्यारिष्टर वगैरे सारख्या डोक्याच्याच कामाच्या मंडळीनें डोक्याचे हलके पणासाठीं हे जरूर वापरून एक वेळां परिक्षा करून पहावी. याच्या गुणांबद्दल हजारो सार्टीफिकीटा मिळाल्या व नित्य मिळतात.

झोंप घेण्याची वेळ खेरीज करून, दिवसांतून दोनदां किंवा तिनदा ही तपकीर ओढल्यानें मनाला आनंद वाटतो, इतर तपकीर शेरभर वापरल्या पेक्षां ही तपकीर ओढल्यानें नाक सुगंधानें भरून जातें. एक पैशाच्या साध्या तपकीरींत आमच्या सुगंधी तपकीरीच्या दोन चिमटी मिळविल्या असतां सर्व तपकीर सुगंधी होतें. अचुक गुणकारी व अत्यंत सुवासिक आणि अगदीं अल्प किंमतींत मिळणारी अशा प्रकाराची तपकीर इतर ठिकाणीं आज पर्यंत कोणाच्याही पाहण्यांत आली नसेल. स्वाभाविक गुणकारी व चित्ताकर्षक असें हे लोक प्रिय सुगंधी तपकीर केवळ एक चिमटीभर ओढल्यानें सुगंधभारित असें श्वास नाकांतून बाहेर येतात व त्या योगानें मनाला उल्हास वाटतो.

कि. एक डबीस ०–४–० वि० पी० चार्ज ०–३–०
' डझन डबीस २–६–० " " " ०–६–०

( सुचना ) पत्र लिहुन मागविणारानी न्युसपेपराचें नांव व तपकीरीची किंमत लिहून कळविलें असतां वरील किंमती प्रमाणें पाठविले जातील' किंवा तसें न त्यास अडिचरुपयांस पाठविलें जाईल. पत्र लिहिणारानीं इंग्रजींत अथवा बाळबोध अक्षरानीं आमचेवर दयाकरून लिहावें.

स्वतः तयार करणारे :— टि० सी० नागलिंगप्पा आणि कंपनी'
नं० २० सिंगण्णनरोड.
नो० नं० ११ पार्क टाऊन पोष्ट' मद्रास

## जाहीरात.

### !!! डाक्टर जी. बी. यांची सुवासिक औषधी तपकीर !!!

!! मागवा व खात्री करून घ्या !!

ह्या तपकीरीचा शेंकडों लोकांनीं अनुभव घेऊन सर्टिफिकीटें दिलीं आहेत.




शिवाय वैद्य व डाक्टर लोकांचीं या तपकीरीच्या स्वच्छते बद्दल व गुणाबद्दल अनुकूल मतें आह्माकडे आलेली आहेत. ही तपकीर पिनस. अर्धशिशी, डोके दुखणें व डोक्यांतील मेंदुचे इतर सर्व रोग तसेंच पडसें वगैरे विकारांवर फार बस्ताद आहे. ही ओढल्यानें मेंदुतील दूषित धातु पातळ होऊन नेत्रद्वारें व नाकांतून बाहेर निघून जाते व मस्तकांतील मेंदु स्वच्छ होऊन बुद्धी व ज्ञान तीव्र व वृद्धिंगत होतात. मज्जेसंबंधीं रोग दूर करणारें या सारखें सुलभ साधन दुसरें नाहीं. साधी तपकीर दहा वीस वेळां ओढून जो उपयोग होतो तो गुण आमची ही सुवासिक तपकीर फक्त दोन तीन वेळ ओढल्यानें करते. एक पैशाच्या साध्या तपकीरींत आमच्या सुवासिक तपकिरीच्या दोन चिमटी मिळविल्या असतां सर्व तपकीर सुगंधी होते. शेंकडों लोक ही तपकीर आपल्या कुटुंबांत नित्य लागणाऱ्या औषधाप्रमाणें संग्रही ठेवतात [illegible] तपकीरी प्रमाणें ह्या आमच्या तपकीरींतील सुवास व तीव्रता एकदोन दिव- [illegible] हे गुण आमच्या तपकीरींत एक वर्षपर्यंत कायम रहातात [illegible] व वैद्यलोकांच्या सहायानें तयार करविली आहे [illegible] आण्याचीं तिकीटें पाठविलें [illegible] हिची किंमत

एक बाटलीस ४ आणे व बंगी टपाल व व्ही. पी. खर्च ३ आणे
डझन बाटल्यास रु. २–८ " " " ६ आणे

सूचना ] पत्र लिहिणारानीं इंग्रजींत अथवा बाळबोध लिपींत आमचेवर दया करून लिहिणें कळावें. तपकीर मिळण्याचें ठिकाणः—


गुरुबसवा आणि कंपनी,
नो. नं. १२ सावकार पेठ, मद्रास

### सर्वोत्तम रक्तशुद्धि करणारा




डॉ० वामन गोपाळ यांचा

## आयोडाईज्ड सार्सापारिला.



हा सार्सापरिला हजारों लोकांनीं पन्नास वर्षें अनुभवून उत्तम रक्तशुद्धि करणारा आहे असें ठरविलें आहे. ह्या औषधानें रक्तशुद्धिवर गुण वाटून इतर रक्तशुद्धि करणाऱ्या औषधांत "सर्वोत्तम" अशी ख्याति मिळविली आहे जुना संधिवात, त्वचे संबंधीं रोग अशक्तता यांवर हें रामबाण औषध असून त्याचा सर्व जगभर फार वाखाणणी होत आहे. गुणकारी शक्ति देणारें औषध आहे याच्या दररोजच्या सेवनानें मन आणि शरीर यांस उल्हास वाटतो. किंमत एका बाटलीस सव्वा रुपया शिवाय टपाल खर्च.

औषध मिळण्याचें ठिकाणः-- डॉ. गौतमराव केशव
५६३ ठाकूरद्वार मुंबई.

नो० नं० १३

## Oriental Government Security LIFE ASSURANCE COMPANY Limited

ESTABLISHED IN 1874.
R. Paterson, Brown, Manager,
HEAD OFFICE—BOMBAY

### FUNDSExceed 4 crores

CLAIMS PAID FOR OVER 3 CRORES
IMMEDIATE SETTLEMENT OF CLAIMS

If there be one thing of more importance than another in connection with Life Assurance, it is when claims arise, that the amount due under the policy be paid to the Claimants at the earliest possible date. This the Directors of the 'Oriental' keep well before them and act up to, treating their clients with the utmost liberality.

UNQUESTIONABLE SECURITY.

It is not sufficient to read that a Company's funds amount to a given sum, but it is essential to know how such Funds are invested:—if in miscellaneous and risky investments or how secured.

The Funds of the 'Oriental' are invested in Government Securities and lodged with the Government Official Trustee of Bombay in terms of the Company's Trust Deed, as Security for Claims arising through decease of assured lives, and endowment policies matured.

Government Officers, Professional men, Tradesmen and others by employing portion of their annual income or profits in effecting life policies, at once create a fund equivalent to the savings of many years.

No man can be sure how long he will live, and although he may save money yet, if he dies early before he had time to save much, his wife and family may be in distress. Life Assurance is a means by which this danger is got over. Life being so uncertain, the sooner a man makes up his mind to assure his life the better. Once satisfied of the propriety of the step, do not delay. There are numerous instances in the records of the Oriental' where the delay of a month or less, has left the family without the intended provision.

INFLUENTIAL AND ENERGETIC AGENTS WANTED. For terms please apply to the undersigned.

Prospectuses, forms and any further information can be obtained on application to

M. DESOUZA,
CHIEF AGENT, Nagpur

CHIEF AGENCY FOR C. P., BERAR & KHANDESH No. No 14

हें पत्र आकोला येथें कैलासवासी खंडेराव बाळाजी फडके यांच्या वऱ्हाडसमाचार छापखान्यांत नारायण [illegible] फडके यांनीं सदाशिवआश्रमांत छापून प्रसिद्ध केलें.

Reg ) N. 150

# वऱ्हाडसमाचार.

Berar Samachar.

वर्ष ४७ ] आकोला-- सोमवार तारीख १४ माहे जुलै सन १९१३ इ० [ अंक २७

## वर्गणीचे दर

आकोल्यांतील लोकांस........१ रुपया
बाहेरगांवीं ट. हां. ........ २ रुपये
वर्गणी आगाउच घेण्याची वहिवाट ठेविली आहे.

## नोटीशीचे दर

दर ओळीस दीड आणा.
हेडिंगच्या दोन ओळी धरल्या जातील-
नोटीस सुवाच्य असली पाहिजे.
सूचनाः– गुरु[illegible]च्या आंत येणाऱ्या नोटीसा त्याच आठव[illegible] घेतल्या जातील.
[illegible] येणाऱ्या नोटीसास स्पेशल चार्ज पडेल.

### जाहिरात

**मुंबई ब्यांकेची सेव्हिंग ब्यांक.**

ह्या बँकेंत खालीं दिलेल्या अटींवर ठेवी ठेवितां येतात.

कोणत्याही वर्षाचे १ ले जानेवारी आणि ३१ दिसेंबर याच्या दरम्यान एक हजार रुपये पर्यंत पैसा ठेविला जाईल.

ठेवी दोन अथवा अधिक इसमांच्या नांवावर ठेवतां येतील आणि तो पैसा त्यापैकीं एकास अथवा जास्त इसमांस अगर त्यापैकीं मयताचे मार्गे राहील त्यांस काढतां येईल

व्याज दर साल दर शेंकडा तीन रुपयाप्रमाणें दिलें जाईल. व्याजाची आकारणी प्रत्येक महिन्याची जी कनिष्ठ शिल्लक असेल तिजवर केली जाईल. मात्र पांच हजारावरील शिल्लक रकमेस व्याज नाहीं. नियमांच्या प्रती बँकेंत अर्ज केला असतां मिळतील.

मुंबई ब्यांक आकोला ९।९।०९ } G. A. Phillips. एजंट
नं १

## मुंबई बँकचें सोनें.

मुंबई बँकचा छाप असलेल्या उत्तम कसाच्या सोन्याच्या चिपा मुंबई बँकच्या आकोले आणि उमरावती येथील ऑफिसांत विकत मिळतील. गिऱ्हाइकानें जास्त माहिती करितां बँकेंत तपास करावा.

एका चिपचें वजन २६$\frac{३}{४}$ तोळे असतें. साधारण भाव वऱ्हाड समाचार वर्तमानपत्रांत व बाजारभाव ह्या सदराखालीं सांपडेल.

मुंबई बँक आकोला २१-९-१० } G. A. Phillips. एजंट
नो० नं० २

### जाहिरात

सर्वत्र लोकांस जाहीर करण्यांत येते कीं श्रीसमर्थ गजानन आवलीया महाराज संस्थान शेगांव यांचे समाधीचें ( मंदिराचें ) काम बांधण्याचे सुरू आहे यास लागणारा खर्च फार असून तो लोकाश्रयावर अवलंबून आहे. वर्गणीचें कामी संस्थानाकडून हरी कुकाजी आणि बंकटलाल भवानीदास व गोपाळ मारुती लउळ व रावजी नारायण महाजन यांस वसूल करतें नेमिले गेले आहे. कांहीं लोक हरदास संन्याशी वगैरे हे या मठाचें कामासाठीं वर्गणी वसूल करतात ह्मणून समजतें त्यांस वर्गणी न देतां या वरील ४ इसमासच वर्गणी देत जावी. चार इसमाबद्दल ज्यास संशय [illegible] त्यांनीं वर्गणी शेगावकर [illegible] खंडुजी पाटील यांचे दुकानी मनीआर्डरीनें पाठवावी. **व्यवस्थापक**
**रामचंद्र कृष्णाजी पाटील**
नो० नं० ३

### वऱ्हाडांत खात्रीची उत्तम नवीन सोय.

## खरे गारेचे थंडचष्मे

आह्मीं मुद्दाम वऱ्हाडच्या लोकांकरितां **डोळे तपासून** सर्व तऱ्हेच्या फ्रेमीसहित **खरे गारेचे थंड चष्मे माफक दरानें** विकण्याचें दुकान काढलें आहे. मुंबई वगैरे मोठ्या ठिकाणच्या भपक्यावर मंडळी कशी फसतात हें सर्वांना श्रुतच आहे सर्व गरजूनी अनुभव घेवून पहावा.

**गोपाळ पांडुरंग आणि कंपनी**
नो० नं० ४ आकोला

अपूर्व लाभ ! अपूर्व संधी ! ! अपूर्व संधी !!!

### उत्तम कलप.

—:·*·:·*·:—

जर तुह्मांला तरुण दिसावें अशी इच्छा असेल तर आमचा कलप वापरा. त्या योगें केंस काळे कुळकुळीत होऊन ते पुनः पांढरे होत नाहीत इतकेंच नाहीं तर त्या पासून केंस रेशमासारखे मऊ होतात. पुष्कळ श्रीमंत लोकांनी आमचा कलप वापरून अनुभव पाहिलेला आहे. एक पेटी ६ महिने पुरते. त्याच्या उपयोगापुढें किंमत फारच स्वस्त ह्मणजे दर पेटीस फक्त १ च रुपया ठेविला आहे. ट. ह. निराळा

आमचा पत्ता
हजरत मौलाना आशके यान्दानी
जनाब हाजी पीर सयद
नूरशाह हामदानी
पोष्ट ३ मुंबई
नो० नं० ५

## अजब करामत.

**बालक्षुधा निवारण**- लहान मुलांस वर दूध घालण्यानें होणारें संग्रहणी, उडतें इत्यादि सर्व विकारावर हें सत्व अप्रतीम गुणकारी आहे. मुलें हौसेनें घेतात. किं० १ तो० ८१ आणे.

**हेमसुधा**– धुपणी हा रोग पुष्कळ स्त्रियांना जडतो. यावर खात्रीचा उपाय न मिळाल्यानें कित्येक स्त्रिया कुचमत आहेत. या औषधानें कसलीही धुपणी नाहींशी होऊन अंगांत तरतरी येते. परमा व गरमी यावर ही याचा तात्काल गुण येतो. कित्येकांची खात्री झाली आहे किं० १ बाटलीस ३ रु०

**कामधेनुगुटिका**- अलीकडील निरा[illegible] राळ्या परिस्थितीमुळें लेकुरवाळ्या आयांना दूध येत नाहीं. त्यामुळें मुलें अशक्त व रोगी होतात. याचे सेवनानें पुष्कळ निरोगी दूध येते. पुष्कळांना अनुभव आला आहे. किं० ३ गोळयास ८६ आणे.

जानकीबाई रानडे नर्स ॲण्ड मिड्वाईफ. } सांगली,
नो० नं० ६

### रामबाण उपाय.

### रक्तपिती व कोड

दहाहजार पुड्याफुकट. आह्मीं आमच्या औषधाची खात्री पटावी ह्मणून १०००० नमुन्याच्या पुड्या करण्याचें योजिलें आहे या पुड्या वरील महारोग दुरुस्त होण्यासारख्या आहेत. हे त्या निःसंषय सिद्ध करितील. या पुड्या वापरून अनुभव पहावा ह्मणजे खात्री होईल. नमुन्याच्या पुडीची किंमत फक्त ८= ठेविली आहे. ही किंमत फक्त टपाल हशील वगैरे खर्चापुरतीच आहे

२ आह्मीं रक्तपिती, कोड, हे कसे उद्भवतात त्याची शुश्रुषा कशी करावी? वगैरे माहितीचे इंग्रजी व बंगाली भाषेंत पुस्तक तयार केलें आहे तेंही पण गरजूंनीं अवश्य वाचण्या लायक आहे. ह्मणजे त्या पासून त्वचे संबंधीं रोगाची पूर्ण माहिती होईल किंमत फक्त ट. ख. सह ॥=सर्व पत्र व्यवहार इंग्रजींत करावा.

पण्डीत कृपाराम
८ नंदीब्रागानेलन पो. सालकिया जि. हावरा.
नो० नं० ७

[illegible] युग [illegible]
[illegible] हे तें अ[illegible] यथार्थ आहे [illegible] सुधारकेल्या

### शास्त्रोक्त वशीकरणयंत्र

इसे सीधी भुजामें बांधकर जिस किसी स्त्रीपुरूषसे प्रीति करोगे तो वही आपके वशमें होगा दक्षिणा ·।।।· पैकिंग डा० म० जुदा पत्र हिन्दी अंग्रेजीमें देना. डोडूवाला चमत्कारी कार्यालय जलेसर जिला एटा
नों. नंबर ८

### अनायासें देवदर्शन.

**नोटपेपर्सः**- श्री गजानन, दत्तात्रय, मारुती, शंकर व नरहरी या पैकीं कोणती ही एक मूर्ती रंगमंद [illegible] [illegible] (एम्बास) छापलेल्या रवंदळ तालुके नोट पेपर्स व [illegible] इजला— १०० कव्हरें करणार याजकडून नोटीस ८१२ दोन्हीं मी तुजला [illegible] वागविण्यास [illegible] [illegible] तशी आई गुजाई मर्द




सर्वत्र एजंटस् पाहिजेत
पताः- बेंद्रे आणि कंपनी पुणे सिटी
नो० नं० ९

### हिंदुस्थानावर अरिष्ट.

हिंदुस्थानातील राहिवाशांच्या पाठीस ज्वर व हिंवताप यांचें अरिष्ट सदोदित लागलेलें आहे पण त्याचा प्रतिकार करण्यास बाटलीवाला यांचें हिवतापाचें औषध व गोळ्या हे रामबाण आहेत. ताप किंवा शीतज्वर येणारसें वाटतांच हें औषध घ्यावें. किं. १ रु

**बाटलीवाला यांच्या निस्तेज लोकांसाटीं शक्तिकारक गोळ्या**

हें औषध घेतल्यानें भागवटा, मेंदूचे श्रम, पौरुषनाश, अशक्तता व क्षयरोगाचें स्वरूप, त्याप्रमाणें अजीर्ण इ. इ. विकार. ताबडतोब दूर होतात. किं रु. १८८

**बाटलीवाला यांचें दंतमंजन.**

हें दंतमंजन मायफळाशीं कांहीं इंग्रजी औषधांचा वैद्यकीय रीतीनें मिलाफ करून बनविलें आहे. किं. ८४

**बाटलीवाल्याचें गजकर्णावर मलम.**

यानें गजकर्ण, कुजली खरूज याचा विकार एका दिवसांत नाहींसा होतो. किं. ८४

हीं औषधें सर्व औषधी विकणाऱ्या दुकानावर व डॉ. एच. एल. बा[illegible] जे. पी. मु वरळी लेबोरेटरी [illegible] यांजकडे [illegible] [illegible]

[illegible] पुढें एकाकी जाणार नाहीं.
१०.७.१३
[illegible] वस्तु [illegible]
[illegible] जागीं वात [illegible] तर्फेनें N. 18
R. N. Trivedi
Senior Sub Judge
Akola

सव ना, त्यां ...क्षण, गोष्टी को.. प्रासन देशाचें

वऱ्हाडसमाचार

आषाढ शुद्ध ११ शके १८३५ प्रमादी

## हिंदुस्थानांतलें धंदेशिक्षण.

धंदे शिक्षण हाच सध्याच्या स्थितींत हिंदुस्थानाला तरणोपाय आहे ही गोष्ट जितकी लोकाला तितक्याच पूर्णपणानें सरकारलाही कळून चुकली आहे, आणि ह्मणून तें होईल तितकें लवकर व अव्यंग रीतीनें हिंदुस्थानच्या लोकांना कसें देतां येईल या प्रश्नाकडे सरकारचें लक्ष सध्या लागलें आहे. या एका प्रश्नावर पुष्कळ मोठाल्या गोष्टी अवलंबून आहेत. उत्तम ... रीती अभावीं आमच्या लेखन... निपजत नाहींत; लेखनपटू ... धजत नाहींत; आहेत ही ... लत नाहींत. ... गोष्ट वाटते. ... ळवळींच्या ... आहे. या ... दृष्टि देऊन स्वदेशी चळवळीचें पाहिलें लक्षण कोणतें हें ठरविलें तर प्रथम देशांत उत्तम कारागिर पैदा करणें अर्थात धंदेशिक्षण देण्याची उत्तम शाळा काढणें हें ठरतें. या शाळासंबंधानें पुनः हें लक्षांत ठेविलें पाहिजे कीं अल्प प्रमाणावर जागजागीं अशा शाळा असण्यापेक्षां एका मध्यवर्ति स्थळीं मोठ्या प्रमाणावर उत्तम प्रकारची एक शाळा असलेली बरी. अशा मोठ्या प्रमाणावरच्या शाळा प्रत्येक प्रांताला एकेक तरी असणें अवश्य आहे. दुसरी गोष्ट ज्या प्रांतांत जो विशिष्ट कारखाना चालण्याचा संभव अधिक असेल त्या धंद्यासंबंधाचें संपूर्ण ज्ञान देणारी मोठी शाळा त्या प्रांतांत असावी. उदाहरणार्थ मुंबई इलाख्यांत कापसाच्या गिरण्या पुष्कळ तेव्हां त्या कारखान्यांत लागणारे इंजिनियर, स्पिनिंग व वीव्हिंगमास्टर, व त्याचप्रमाणें कापसाच्या गिरण्यांत लागणारे जाणते मजूर तयार होतील अशा प्रकारचें शिक्षण देणारी एक मोठी शाळा मुंबई किंवा अहमदाबाद या शहरीं असावी. त्याचप्रमाणें आमच्या वऱ्हाडांत, व वर्धा, हिंगणघाट वगैरे मध्यप्रांताच्या अनेक जिल्ह्यांतही कापसाचाच व्यापार मोठा, सबब वऱ्हाड व मध्यप्रांत यासाठीं कापसाच्या कारखान्याचें पूर्ण शिक्षण देणारी मोठी शाळा उमरावतीसारख्या ठिकाणीं असावी. हल्लीं असलेल्या टेक्निकल स्कूलला वाढवून असें स्वरूप सहज देतां येईल. बंगालमध्यें सण, व ताग यांचा व्यापार मोठा, सबब तिकडे तशा प्रकारच्या उद्यो... मदत करणारी उद्योगशाळा पाहिजे. ...रीं धान्यें अधिक पिकत अस... प्रकारची... चालविणारीं येईल, कांहीं ठिकाणीं लोखंडाचा, म्यांगनीज धातूचा, किंवा अल्युमिनम धातूच्या कारखाना निघूं शकेल. या सगळ्या कारखान्याला उपयोगीं पडतील अशीं माणसें आमच्या लोकांत तयार व्हावयास पाहिजेत व तीं येथल्या येथें तयार झाल्यास उत्तम, पण तें आज शक्य नाहीं. त्यासाठीं आमच्यांतल्या होतकरू उमेदवारांना स्कॉलर्शिपा देऊन दरसाल थोडेसे विद्यार्थी सरकार युरोप, अमेरिकेला पाठवीत असतेंच, व कलकत्त्याची एक सभाही या संबंधांत बरेंच कार्य करीत आहे पण हे स्कॉलर्शिपा देऊन पाठविलेले सगळेच विद्यार्थी त्या धंद्यांत वाकबगार नसतात ही मोठी दुर्दैवाची गोष्ट आहे. निवड बरोबर नझाल्यामुळें स्कॉलर्शिप देऊन पाठविल्याचें चीज त्यांचे हातून होत नाहीं हें कांचकाम शिकून आलेल्या रा० वागळे यांच्या उदाहरणावरून कोणाच्याही सहज लक्षांत येईल. तेव्हां ज्याला परदेशीशिक्षण घेण्याकरितां पाठवावयाचें, त्याचें हिंदुस्थानांतच त्या विषयाचें शिक्षण तरी पुरें झालें असलें पाहिजे असें जें मॉरिसनकमिशनें आपल्या रिपोर्टांत सुचविलें आहे तिकडे सरकार अवश्य लक्ष देईल अशी उमेद आहे. आह्मी वर केलेल्या सूचनांत नवीनत्व नाहीं. तथापि सरकारच्या मनावर त्यांची माहिती पूर्णपणें बिंबावी ह्मणून त्यांची वारंवार पुनरावृत्ति करावी लागते. या संबंधांत मुंबई सरकार सर्वांच्या अगोदर जागृत झालेलें पाहून आह्मास संतोष वाटतो. मुंबई सरकारनें उद्योग शिक्षणाच्या बाबतींत गेल्या आठवड्यांत एक ठराव प्रसिद्ध केला आहे त्यावरून मुंबईच्या व्हि० ज्यु० टेक्निकल इन्स्टिटयूटला विस्तृत स्वरूप देऊन त्या संस्थेला औद्योगिक शिक्षणाचें केंद्र बनविण्याचा, त्या शाळेच्या शिक्षणाच्या शाखा जागोजागीं स्थापण्याचा, स्पेशल इन्स्पेक्टर नेमून धंदेशिक्षणाला योग्य दिशा लावण्याचा व कारखानदाराना पाहिजेत तसे कामदार तयार करण्याचा उद्योग लवकर हातीं घेण्याचा त्या सरकारचा उद्देश दिसतो. आमचें प्रांतिक सरकारही याकामीं इतराच्या मागे खास राहणार नाहीं. कारण त्यांनाही वऱ्हाडच्या रयतेची, व वऱ्हाडांतल्या कारखान्यांच्या भरभराटीची पूर्ण काळजी व आस्था आहे आणि ही काळजी व आस्था वेळोवेळीं निरनिराळ्या रूपानें व्यक्त झालेलीही आहे. आह्मीं मागें छापल्याप्रमाणें उमरावतीच्या टेक्निकल इन्स्टिटयुटला विस्तृत व उपयुक्त स्वरूप देऊन लोकांचें चित्त तिकडे आकर्षण केलें जाईल अशा प्रकारची कांहीं खटपट सरकारी अधिकारी करतील तर लोक खरोखर त्यांना धन्यवाद देतील.

## एक अत्यंत करुणरसपर आख्यान.

गेल्या आठवड्यांत हातीं आलेल्या 'इंडिया' पत्राच्या अकांत औंध प्रांतांत फाशी गेलेल्या दोघा ... अत्यंत ... संबंधांत सर ... सरकारी अधिकारी यांच्या ... पत्रव्यवहार प्रसिद्ध झाला ... कोणाचें ही मन कळवळल्यावांचून राहणार नाहीं. थोडक्यांत ही कथा अशी आहे कीं दोघा जमीनदारावर खुनासंबंधांत खटला होऊन त्याची चौकशी खालच्या कोर्टानें करून आरोपीस दोषमुक्त ठरवून सोडून दिल्यावर पांच महिन्यांनीं प्रांतिक सरकारनें हायकोर्टाचे अधिकार असलेल्या ज्युडिशियल कमिशनरकडे अपील केल्यावर त्यांना पुनः वारंटानें पकडण्यांत आलें. या न्यायाधीशानें त्यांना दोषी ठरवून फाशीची शिक्षा सांगितली. पुढें फाशीची तारीख ठरविण्यांत आली. पण दया करून शिक्षा बदला असा अर्ज फाशीची शिक्षा सांगितलेल्या कैद्याला हिंदुस्थान सरकारकडे करतां येतो. त्याप्रमाणें या दोघा जमीनदारांनीं करून तो हिंदुस्थान सरकारकडे पाठविण्याकरितां प्रांतिक सरकारकडे रुजू केला. हा अर्ज फाशीसाठीं ठरविलेल्या तारखेच्या अगोदर निदान ४८ तास तरी हिंदुस्थानसरकारकडे पोंचला पाहिजे असा नियम आहे. पण वरील जमीनदारांचा अर्ज प्रांतिक सरकारच्या चुकीमुळें ह्मणा ... अर्जदारांच्या दुर्दैवामुळें मुदतींत हिंदुस्थान सरकारला न पोंचल्यामुळें ठरलेल्या तारखेला दोघांनाही फाशीं देण्यांत आलें! या अत्यंत करुणरसपर आख्यानासंबंधानें पार्लमेंटांत कडक टीका झाली व प्रश्न विचारण्यांत आले. पण चूक होऊन चुकल्यावर मान खालीं घालण्यापलीकडे मि० माँटेग तरी काय करणार? फाशीची शिक्षा सांगितलेल्या अर्जदारांचा अर्ज हिंदुस्थानसरकाराकडे पाठविणें किंवा न पाठविणें हें सध्याच्या नियमाप्रमाणें प्रांतिक सरकारच्या मर्जीवर ठेविलेलें आहे. तें तसें न ठेवतां मनुष्याच्या प्राणाचें मोल लक्षांत घेऊन सदर अर्ज हिंदुस्थानसरकारकडे योग्य मुदतींत पाठविलेच पाहिजेत अशी सक्तीची ताकीद नियमांत असावी ह्मणून सर हेनरी कॉटन व इतर गृहस्थ खटपट करीत आहेत. या त्यांच्या खटपटीला भूतदयेनें प्रेरित असलेल्या प्रत्येक माणसाकडून पूर्ण सहानुभूति व साह्य मिळेल यांत शंका नाहीं.

## प्रतिक्रियेची लाट

लार्ड हार्डिंज साहेबांची कारकीर्द औदार्य, सहानुभूति आणि प्रगति यांच्यासाठीं आतांपर्यंत सर्वतोमुखीं गाजत आली आहे; पण अलीकडे कलकत्ता युनिव्हर्सिटीनें नेमिलेल्या लेक्चररसंबंधानें हिंदुस्थानसरकारानें जें नामंजुरीचें पत्र पाठविलें आहे तें वरील कीर्तीला कमीपणा आणणारें आहे हें पाहून प्रत्येकाला अत्यंत खेद वाटेल. युनिव्हर्सिटीचें वातावरण शांत असावें व तींत अध्ययन करणाऱ्या विद्यार्थ्यांचा चित्तक्षोभ होईल असा प्रकार घडूं न देण्याविषयीं खबरदारी घेणेंही रास्त आहे. पण शिक्षणखातें व राजकारण यांची फारकत करण्याला तरी कांहीं मर्यादा आहे कीं नाहीं? विद्यार्थ्यांनीं, व प्राथमिक आणि दुय्यम प्रतीच्या शाळामास्तरांनीं राजकारणांत बिलकुल अंग ठेवूं नये असा सरकारनें जो नियम केला तो अगदीं रास्त आहे असें आह्मी आतांच ह्मणत नाहीं तर ऐन आणिबाणीच्या प्रसंगीं सुद्धा आह्मी हेंच ह्मणून सरकारी अधिकाऱ्यांच्या कृत्यांचें योग्य समर्थन करीत आलों आहों. पण अपक्व बुद्धीचे विद्यार्थी, किंवा अदूरदृष्टीचे अथवा राजनीतीविषयीं अज्ञान असे शाळामास्तर यांच्याच पंक्तीला युनिव्हर्सिटींतल्या विद्वान् लेक्चररांना बसविण्याला आह्मीं तयार नाहीं. तशांतून हिंदुस्थानसरकार ज्यांच्या नेमणुकीला हरकत घेत आहे ते तिघेही गृहस्थ कलकत्ता युनिव्हर्सिटींतल्या एकट्यादुकट्या मा... यानें पसंत केले नसून सिंडिकेट सारख्या जबाबदार सभेनें निवडले आहेत व या सभेचे अध्यक्ष खुद्द व्हाइसचान्सेलर असतात. अशांनीं ज्यांची नेमणूक केली आहे तिला हिंदुस्थानसरकारनें हरकत घेणें ह्मणजे त्या संस्थेविषयीं अविश्वास दाखविण्यासारखें व राजकारणाची व्याख्या फारच विस्तृत करण्यासारखें आहे. तीनचार वर्षांपूर्वीं असे प्रतिक्रियेचे प्रकार होत असत त्याचें कोणाला येवढें नवल वाटलें नाहीं. पण लॉर्ड हार्डिंज साहेबांच्या नाणावलेल्या प्रगतिपर आणि उदार कारकीर्दींत ही परागतीची लाट एकाएकीं कशी उसळली याचें ... देश लोकांना मोठें आश्चर्य वाटून राहिलें आहे.

## आमच्या प्रांताचा राज्यकारभार

सरकारी रिपोर्ट प्रायः शुष्क असतात, पण आमच्या प्रांताच्या राज्यकारभाराचा १९११-१२ सालचा रिपोर्ट खरोखर अत्यंत आल्हादकारक, मनोरंजक आणि उपयुक्त माहितीनें परिपूर्ण आहे. या रिपोर्टाचीं पृष्ठें थोडीं ह्मणजे फार १०५ आहेत, पण या पृष्ठांतून मध्यप्रांत व वऱ्हाड यांच्या संबंधाची स्वाभाविक स्वरूप, जमीन, लोकस्थिति, जमाबंदी, न्यायपद्धति, पोलीस, सहकारीपतपेढ्या, जिल्हा कौन्सिलें व बोर्डें, पिकें, इरिगेशन, आरोग्य इ० हरएक विषयाची इतकी माहिती संगृहीत केलेली आढळेल कीं पुस्तक वाचून संपविल्यावर आपल्या ज्ञानसंग्रहांत पुष्कळ महत्त्वाची भर पडली आहे असें प्रत्येकाला हटकून वाटेल. शेतकी सभांनीं केलेलें उत्तम काम पतपेढ्यांची कामगिरी, तुरुंगांची सद्यःस्थिति शेतकऱ्यांना शेतकी खात्याकडून प्रदर्शनाच्या रूपानें देण्यांत येणारें शिक्षण, सेंद्रक व्यांकांची स्थापना, गुराचे रोग बरे करण्यासाठीं चाललेले यत्न, फळांच्या लागवडीकडे लागलेलें अधिक लक्ष, इ० गोष्टींची माहिती वाचली ह्मणजे गेल्यासालीं आमच्या प्रांतानें प्रगतीचा बराच मार्ग आक्रमिला असें समाधान वाटल्यावांचून राहत नाहीं. फारेस्टाचें उत्पन्न वाढतें आहे, पण त्यापेक्षां गुरांच्या चराईची अधिक चांगली व्यवस्था लागली आहे अशी सुवार्ता ऐकण्यास मिळाली असती तर दुधांत साखर पडली असती. खाणींची स्थिति बरी आहे, कारखानेही चांगले चालले आहेत. मजुरांना मजुरी भक्कम मिळत असे व शेतकरीही सुखासमाधानांत राहिले; अशी सर्वतोपरी स्पृहणीय स्थिति गल्यासालीं आमच्या प्रांताच्या वाट्याला सुदैवानें आली याचें श्रेय पुष्कळ अंशानें आमचे लोकप्रिय मे० चीफकमिशनर, साहेब कमिशनरसाहेब, व डेप्युटी कमि० साहेब इ. वरिष्ठ अधिकाऱ्यांकडेस आहे हें सांगावयास नकोच.

# आकोला—वऱ्हाडसमाचार

## नोटीस

दूर.
सांगत बेशमी भोनी मर्द आनाजी कुंमाराविंझणवाडा पेष्ट कामरगांव कांहीं एक म
दूषण आमच्या इसः—
असतें. पण या र याजकडून नोटीस
माहिती सहज ची ता० २।६।१३
लोकाच्या जाती, त्यांच्या चालीरीति, त्यांचा भाषा, धर्म, शिक्षण, धंदे, त्यांचे करमणुकीचे प्रकार इ० गोष्टींचे असें सूक्ष्म ज्ञान मिळेल कीं तसें पंचवीस वर्षांच्या अनुभवानेंही दुसऱ्याला प्राप्त व्हावयाचें नाहीं. साराश, लोकशिक्षणाच्या दृष्टीनें ही सदर रिपोर्ट अत्यंत महत्वाचा आहे. लॉर्ड कर्झन साहेबांनीं सरकारी रिपोर्टांचा आदर्श ह्मणून खात्रीनें या रिपोर्टाची प्रशंसा केली असती. ही येवढी उपयुक्त व विविध माहिती गोळा करून ती व्यवस्थित रीतीनें व गोड भाषेनें मांडणें हें मोठें लेखनचातुर्याचें काम आहे, आणि लेखनपटु अधिकारी या प्रांतास आहेत ही आह्मांला खरोखर गोष्ट वाटते.

सुपद्दा नांवाचा माझा व आमेच भावास मर सात ७ आठ ८ वर्षें तेव्हां पासून मीच तुझे पालन पोषण करित आहे. व जंगम आणि स्थावर मालाची आमचे वडीलोपार्जित हातची संपत्ति असे भले जः गाहा मलगा त्यांस न झाले

## …चा आदर

ना० गव्हरनर लॉर्ड कारमायकल कुचबिहारच्या राजाचे घरीं चादर पांघरून बंगाली पोषाखानें मेजवानीला बसले होते अशी बातमी बंगाली वर्तमानपत्रांत आली होती. पण तिच्या खरेपणाविषयीं शंका होती. आतां त्यांच्या या कृत्याबद्दल कित्येक लोकांनीं त्यांच्यावर स्तुतीचा वर्षाव सुरू केला आहे ता खरी असेंहि वाटतें. नेटिव्हानें साहेबासारखी बूटपाटलोण टोपी वगैरे घातली ह्मणजे आह्मी लोक त्याच्या कृत्याला माकडचेष्टेसारखें हास्यास्पद गणितों, पण तेंच एखाद्या साहेबानें आमच्या पोषाखाचें अनुकरण केलें किंवा एखादी मडम साडी नेसून, चोळी घालून व कुंकू लावून फोटो काढण्यास बसली तरी आमचे लोक वाहवा! साहेबांचा व मडमसाहेबांचा आमच्या पोषाखाविषयीं केवढा आदर! आमचा पोषाखच तसा आहे अशी नसती आढ्यता बाळगण्यास तयारच! लॉर्ड कारमायकेल साहेबांनीं खरोखरीच देशी पोषाख केला असला तरी केवळ पोषाखावरून त्यांच्या मनाची परीक्षा करणें हा मार्ग प्रशस्त नाहीं. माणसाची परिक्षा त्याच्या मनावरून व कृत्यावरून केली पाहिजे पोषाखावरून नाहीं. तथापि अलीकडे कचेऱ्या, दरबार, व सभ्य देशी लोकांच्या सभायांतून धोतरांना मज्जाव करण्याची जी रूढी पडत चालली आहे तिला साहेबांनीं धोतरांविषयीं दाखविलेल्या आदरबुद्धीनें जर थोडाबहुत आळा पडला तर बरेंच कार्य होईल.

## शास्त्रीय माहिती

सायनर फेरांटी नावाच्या शास्त्रज्ञाचें असें ह्मणणें आहे कीं विद्युच्छक्तीच्या योगानें इंग्लंडच्या वातावरणाची स्थिती आपणांस हवीतशी सहज करून घेतां येईल. विजेच्या पट्ट्यानें इंग्लंडला वेष्टून समुद्राच्या पाण्यापासून उत्पन्न होणाऱ्या वाफेला इंग्लंडांत जाण्यानें व अकाळीं पर्जन्य पाडण्याचें मना करतां येईल. अर्थातच सूर्याला यापुढें ढगांची भीती बाळगायला नको.

इमारती लाकूड टिकाऊ करण्यासाठीं त्यावर रासायनीक द्रव्याचे प्रयोग करून पाहण्याचें काम अमेरिकेंत चाललें आहे. झिंक क्लोराईडनें १२ वर्षें, व कॉपरसल्फेटनें तें १४ वर्षें टिकतें. आतां डामराच्या तेलांत तें भिजविल्यानें २० वर्षें टिकतें असें अनुभवास आलें आहे. व डामराचें तेल इतर सर्व रासायनीक द्रव्यांपेक्षां स्वस्तही मिळतें.

विजेच्या प्रवाहानें माणसाला जे धक्के बसतात त्यांची तीव्रता नेहमी सारखी नसते. प्रवाह मोठा किंवा सूक्ष्म यावर ती तीव्रता अवलंबून असते असा पुष्कळांचा ग्रह आहे. पण तो खरा नाहीं. मनुष्याच्या शरिराचा वर्ण व मनाची स्थिति यांच्या मानानें ती तीव्रता कमी किंवा अधिक असते. मनाची खंबीरता असली व धक्का बसणार असें अगोदर ठाऊक असलें तर ती तीव्रता येवढी भासत नाहीं, पण एकाएकी धक्का बसल्यास तो जोरानें आघात करितो.

…तके दिवस उष्णतेच्या योगानें दुधाची पूड करीत असत. पण आतां उष्णतेबद्दल थंडीचा उपयोग करतात. पाण्यांतली उष्णता काढून घेऊन त्याचें जसें बर्फ बनवितात, तशी दुधाच्या अंगची उष्णता शून्य अंशाच्याही खालीं नेली ह्मणजे त्याला घनता यते. हें घनस्थितींतलें दूध चक्रांत घालून जोरानें गरगर फिरवितात. त्याच्या योगानें मध्यें दुधाचे खडे जमून त्याच्या भोंवतीं बासुंदी सारखे घट्ट दूध जमा होतें. मग हें घट्ट दूध एका कृत्रिम उपायानें गरम केलेल्या मोठ्या लोखंडी पेटींत घालून ठेवतात. कांहीं वेळानें त्यांतलें पाणी शोषलें जाऊन त्याची उत्तम पूड होते.

## लेखकानें लक्षांत ठेवण्याच्या गोष्टी

१ आपण लिहिलेलें छापलें जातें याच गुर्मींत न राहतां आपल्यावरची जबाबदारी ओळखून नम्रवृति धारण करावी.

२ सत्यान्वेषणाविषयींची तत्परता व सत्यकथनांत सरळपणा असावा.

३ अमर्याद भाषा किंवा अत्युक्ति यां विषयीं खबरदारी ठेवावी.

४ विनाकारण कोणाविषयीं बरेंवाईट मत देऊं नये; निंदा तर करूंच नये.

५ सार्वजनिक अहित करणाऱ्या संबंधानें निर्भिडता धरावी.

६ काबाडकष्ट करणाराविषयीं सहानुभूति ठेवावी व दुःखितांच्या दुःखपरिहारास …ण्यांकडे लक्ष द्यावें.

७ गरिबांचा छळ करणारे उच्चपदस्थ असले तरी त्यांचा तिरस्कार करावा.

८ ढोंग आणि कट यांचें अविष्करण करावें.

९ आपल्यावर योग्य टिका करणारापाशीं अंतःकरण खुलें करावें; अयोग्य टिका गालांतल्यागालांत हंसून सोडून द्यावी.

१० द्रव्यासाठीं खऱ्या मताला धाब्यावर बसवूं नये.

११ ईश्वरानें केलेल्या सृष्टींत अंधार व उजेड दोन्ही आहेत. तरी लोकांना उजेडाचा प्रदेश दाखवून उत्तेजित करावें, अंधाराचा प्रदेश दाखवून नाउमेद व हताश करूं नये.

## मुलांचें युग.

सध्याच्या युगाला कोणी लोहयुग ह्मणतात; कारण कीं सध्या जिकडे तिकडे लोखंडी कारखान्यांच्या द्वारें लोकांना सुखाचीं साधनें पुरवून संपत्ति ओढण्याचे कामीं कारखानदारामध्यें स्पर्धा लागून राहिली आहे. कोणी याला संघशक्तीचें युग ह्मणतात; कारण कीं व्यक्तिशः केलेल्या प्रयत्नांपेक्षां जुटीनें केलेल्या प्रयत्नांची अधिक सफलता असते हें तत्व लक्षांत घेऊन याच युगांत संयुक्त भांडवलाच्या पेढ्या, व्यापारी कंपन्या, सहकारी पतपेढ्या म्युनिसिपालिट्या वगैरे सहकारित्वाच्या संस्था निर्माण झाल्या. पण या पेक्षांही या युगाला मुलांचे युग असें जें नांव कित्येकांनीं दिलें आहे तें अगदीं यथार्थ आहे असें ह्मटलें पाहिजे. सगळ्या सुधारलेल्या जगांत आतां मुलांचें शिक्षण हा एकच विषय सर्वतोमुखीं आहे. मुलांची जोपासना, त्यांचें संगोपन, त्यांचें रक्षण व शिक्षण, त्यांच्या स्वभावाचा परिपोष इ० गोष्टी कोणत्या प्रकारें केल्या असतां ह्यापासून देशाचें महत्तम कल्याण होईल या एका प्रश्नाची मीमांसा करण्यांत जगांतले सगळे मुत्सद्दी, तत्वज्ञ, धर्माधिकारी, व शास्त्रज्ञ गुंतले आहेत. इंदूरचे दिवाण सर नारायणराव चंदावरकर यांनीं ह्मटल्या प्रमाणें मुलें हीं केवळ मुलेंच नव्हत. तीं देशाच्या कल्याणाचे भावी आधारस्तंभ आहेत. तीं केवळ छात्रच नव्हेत, तर गुरु ही आहेत. तीं भावी पुरुष किंवा स्त्रिया यांच्या शीलाला वळण लावणारीं आहेत. बालादपिसुभाषितंग्राह्यम' यावचनांत सुभाषित शद्बानें निवळ उच्चारीत शद्बापेक्षां पुष्कळ …ळावें ता० अर्थ उद्दिष्ट आहे असें दिसतें. …लता, निष्कपटता शुद्धता, …पा लक्ष्मणआपा …शाबद्धता, श्रद्धा, शुद्ध आकोला …ना, व आ • नं० १६

## नोटीस

नोटीस बेशमी भिमी मर्द कडतु रा० वडगांव हल्लीं मुक्काम खंदळ तालुके आकोट इजला—
खालीं सही करणार याजकडून नोटीस देण्यांत येते कीं मी तुजला बाग… …हा …हे परंतु तुझी आई … तजला मी …

## …स्पृश्य वर्ग.

मुंबईचें इंडियन स्पेक्टेटर पत्र ह्मणतें कीं सरकारी अधिकाऱ्यानीं तयार केलेल्या व सरकारच्या हुकमानें प्रासिद्ध झालेल्या ग्याझेटियर ग्रंथांत अस्पृश्य वर्गाचें वर्णन पुढील प्रकारें केलें आहे—या वर्गांतले लोक आळशी, अप्रमाणीक, दारूबाज, चोरी करण्यास सवकलेले, आणि लबाड आहेत. त्यांच्यांतले पुरुष व स्त्रिया दोन्ही नीतिभ्रष्ट आहेत; पुरुष हवे तेव्हां बायका बदलतात; आणि बायकाही हवे तेव्हां नवऱ्यांची अदलाबदल करतात; अस्पृश्य वर्गाचें हें वर्णन कोणत्या प्रांतांतली स्थिति पाहून जबाबदार लेखकानें केलें आहे तें कळत नाहीं. आमच्या वऱ्हाड प्रांतांत तरी निदान अशी स्थिति नाहीं हें आह्मी खात्रीनें सांगूं शकतों. अस्पृश्य वर्गांतले लोक शिक्षणांत मागसलेले असले, किंवा हिंदु समाजानें त्यांना शतकानुशतकें दूर ठेविलें असलें, तरी त्यांना आळशी, अप्रामाणिक किंवा नीतिभ्रष्ट ह्मणणें ह्मणजे त्यांच्या जातीची निवळ बदनामी करणें आहे जात पुष्कळ लोक पराकाष्टेचे … तालुका व वृत्तीचे, आणि पापभीरु आकोला. काळीं ही त्यांच्यांत रोई येतें कीं, यांच्या सारखे साधु … सरटीफिकाट आहेत. अशी सबंध …टींत ता० ८ केव्हां ही शक्य न असून त्याची ह्मणतें त्या प्रमाणें १९१३ ई० ची मध्यें खरोखरची आहे. तरी त्या वर्गाचे वर्णकांहीं तक्रार असेल त्यांनीं खाडून वस्तुशीं आमचे कोर्टींत वरील जागीं घातलेंवें. तसें न केल्यास पुढें तर्फेनें …र ऐकली जाणार नाहीं.
ता० १०-७-१३

R. N. Trivedi
Senior Sub Judge
Akola

No. N. 18

## लढाईचा खरा प्रारंभ.

तुर्को-बाल्कन युद्धाला प्रारंभ झाला त्याचवेळीं एका फ्रेंच मुत्सद्यानें असें भविष्य वर्तविलें होतें कीं या युद्धांत तुर्कस्थानचा पराभव होईल खरा, पण युरोपियन राष्ट्रांत यादवी माजेल. सदर भविष्य अक्षरशः खरें ठरलें आहे. तुर्को—बाल्कन युद्धांत धर्मयुद्धाच्या नियमाचा भंग केल्यामुळें बाल्कन राष्ट्रांवर सध्याची आपत्ति येऊन पडली आहे असें ह्मातारे भाविक तुर्क ह्मणत आहेत. बाल्कन राष्ट्रांना या युद्धांत मिळालेला जयच त्यांच्या मदोन्मादाला व त्याच्यापायीं युरोपच्या सत्यानासाला कारण होईल असें आतां युरोपियन लेखक ही कबूल करूं लागले आहेत, वस्तुस्थिति कबूल करण्यावांचून त्यांना गत्यंतर नाहीं अशी गंभीर स्थिति युरोपची झाली आहे. बाल्कन राष्ट्रांमध्यें आपआपसांत माजलेली यादवी दाबून टाकण्यास युरोपांतलीं मोठालीं राष्ट्रें खरोखर असमर्थ आहेत असें कोणालाही ह्मणतां येणार नाहीं. युरोपताल्या शांतते विषयींची त्यांना फिकीर नाहीं. असेंही नाहीं. रशिया व इंग्लंड या दोन्ही राष्ट्रांनीं शांततारक्षणाविषयींची आपली कळकळ आजपर्यंतच्या वर्तनानें व्यक्त केली आहे. असें असून बाल्कन राष्ट्रें हमरीतुमरीवर आलीं आहेत याचा अर्थ काय! आह्माला वाटतें कीं हा सगळा त्या कुटिल राजनीति नाम धारण करणाऱ्या क्षुद्र राष्ट्रीय मनोवृत्तीच्या उच्छृंखलतेचा परिणाम आहे. शांतता पाहिजे, पण ती स्थापन करण्यांत सुद्धां मतलब साधला तर हवा आहे अशा प्रकारची पुष्कळ राष्ट्रांची मनोरचना आहे.

…ठा.

…चा पुत्र

...श्य बंधूची दाद लावणें हें त्यांचें कर्तव्य आहे. सध्या अस्पृश्य वर्गाला शिक्षण देण्याची चळवळ नुकती कोठें कोठें सुरु झाली आहे. तिला उत्तेजन देण्याच्या बुद्धीनें जरी लेखकानें ही अतिशयोक्ति केली असली तरी ती क्षम्य नाहीं, व तिच्या योगानें त्या चळवळीला प्रोत्साहन मिळण्याचा संभव ही नाहीं.

## चमत्कारिक भविष्य

### ( जर्मनीच्या राष्ट्रा विषयीं )

आकाडेमी नांवाच्या पत्रामध्यें राजश्री ...कांक हारिस या गृहस्थानें एक चमत्कारिक वृत्तांत दिलेला आहे. १८२९ सा[लीं] ... त्या वेळचे राजपुत्र वुलीयम हे ... नांवाच्या एका खेड्यांत ... तेथे ...का ... वर्षे बाईची ... भविष्य सांगत असे. तिला ... ...चारले ...

...ण्याकारितांच परस्वाधीन असल्या... भाग पडले तुमचे पागळ जातीचा मनुष्य शिवाय तुह्माला चालता ... याचे नावाची इस्टेट स्वपले नाहीं. त्याचे सर्वस्वी नु... ह्मणून त्यानें तुमचे मनांत भ... भरवून तुह्मास नोटीस देणे भाग यामुळें तुमची अज्ञानाची इस्टेट न... होण्याचा संभव आहे ह्मणून नोटीस देण्... येते कीं तुह्मी अज्ञानाचे जंगम अगर ... त्यावर बिनशीची कोणत्याही तऱ्हेची अफ...

पिढींत हें साम्राज्य संपावयाचें आहे असें तें भविष्य होतें. आणि त्या भविष्याप्रमाणें हल्लींचें बादशहा हेच तो तेरावी पिढी होय.

ईश्वरी भविष्यांत की गोष्ट असेल ती खरी पण १९१३ वर्ष मोठ्या क्रांतीचें होत आहे ही गोष्ट पदोपदीं निदर्शनास येते.

## विश्वविद्यालय

### ( गुरुकुलाच्या पद्धतीवर )

आमच्या स्थानिक सरकारनें एक उत्तम संकल्प केलेला आहे आणि अलिशान ... सर राबर्टसन हे कर्ते राजपुरुष ... तेव्हां त्या संकल्पाची उभारणी मुर्ते संस्थेच्या द्वारानें होईल अशी आ... पूर्ण आशा वाटत आहे. वऱ्हाड व मध्यप्रांताची युनिव्हर्सिटी स्वतंत्र असावी एवढाच या ...व्या कल्पनेचा प्रांत नाहीं. ...कल्पनेंत कांहीं वैचित्र्य आहे आणि जेव्हा कार्याच्या सृष्टीपथात येईल ती मुंबई, कलकत्ता, मद्रास, अल्हा[बाद], पंजाब येथील युनिव्हर्सिट्यांस ...ल आणि त्यापल्या नवीन कार्य... नामी सुधारणा अमलांत आणील.

कबूल आहे पण तो पंक्तिभेद ... आमच्या राष्ट्राची दानत वाढली ... व्यक्स प्रमाणें श्रीमंतांनीं विद्या... गोळा करावा आणि ... अवलंब करून विद्यार्थी ... मुलें विद्यार्जनाला मुकणार ... योजना काढली पाहिजे कीं, ... आधारस्तंभ आहेत ... मंदिरांत कोठें मज्जाव ... सरकार व प्रजा यांनीं सहकारी विद्यार्थि... पेढी काढून विद्या शिकण्याचा हक्क सर्वत्र सदा विद्याछत्रांतून समसमान ठेवण्यास चुकूं नये. पण गरीबीचें कारण पुढें आणून एका सर्वोत्कृष्ट कल्पनेला कृतीच्या अंगणातून हद्दपार करूं नये एवढीच आमची प्रार्थना आहे.

### नोटीस

नोटीस बेशमी गुलाबचंद पन्नालाल साहु उमरे ता० आकोट यांसः— खालीं सही करणाराकडून नोटीस देण्यांत येते कीं, आह्मी पूर्वी ८०० रुपयांचे ... पक्वान्न पाक खाण्याबद्दल दस्तऐवज ता... दिला. परंतु शेत माझेंच ... व्याज ... रुपयाचा हवाला देऊन शेताचें खरेदीखत झाले आणि १०० रुपये मला देणें आहेत तरी एकूण रुपये १६०० महादेव विठोबा थुटे पाटील रा० मक्रंपूर याजपासून व १०० रु. ... दिवसांचे आंत घेऊन जावे ... जीनगी ... हीं नोटीस लीहून दिली ... सोमवारी ... ७-१९१३ ... रतूर नारायणसींग वा॥ तारासींग.

सही ... वा॥ मारुती सरकळे रा० ... मराळ निशानी खुद हातचा आंगठा असे

## जाहिर सभा

येथील मुनसिपल कारभाराला चांगलें वळण लावावें आणि पत्रव्यवहाराचा नियमितपणा शिकवून नागरीक शुद्धतेचीं कामें चांगलीं करण्यास मदत देण्याची युक्ती काढावी ह्मणून गेल्या ... पांचशें गृहस्थ...

### नोटीस.

नोटीस बेशमी बुधाजी वा॥ उ... रा० आकोला खालीं सही करणार याजकडून ने...ण्यांत येते कीं तुह्मी ता० २९-४-... आह्मास प्रामेसरी नोट ... एक्याशींची करून दि... दिली नाहीं ... तरी उपयोग ... आले शीनें कळविलें आहे. व्याजासुद्धां दिल्यास ... आफि०

...ड्री व्याज ... जळगांव गेल्या ३ रे तारखेपासून सार्विड करण्यांत आलें आहे. कारण अद्याप बाहेर आलें नाहीं.

रा० रा० गोविंद भगवंत देशपांडे नायब तहशिलदार जळगांव यांस सध्या ...हशिलदार नेमण्यांत आलें.

रा० रा० महमद मुस्तफाखान पोलीस सर्कल इन्स्पेक्टर यांस तीन महिन्यांची रजा देऊन त्यांच्या जागीं सबइन्स्पेक्टर रा. रा. ... जलालुदीन यांस नेमण्यांत आलें

रा. रा. ...कृष्णराव गोविंद वैद्य एक्स्ट्रा ... कमिशनर यांस बुलढाण्यास नेमण्यांत ...

विलो—आमचे वऱ्हाडचे रा. पांडुरंग गोविंद ... वर्षे भरली ह्मणून ...

...ाठ सकट ... १८२९ च्या अंकां... ते. १८२९ त २० मिळविले करूं नये १८४९ वर्ष येतें. आणि याच वर्षी पुढें जर्मनी मध्ये मोठी राजक्रांति घडून आली.

वरील प्रश्नाचें उत्तर संपतांच राजपुत्रानें पुन्हां प्रश्न केलाः—तर मग माझा अभ्युदयाचा दिवस कोणता?

त्यावर त्या बाईचें उत्तर असें कीं ...हा या (१८४९) सालाच्या अंकांची ... घे आणि तीत १८४९ मिळीव ...णजे तुला ते नक्की वर्ष मिळेल.

१८४९ च्या अंकांची बेरीज २२ ही बेरीज १८४९ त मिळवून १८७१ साल ...तें. आणि याच वर्षी फ्रान्स व जर्मनी यांच्या मधील लढाईचा शेवट होऊन जर्मनीचा सर्वत्र जयजयकार झाला आणि ...च तें बादशहा पहिले वुलियम यांच्या ...हाभाग्याचे वर्ष होय. या नंतर लागलीच पुन्हा प्रश्न केला कीं माझ्या मरणाचें साल कोणतें? याला तिनें उत्तर दिलें कीं १८७१ च्या अंकांची बेरीज १८७१ त मिळीव आणि तें साल १८८८ होय. ...राजपुत्र ह्मणजे पहिले ... अत्यानंद झाला. ... वर्षे जग...वाचें आहे ...नातीं. तितकें झा... ...आकाश्च केले कीं ...नोटीससाम्राज्य मिळा... माळी दर्यंत टिकेल? मलकापूर ही सर्व नोटीस देण्या... ९ च्या सखो भावनय अनि... आहे. व माझेप्रमाणें ...पले

कांहीं वीसपंचवीस अग्रणी गृहस्थांस मे० डायरेक्टर यांनीं करून दिली आणि अलीशान चीफकमिशनर या संबंधात लोकांची सहानुभूति संपादन करीत आहेत. विद्यमान विद्यादानाच्या पद्धती सदोष असून अर्थप्रापक नाहींत. तेव्हां त्यास वळन देण्यासाठीं आर्यलोकांची जुनी संस्कृत गुरुकुलाची संस्था आधारभूत घेऊन स्थानिक युनिव्हरसिटी निघणार आहे. सर्व कालेजें एका रमणीय पर्वताग्राच्या सपाटीवर संस्थापित करून तेथील उत्तम हवापाणी, निसर्गाची शोभा व स्फूर्ती उत्पन्न करणारीं सर्व उपसाहित्यें यांच्यामुळें विद्यार्थ्यांची बुद्धि, मेधा, वीर्य, ओजस् व बल हीं आपोआपच वाढत जातील आणि शिक्षणाची शीस्त सर्व कालिजातल्या प्रमाणें राहून विद्यार्थ्यांची जोपासना कुलगुरूंच्या प्रत्यक्ष देखरेखी खालीं करण्यांत येईल. कल्पना फार नामी आहे आणि ईशकृपेनें ती चांगली फलद्रूप होईल!

## छिंदवाडा कीं चिखलदरा

ही नवी युनिव्हरसिटी बैतूल, किंवा छिंदवाडा येथें स्थापावी असा सरकारी मानस आहे परंतु आमची आग्रहाची सूचना अशी आहे कीं छिंदवाड्यापेक्षां चिखलदरा अशा संस्थेला फार सोयीचा होईल. दोन्ही प्रांताला हें मध्यवर्ती स्थल आहे आणि तेथील नैसर्गिक सौंदर्य वरील दोन्ही ठिकाणापेक्षां उत्तम आहे.

आमच्या कडील कांहीं पुढारी मंडळी वरील युनिव्हरसिटीच्या स्थापनेला तत्वदृष्ट्या अनुकूल आहेत पण त्यांच्या दृष्टीला गरीब विद्यार्थ्यांचा पान्हा विशेष फुटला आहे असें कळतें. विद्यादानाच्या साम्राज्यांत गरीब ...रा भेदाभेद नको आणि तो ... आहे हें आह्मांस

...रिक गणपती होत आणि त्यांचा मंगलकार्यपथ इतका झाडून साफसूफ करण्यासाठीं जे प्रयत्न होतात ते सर्वांस राजमान्य आहेत. पण एवढा बोभाटा करण्यापेक्षां ही कार्यकर्ती मंडळी प्रत्येक वार्डच्या सभासदाचे कौंसिलदार होतील आणि निमूटपणें सर्व कार्यभार अधीक हलका करितील तर त्यांच्या या वाचिक तपापेक्षां शारीरिक व मानसिक तप लोकहिताच्या दृष्टीनें अधीक श्रेयस्कर होईल, अशा जाहिरसभेच्या वेळीं खालील साधुवाणीची आठवण फार होतेः—

मागें जैसा होता माझे अंगीं भाव !
तैसा एक ठाव नाहीं आता ॥ १ ॥
ऐसें गोही माझें मन मनपाशीं ।
तुटी मुद्दलेसी दिसे पुढें ॥ २ ॥
पुढिलाचे मना आणि गुणदोष ।
पूज्य आपणांस करावया ॥ ३ ॥
तुका ह्मणे जाली कोंबड्याची परी ।
पुढेंचि उकरी लाभ नेणें ॥ ४ ॥

My faith which erst while was so strong
Has cooled. I see no spark of it.
My conscience bears me witness here
I may lose all my capital.
I take delight in finding faults
Of others, just to gain applause.
Ill fares the cock that pecks & pecks
And knows not if it gets reward

## वऱ्हाडवृत्त.

**हवामानः—** पाऊस लवकर पाहिजे आणि तो तसा कृपावृष्टी करील असा सुयोग दिसत आहे. हवेंत गर्मी आहे,

त्या आनंदकारक गोष्टीसंबंधानें टीटीस अमरावती वकील मंडळींनीं फळफळावळीची दे... मेजवानी गेल्या रविवारीं केली. आह्मी राजश्री ... आण्णासाहेब वकील यांचें अभिनंदन धन्यवादांनीं करितों आणि त्यांस सर्व वकील मंडळीच्या अभ्युदयासाठीं व नैतिक उन्नतीसाठीं श्रमजवळ वकिली करण्यासाठीं विनंती करितों.

**धर्मजागृति—**सरकारी मुसलमान नोकरांस दर शुक्रवारीं सार्वजनिक ईश प्रार्थना करण्यासाठीं १ तास सुट्टी देण्यांत यावी असा सरकारी ठराव निघाला आहे.

### नोटीस

नोटीस बेशमी पुतळाबाई जवजे नथू देशमुख रा० अंत्रज यांसः—

खालीं निशानी करणारीकडून नोटीस देण्यांत येते कीं सालीना हसमाचा हक्क आपण बाळापराहून नेत असतां व पुढें मला देत असतां. असें करण्यांत आपला कांहीं स्वार्थाचा हेतू आहे. माझा हक्क ९ वर्षाचा मला मिळाला नाहीं. तरी यापुढें बाळापूराहून रा० त्र्यंबकरावजी देशमुख याजपासून तुमचे हक्काबद्दल तुह्मी रुसूम माझा पाच वर्षाचा निकाल केल्याशिवाय नेऊ नये. नेल्यास त्याबद्दल योग्य तजवीज केली जाईल. व रुसूम तुह्मास न देण्याबद्दल त्र्यंबकराव यांसही कळविलें आहे. कळावें ता० १०-७-१९१३ ई०

सही

बायनाबाई जवजे गुलाबराव देशमुख रा० अंत्रज ता० खामगांव हल्लीं रा० चरणगांव पो० आलेगाव इचे निशानी आंगठा असे.

नो० नं० ...२

## नोटीस

नोटीस बेशमी भोनी मर्द आनाजी कुणबी रा. ब्राह्मणवाडा पेष्ट कामरगांव ता० मुर्तिजापूर

इसः—

खाली सही करणार याजकडून नोटीस देण्यांत येते कीं तुह्मी ता० २।६।१३ इसवीचे कर्तव्य वर्तमान पत्रांतून नोटीस दिली ती पावली ती सर्व खोटी आहे माझे साडूचा मुलगा लक्ष्मण याजला तुह्मी दत्तक घेतलें ह्मणूनच मौजे ब्राह्मणवाडा येथील शेत सर्वे नं० ३ एकर गुंठे ८८९ आकार १४ हें शेत धनज येथील ललुसा फत्तेचंद साहू याजपाशीं लक्ष्मण वल्लद आनाजी अ. पा. क. भोनी मर्द आनाजी या नावानें ४०० रुपयास गहाण आहे सदर्हू गहाण नोंदलेलें आहे. लक्ष्मण व त्याची आजी हे दोघेजण तुमचे जवळ राहण्याकरितांच आले होते परंतु तुह्मी परस्वाधीन असल्यामुळें त्यांना वापस येणें भाग पडले तुमचे जवळ मारोती नांवाचा पांगुळ जातीचा मनुष्य आहे त्याचे मर्जी-शिवाय तुह्माला चालता येत नाहीं. लक्ष्मण याचे नांवाची इस्टेट झाली हे त्यांस खपले नाहीं. त्याचे सर्वस्वी नुकसान झाले ह्मणून त्यानें तुमचे मनांत भलते सत भरवून तुह्मास नोटीस देणें भाग पाडले यामुळें तुमची अज्ञानाची [illegible] नाहींशी होण्याचा संभव आहे ह्या [illegible] नोटीस देण्यांत येते कीं तुह्मी अज्ञानाचे जंगम अगर स्थावर जिनगीची कोणत्याच तऱ्हेची अफरातफर करूं नये ह्मणजे गहाण खरेदी बक्षीस वगैरे देऊं नये. तुह्मी पट्यानें अगर बटाईनें कोणास दिल्यास त्याचे उत्पन्ना पैकीं तुह्मी आपल्या खर्चाकरितां सालीना ६० रुपये घेऊन बाकीची रक्कम सावकाराचे फेडीकरितां लावावी असे तुमचेकडून न झाल्यास शेताची व्यवस्था आह्मास करणें भाग पडेल. लोकाचा मुलगा दत्तक घेतला तो त्याजला कांहींच राहू नये ह्मणून कीं काय. तरी त्याचे कल्याणाची व्यवस्था करण्याची जबाबदारी तुमचेवर आहे. तुह्मी लिहिले कीं बुगड्या व वज्रटीक लक्ष्मणनें व त्याचे आजीनें नेल्या परंतु तुमचे लिहीणें अगदीं खोटें आहे त्यानीं मुळींच आणल्या नाहींत. त्या बद्दल तुह्मी जबाबदार आहांत कळावें ता० ६।७।१३ इ.

सही

मनाजी रायभान प्रधान कुणबी
बोरगांवखुर्द ता० आकोला
नि० खुद आंगठा

नो. नं ११

## नोटीस.

नोटीस बेशमी चीनकाई मर्द सुपडा जात माळी सातव व ईतर सेट सावकार लोक पींपळगांव राजा.

नोटीस देणार माहादु वा॥ कीटकुल जात माळी सातव रा. पींपळगांव राजा ता. मलकापूर जिल्हा बुलडाणा

नोटीस देण्यांत येतें कीं, तूं माझी सखी भावजय आसोन मोहतराची केली आहे. व माझेभावाचा पुत्र संपत वा॥ सुपडा नांवाचा माझा सखा पुतण्या आहे व आमचे भावास मरण्यास अजमास सात ७ आठ ८ वर्षें झालीं आसावीं तेव्हां पासून मीच तुझे व मुलाचे पालन पोषण करित आहे. व जी जीनगी जंगम आणि स्थावर मालाची आहे ती आमचे वडीलोपार्जीत आसून भावाचे हातची संपादन केलेली नाहीं ती जीनगी माझापुतण्या अज्ञान संप तव मी० सदरील जीनगीत उभयतांचा सारखा हीस्सा आहे व सर्वे नं १७८-व १८ चे सकु मर्द कचरू याचे जवळ ताबे गाहाण माझे भावानें हाताने ताबेगाहाण ठेवली होती.

हल्लीं आमचे ऐकण्यांत येत आहे कीं तुह्मी लोकांचें नादी लागून अज्ञानाचे जीनगीची आफरा तफर करून इछीतां तर तुह्मांस आफरा तफर करण्याची मालकी बीलकुल नसून अन्न वस्त्र बराबर कायदे सीर घेउन राहावें अज्ञानाचें लग्न करण्यांचें तुह्मांस जरूर नाहीं. कारण अज्ञानाचा मी सखा चुलता असून त्याचें लग्न करणें मला योग्य आहे तुह्मास जरूरी नाही. सदरहु वर लिहीलेलें नंबर गाहाण सोडविल्याची तुह्मास जरूरी नाहीं. मुलगा सज्ञान होई तो पर्यंत जीनगीचा व्यवहार करण्यांस तुह्मास आधीकार नाहीं केल्यास जबाबदार तुह्मी आहां जीनगी जबाबदार नाहीं. ही नोटीस लीहून दिली सही ३-७-१९१३

दस्तूर नारायणसींग वा॥ तारासींग.

सही.

महादु वा॥ कीटकुल माळी द. खु.
नो. नं १२

## नोटीस

रा० चांदमल हिरालाल मारवाडी रा० किनगांवजटू ता० मेहेकर जि० बुलडाणा

यांसः—

खालीं सही करणार याजकडून नोटीस देण्यात येते कीं तुह्मी माझे मालकीचा नंबर मौजे भुमराळ प्र० लोणार येथील शेत सर्वे नंबर ७०-७१ एकर २०८१९ व १०८१९ यातील एक द्वितिआंश हिशाचा झाडा सुद्धां तुह्मास विकत रुपये १२०० ठरला आहे त्यचे इसाराबद्दल रुपये २९ दिले आहे पावती घेतली आहे पावती घेते वेळेस बाकीचे रुपये तीन दिवसांनीं रुपये देऊन खरेदीखत करून घेण्याचें ठरलें त्याप्रमाणें मुदतींत रुपये दिलें नाहीं व खरेदीखत करून घेतलें नाहीं तरी त्यास अंदाज १ महिना झाला आहे तरी आतां तुमचे इसाराबद्दल व खरेदीबद्दल मी जबाबदार राहिलो नाहीं कारण सवदा ठरल्याप्रमाणें वागले नाहीं सबब इसार परत देण्यास मी जबाबदार नाहीं खरेदीचा करार टळला आहे सबब खरेदीखत देण्यास तुमचा मी जबाबदार नाहीं किंवा पावती वरून दावा केल्यास त्याचे खर्चाबद्दलही मी जबाबदार नाहीं शेतही मिळणार नाहीं. कळावे ता० ३० ६ १९१३ इसवी

सही

गोविंदा वा॥ मारुती सरकळे रा० भुमराळ निशानी खुद हातचा आंगठा असे

नो० नं० १३

## नोटीस

नोटीस बेशमी गुलाबचंद पन्नालाल साहु दुकान उमरे ता० आकोट यांसः—

खालीं सही करणाराकडून नोटीस देण्यांत येते कीं, आह्मी पूर्वी ८०० रुपयांचे व्याजांत पाक खाण्याबद्दल दस्तऐवज ताबे गहाणाचा लिहून दिला. परंतु शेत माझेंच ताब्यांत आहे. त्यांत तोंडी व्याज दरमहा दर शेकडा १ रुपया प्रमाणें ठरलें. पुढें २ वर्षांनंतर तीच शेती ४९० रुपयांत तारणगहाण लिहून दिली. ता० १७ जून सन १९१३ रोज मंगळवार ते दिवशीं पचासमक्ष १६०० रुपये शेताची किंमत ठरून १०० रुपये रोख द्यावयाचे व बाकीचें तुह्मास दिलेलें ताबेगहाण तारण-गहाण दस्तऐवज खातेबाकी पट्याची फिर्यादी अशा सर्व रकमेचा आकार १६०० रु. व नगदी १०० एकूण १७०० चा ठराव झाला. पुढें तुह्मी शेत नघेण्याबद्दल कळविल्यावरून तें शेत १७०० रुपयास महादेव थुटे यास विकून त्यांचेकडून १६०० रुपयाचा हवाला देऊन शेताचें खरेदीखत झाले आणि १०० रुपये मला देणें आहेत तरी एकूण रुपये १६०० महादेव विठोबा थुटे पाटील रा० मकंपूर याजपासून व १०० रु. मजपासून आठ दिवसांचे आंत घेऊन जावे. येणें प्रमाणें तुमचे कडून न झाल्यास पुढें तुमची व्याजाबद्दल तक्रार ऐकिली जाणार नाहीं. व फिर्यादीचा खर्च मिळणार नाहीं ही नोटीस दिली. ता० ६ माहे जुलई सन १९१३ इ०

सही

विठ्ठलभट बिन सितारामभट जोशी
द. खु रा० शिवपूर ता० आकोट
पो० अडगांव

नो० नं० १४

## जाहिरात

सर्वत्र लोकांस जाहिरातिनें कळविण्यांत येते कीं मौजे ब्राह्मणवाडा ता. मुर्तिजापूर येथील भोनी मर्द आनाजी कुणबी ही कोणास ब्राह्मणवाडा येथील ती राहत असलेलें घर व तेथील शेतसर्वे नं ३ एकर गुंठे ८८९ आकार १४ व आणखी स्थावर व जगंम जिनगी गहाण खरेदी बक्षीस अगर पट्यानें वगैरे देईल तर कोणी घेऊ नये ती अती वृद्ध झाली आहे तिची बुद्धी ठिकाणावर नाहीं तरी तिचे पासून वरील इस्टेट वर लिहिलें प्रमाणें कोणी ही लिहून घेऊनये कारण सदर्हू इस्टेट लक्ष्मण आनाजी यांची आहे. सदर्हू मुलगा माझा साडूचा असून अज्ञान आहे तरी तिच्याशीं व्यवहार करणारा फसेल ह्मणून आगाऊ सूचना केली आहे. ता. ६।७।१३

सही

मनाजी वल्लद रायभान प्रधान कुणबी
रा. बोरगांव खुर्द नि. आंगठा.

नो० नं० १५

## नोटीस.

नोटीस बेशमी बुधाजी वा॥ उकर्डा तेली रा० आकोला यांसः—

खालीं सही करणार याजकडून नोटीस देण्यांत येते कीं तुह्मी ता० २९-४-१३ रोजीं आह्मास प्रामेसरी नोट ३८१ रुपये तीनशे एक्याशीची करून दिली त्याप्रमाणें रक्कम दिली नाहीं वरून बरेचवेळ मागणेही केले. तरी उपयोग झाला नाहीं त्यामुळें या नोटीशीनें कळवितो कीं रक्कम तुमचेकडेस असलेली व्याजासुद्धां आठ दिवसांत आणून द्यावी न दिल्यास २ दोन रुपये शेकड्याचे व्याजासह कोर्टांत फिर्याद करूं. नोटीसखर्च, फिर्यादखर्च घेतला जाईल. कळावें ता० १०-७ १३

बाळाआपा लक्ष्मणआपा वाणी दुकान
आकोला द० खुद

नो० नं० १६

## नोटीस

नोटीस बेशमी भिमी मर्द कडतु . रा० वडगांव हल्लीं मुक्काम खंदळ तालुके आकोट

इजला—

खालीं सही करणार याजकडून नोटीस देण्यांत येते कीं मी तुजला वागाविण्यास तयार आहे परंतु तुझी आई गुजाई मर्द इंद्रभान इनें तुजला मी आजारी असतांना घेऊन गेली व तूंही तिचे बरोबर आपले दागिन्यासह गेलीस व तुजजवळ ठेवलेले १०० रुपये तेही नेलेस तरी आतां त्या दागिन्यासह व रुपयासह परत यावें. तूं जी नोटीस दिली आहे ती अगदीं खोटी आहे. मी वागाविण्यास तयार आहे. ता० ७-७-१३

सही

सहीची निशाणी रेघ कडतु वा॥
रामजी धनगर रा० वडगांव ता०
आकोट याचे हातची असे

नो० नं० १७

## जाहीर नोटीस.

वि० सिनीअर सबजज्ज साहेब बहादूर
कोर्ट आकोला.

सक्सेशन सरटिफिकीट नंबर $\frac{३}{१९१३}$

सक्सेशन सरटीफिकीट मिळण्याचा अर्ज.

अर्जदार.

रेणी आईचें नांव भागिरथी जात मराठे राहणार आकोला तालुका व जिल्हा आकोला.

सर्वत्र लोकांस कळविण्यांत येतें कीं, वरील अर्जदार इनें सक्सेशन सरटीफिकीट मिळण्याचा अर्ज आमचे कोर्टांत ता० ८ ७।१३ ई० रोजीं दिला असून त्याची चौकशीची तारीख ९-८-१९१३ ई० ची आमचे कोर्टांत नेमिली आहे. तरी त्या तारखेस ज्याची कांहीं तक्रार असेल त्यांनीं सकाळीं १० वाजतां आमचे कोर्टांत वरील तारखेस हजर व्हावें. तसें न केल्यास पुढें कोणतीही तक्रार ऐकली जाणार नाहीं. कळावें ता० १०-७-१३

R. N. Trivedi
Senior Sub Judge
Akola

No. N. 18

अमूल्य संधी ? अप्रतीम नासिक चूर्ण ! ! अमुल्य रत्न-

## टि. सि.

### सुगंधी औषधी तपकीर.

जगत प्रसिद्ध असें हें सुगंधी तपकिर, दिर्घ काला पासून कोट्यावधि लोकांच्या मोगानंदास पात्र झाले आहे. आलीकडे सर्वत्र याचा जास्त प्रचार झाल्या कार [...] युरोप खंडांतील बहुमान्य गृहस्थांच्याही अंतःकरणांत याने मको.वनस्या [...]यीं तिटकारा उत्पन्न करून स्वतंत्रपणें त्यांना फार प्रिय झाले आहे. लक्षावधि [...]शीय लोकांनीं हे वापरून याच्या अलौकिक गुणांबद्दल आपला संतोष प्रकट [...] आहे.




मस्तकशूल, ज्ञानतंतूंची दुर्बलता, स्मरण शक्ति कमी होणें, मानसिक चिंता, आैदासिन्य, चक्कर येणें, डोळ्या पुढें अंधेरी येणें इत्यादि विकार हे सुगंधी तपकीर वापरल्यानें एका घटकेंत जातात. विद्यार्थी, शिक्षक, गवयांस, वकील, ब्यारिष्टर वगैरे सारख्या डोक्याच्याच कामाच्या मंडळींनें डोक्याचे हलके पणांसाठीं हे जरूर वापरून एक वेळां परिक्षा करून पहावी. याच्या गुणांबद्दल हजारो सार्टिफिकीटा मिळाल्या व नित्य [...]तात.

[...]प घेण्याची वेळ खेरीज करून, दिवसांतून दोनदां किंवा तिनदा ही तपकीर [...]ल्यानें मनाला आनंद वाटतो, इतर तपकीर शेरभर वापरल्या पेक्षां ही तपकीर [...]ल्यानें नाक सुगंधानें भरून जाते. एक पैशाच्या साध्या तपकीरींत आमच्या [...] तपकीरीच्या दोन चिमटी मिळविल्या असतां सर्व तपकीर सुगंधी होतें. [...]क गुणकारी व अत्यंत सुवासिक आणि अगदीं अल्प किंमतींत मिळणारी [...] प्रकाराची तपकीर इतर ठिकाणीं आज पर्यंत कोणाच्याही पाहण्यांत [...] नसेल. स्वाभाविक गुणकारी व चित्ताकर्षक असें हे [...] प्रिय सुगंधी तपकीर केवल एक चिमटीभर ओढल्याने सुगंधभारित असे [...] नाकांतून बाहेर येतात व त्या योगानें मनाला उल्हास वाटतो.

कि. एक डबीस ०-४-० व्हि० पी० चार्ज ०-३-०
' डझन डबीस २-६-० " " " ०-६-०

सुचना ) पत्र लिहुन मागविणारानी न्युसपेपराचें नांव व तपकीरीची किंमत [...]न कळविकें असतां वरील किंमती प्रमाणें पाठविले जातील ' किंवा तसें न [...]स अडिचरुपयांस पाठविलें जाईल. पत्र लिहिणारानीं इंग्रजींत अथवा [...]ध अक्षरानीं आमचेवर दयाकरून लिहावें.

स्वतः तयार करणारे :— टि० सी० नागलिंगप्पा आणि कंपनी'
नं० २० सिंगण्णनरोड.
नो० नं० १९ पार्क टाऊन पोष्ट' मद्रास

## जाहीरात.

### !!! डाक्टर जी. बी. यांची सुवासिक औषधी तपकीर !!!

!! मागवा व खात्री करून घ्या !!

ह्या तपकीरीचा शेंकडों लोकांनीं अनुभव घेऊन सर्टिफिकीटें दिलीं आहेत




शिवाय वैद्य व डाक्टर लोकांचीं या तपकीरीच्या स्वच्छते बद्दल व गुणाबद्दल अनुकूल मतें आह्माकडे आलेलीं आहेत. ही तपकीर पिनस. अर्धशिशी, डोके दुखणें व डोक्यांतील मेंदुचे इतर सर्व रोग तसेंच पडसें वगैरे विकारांवर फार वस्ताद आहे. ही ओढल्यानें मेंदुतील दूषित धातु पातळ होऊन नेत्रद्वारें व नाकांतून बाहेर निघून जाते व मस्तकांतील मेंदु स्वच्छ होऊन बुद्धी व ज्ञान तीव्र व वृद्धिंगत होतात. मज्जेसंबंधीं रोग दूर करणारें या सारखें सुलभ साधन दुसरें नाहीं. साधी तपकीर दहा वीस वेळां ओढून जो उपयोग होतो तो गुण आमची ही सुवासिक तपकीर फक्त दोन तीन वेळ ओढल्यानें करते. एक पैशाच्या साध्या तपकीरींत आमच्या सुवासिक तपकीरीच्या दोन चिमटी मिळविल्या असतां सर्व तपकीर सुगंधी होते. शेंकडों लोक ही तपकीर आपल्या कुटुंबांत नित्य लागणाऱ्या औषधाप्रमाणें संग्रही ठेवतात साध्या तपकीरी प्रमाणें ह्या आमच्या तपकीरींतील सुवास व तीव्रता एकदोन दिवसांत नष्ट होत नाहींत हे गुण आमच्या तपकीरींत एक वर्षपर्यंत कायम रहातात ही तपकीर आह्मीं मोठ्या श्रमानें व वैद्यलोकांच्या सहायानें तयार करविली आहे. एक वेळ अनुभव घेऊन खात्री करून घ्यावी. एक आण्याचीं तिकीटें पाठविलीं असतां नमुन्याची बाटली पाठवूं. सर्वांस घेण्यास सुलभ पडावी म्हणून हिची किंमत आह्मीं फायद्याकडे न पहातां फारच माफक ठेविली आहे.

एक बाटलीस ४ आणे व बेगी टपाल व व्ही. पी. खर्च ३ आणे
डझन बाटल्यास रु. २-८ " " " ६ आणे

सूचना ] पत्र लिहिणारानीं इंग्रजींत अथवा बालबोध लिपींत आमचेवर दया करून लिहीणें कळावें. तपकीर मिळण्याचें ठिकाणः—


गुरुबसवा आणि कंपनी,
नो. नं. २० सावकार पेठ, मद्रास

### सर्वोत्तम रक्तशुद्धि करणारा



डॉ० वामन गोपाळ यांचा

## आयोडाईज्ड सार्सापरिला.



हा सार्सापरिला हजारों लोकांनीं पन्नास वर्षें अनुभवून उत्तम रक्तशुद्धि करणारा आहे असें ठरविलें आहे. ह्या औषधानें रक्तशुद्धिवर गुण वाटून इतर रक्तशुद्धि करणाऱ्या औषधांत "सर्वोत्तम" अशी ख्याति मिळविली आहे जुना संधिवात, त्वचे संबंधें रोग अशक्तता यांवर हें रामबाण औषध असून त्याचा सर्व जगभर फार वाखाणणी होत आहे. गुणकारी शक्ति देणारें औषध आहे याच्या दररोजच्या सेवनानें मन आणि शरीर यांस उल्हास वाटतो. किंमत एका बाटलीस सव्वा रुपया शिवाय टपाल खर्च.

औषध मिळण्याचें ठिकाणः-- डॉ. गौतमराव केशव
५६३ ठाकूरद्वार मुंबई.

नो० नं० २१

## Oriental Government Security LIFE ASSURANCE COMPANY Limited

ESTABLISHED IN 1874.
R. Paterson, Brown, Manager,
HEAD OFFICE—BOMBAY

### FUNDS Exceed 4 crores

CLAIMS PAID FOR OVER 3 CRORES
IMMEDIATE SETTLEMENT OF CLAIMS

If there be one thing of more importance than another in connection with Life Assurance, it is when claims arise, that the amount due under the policy be paid to the Claimants at the earliest possible date. This the Directors of the 'Oriental' keep well before them and act up to, treating their clients with the utmost liberality.

UNQUESTIONABLE SECURITY.

It is not sufficient to read that a Company's funds amount to a given sum, but it is essential to know how such Funds are invested:—if in miscellaneous and risky investments or how secured.

The Funds of the 'Oriental' are invested in Government Securities and lodged with the Government Official Trustee of Bombay in terms of the Company's Trust Deed, as Security for Claims arising through decease of assured lives, and endowment policies matured.

Government Officers, Professional men, Tradesmen and others by employing portion of their annual income or profits in effecting life policies, at once create a fund equivalent to the savings of many years.

No man can be sure how long he will live. and although he may save money yet, if he dies early before he had time to save much, his wife and family may be in distress. Life Assurance is a means by which this danger is got over. Life being so uncertain, the sooner a man makes up his mind to assure his life the better. Once satisfied of the propriety of the step, do not delay. There are numerous instances in the records of the Oriental' where the delay of a month or less, has left the family without the intended provision.

INFLUENTIAL AND ENERGETIC AGENTS WANTED. For terms please apply to the undersigned.

Prospectuses, forms and any further information can be obtained on application to

M. DESOUZA,
CHIEF AGENT, Nagpur

CHIEF AGENCY FOR C. P., BERAR & KHANDESH No. No 22

हें पत्र आकोला येथें कैलासवासी खंडेराव बाळाजी फडके यांच्या वऱ्हाडसमाचार छापखान्यांत नारायण खंडेराव फडके यांनीं सदाशिवआश्रमांत छापून प्रसिद्ध केलें.

Regd. NO N. 150

# वऱ्हाडसमाचार.

Berar Samachar.

वर्ष ४७ ]  आकोला-- सोमवार तारीख २१ माहे जुलै सन १९१३ इ०  [ अंक २८

## वर्गणीचे दर

आकोल्यांतील लोकांस........१ रुपया
बाहेरगांवीं ट हां. ........ २ रुपये
वर्गणी आगाउच घेण्याची वहिवाट ठेविली आहे.

## नोटीशीचे दर

दर ओळीस दीड आणा.
हेडिंगच्या दोन ओळी धरल्या जातील. नोटीस सुवाच्य असली पाहिजे.

सूचनाः- गुरुवारच्या आंत येणाऱ्या नोटीसा त्याच आठवड्यांत घेतल्या जातील. पाठिमागून येणाऱ्या नोटिसास स्पेशल चार्ज पडेल.

### जाहिरात

मुंबई ब्यांकेची सेव्हिंग ब्यांक.

ह्या बँकेंत खालीं दिलेल्या अटींवर ठेवी ठेवितां येतात.

कोणत्याही वर्षाचे १ ले जानेवारी आणि ३१ डिसेंबर याच्या दरम्यान एक हजार रुपये पर्यंत पैसा ठेविला जाईल.

ठेवी दोन अथवा अधिक इसमांच्या नांवावर ठेवतां येतील आणि तो पैसा त्यापैकीं एकास अथवा जास्त इसमांस अगर त्यापैकीं मयताचे मागें राहील त्यांस काढतां येईल

व्याज दर साल दर शेंकडा तीन रुपयाप्रमाणें दिलें जाईल. व्याजाची आकारणी प्रत्येक महिन्याची भी कनिष्ठ शिल्लक असेल तिजवर केली जाईल. मात्र पांच हजारावरील शिल्लक रकमेस व्याज नाहीं. नियमांच्या प्रती बँकेंत अर्ज केला असतां मिळतील.

मुंबई ब्यांक G. A. Phillips.
आकोला ९।९।०९ एजंट
नं १

## मुंबई बँकचें सोनें.

मुंबई बँकचा छाप असलेल्या उत्तम कसाच्या सोन्याच्या चिपा मुंबई बँकच्या आकोले आणि उमरावती येथील ऑफिसांत विकत मिळतील. गिऱ्हाइकानें जास्त माहिती करितां बँकेंत तपास करावा.

एका चिपचें वजन २६३ तोळे असतें.

साधारण भाव वऱ्हाड समाचार वर्तमानपत्रांत व जारभाव ह्या सदराखालीं सांपडेल.

मुंबई बँक G. A. Phillips.
आकोला २१-९-१० एजंट
नं० नं० २

### जाहिरात

सर्वत्र लोकांस जाहीर करण्यांत येते कीं श्रीसमर्थ गजानन आवलीया महाराज संस्थान शेगांव यांचे समाधीचें ( मंदिराचें ) काम बांधण्याचे सुरू आहे याच लागणारा खर्च फार असून तो लोकाश्रयावर अवलंबून आहे. वर्गणीचें कामीं संस्था कडून हरी कुकाजी आणि बंकटलाल भवानीदास व गोपाळ मारुती लउळ व रावजी नारायण महाजन यांस वसूल करतें नेमिले गेले आहे. कांहीं लोक हरदास संन्याशी वगैरे हे या मठाचें कामासाठीं वर्गणी वसूल करतात ह्मणून समजतें त्यांस वर्गणी न देतां या वरील ४ इसमासच वर्गणी देत जावी. चार इसमाबद्दल ज्यास संशय येईल त्यांनीं वर्गणी शेगांवकर भिकाजी खंडुजी पाटील यांचे दुकानी मनीऑर्डरीनें पाठवावी. व्यवस्थापक

रामचंद्र कृष्णाजी पाटील
नं० नं० ३

### वऱ्हाडांत खात्रीची उत्तम नवीन सोय.

## खरे गारेचे थंडचष्मे

आम्हीं मुद्दाम वऱ्हाडच्या लोकांकरितां डोळे तपासून सर्व तऱ्हेच्या फ्रेमीसहित खरे गारेचे थंड चष्मे माफक दरानें विकण्याचें दुकान काढलें आहे. मुंबई वगैरे मोठ्या ठिकाणच्या भपक्यावर मंडळी कशी फसतात हें सर्वांना श्रुतच आहे सर्व गरजूंनी अनुभव घेवून पहावा.

गोपाळ पांडुरंग आणि कंपनी
नं० नं० ४ आकोला

### अपूर्व लाभ ! अपूर्व संधी ! ! अपूर्व संधी !!!

## उत्तम कल्प.

जर तुह्माला तरुण दिसावे अशी इच्छा असेल तर आमचा कल्प वापरा. त्या योगें केंस काळे कुळकुळीत होऊन ते पुनः पांढरे होत नाहीत इतकेंच नाहीं तर त्या पासून केंस रेशमासारखे मऊ होतात. पुष्कळ श्रीमंत लोकांनीं आमचा कल्प वापरून अनुभव पाहिलेला आहे एक पेटी ६ महिने पुरते. त्याच्या उपयोगापुढें किंमत फारच स्वस्त ह्मणजे दर पेटीस फक्त १ च रुपया ठेविला आहे. ट. ह. निराळा

आमचा पत्ता

हजरत मौलाना आशके यासदानी
जनाब हाजी पीर सयद
नूरशाह हामदानी
पोष्ट ३ मुंबई
नं० नं० ५

## अजब करामत.

**बालक्षुधा निवारण** - लहान मुलांस वर दूध घालण्यानें होणारें संग्रहणी, उडतें इत्यादि सर्व विकारावर हें सत्व अप्रतीम गुणकारी आहे. मुलें हैंसेनें घेतात. किं० १ तो० ८२ आणे.

**हेमसुधा**- धपणी हा रोग पुष्कळ स्त्रियांना जडतो. यावर खात्रीचा उपाय न मिळाल्यानें कित्येक स्त्रिया कुचमत आहेत. या औषधानें कसलीही धुपणी नाहींशी होऊन अंगांत तरतरी येते परमा व गरमी यावर ही याचा तात्काल गुण येतो. कित्येकांची खात्री झाली आहे किं० १ बाटलीस ३ रु०

**कामधेनुगुटिका** - अलीकडील निराळ्या परिस्थितीमुळें लेकुरवाळ्या आयांना दूध येत नाहीं. त्यामुळें मुलें अशक्त व रोगी होतात. याचे सेवनानें पुष्कळ निरोगी दूध येते. पुष्कळांना अनुभव आला आहे. किं० ३ गोळ्यास ८६ आणे.

जानकीबाई गानडे } सांगली,
नर्स ॲण्ड मिड्वाइफ. }
नं० नं० ६

### रामबाण उपाय.

### रक्तपिती व कोड

दहाहजार पुड्याफुकट. आह्मीं आमच्या औषधाची खात्री पटावी ह्मणून १०००० नमुन्याच्या पुड्या करण्याचें योजिलें आहे या पुड्या वरील महारोग दुरुस्त होण्यासारख्या आहेत. हे त्या निःसंशय सिद्ध करितील. या पुड्या वापरून अनुभव पहावा ह्मणजे खात्री होईल. नमुन्याच्या पुडीची किंमत फक्त ८० ठेविली आहे. ही किंमत फक्त टपाल हशील ... घेणें ... ... ... ज्यांना मदत ...

२ आह्मीं रक्तपिती, कोड, हे कसे उद्भवतात त्याची शुश्रुषा कशी करावी? वगैरे माहितीचे इंग्रजी व बंगाली भाषेंत पुस्तक तयार केलें आहे तेंही पण गरजूंनीं अवश्य वाचण्या लायक आहे. ह्मणजे त्या पासून त्याचे संबंधीं रोगाची पूर्ण माहिती होईल किंमत फक्त ट. ख. सह ॥=सर्व पत्र व्यवहार इंग्रजींत करावा.

पण्डीत कृपाराम
८ नेदीबागानेलेन पो. साल्किया जि. हावरा.
नं० नं०७

### शास्त्रोक्त वशीकरणयंत्र

इसे सीधी भुजामें बांधकर जिस किसी स्त्रीपुरुषसे प्रीति करोगे तो वही आपके वशमें होगा दक्षिणा ।॥। पैकिंग डा० म० जुदा पत्र हिन्दी इंग्रेजीमें देना. डोडूवाला चमत्कारी कार्यालय जलेसर जिला एटा
नं. नंबर ८

### अनायासें देवदर्शन.

**नोटपेपर्सः**- श्री गजानन, दत्तात्रय, मारुती, शंकर व नरहरी या पैकीं कोणती ही एक मूर्ती रंगांत दाबून उठाव (एम्बास) छापलेले, १०० प्रेमनाईट नोट पेपर्स व त्याच्या बेताची चौकोनी १०० कव्हरें प्रत्येकीं किंमत ८८ व्हीपीनें ८१२ दोन्हीमिळून किंमत रु. १ व्हीपीनें रु. १८६ ... वाढला आहे.




... दांत मुकदम्याची संख्या ... मी झालेली आहे. याला कारण ... सांपत्तिक स्थिति, कां ... पराङ्मुखता आहे तें कळत ... कारण असेल तर ती अभि... ष्ट झटली पाहिजे.

### सर्वत्र एसाची लागवड

पताः- बेंद्रे आणि ... ता० २७ जूनच्या
नं० नं० ९

### हिंदुस्थानावर अरिष्ट.

हिंदुस्थानातील रहिवाशांच्या पाठीस ज्वर व हिंवताप यांचें अरिष्ट सदोदित लागलेलें आहे पण त्याचा प्रतिकार करण्यास बाटलीवाला यांचें हिंवतापाचें औषध व गोळ्या हे रामबाण आहेत. ताप किंवा शीतज्वर येणारसें वाटतांच हें औषध घ्यावें. किं. १ रु

**बाटलीवाला यांच्या निस्तेज लोकांसाठीं शक्तिकारक गोळ्या**

हें औषध घेतल्यानें मागवटा, मेंदूचे जबरदस्त ... अशक्तता व क्षयरोगाचें अमेरिका ... त्याप्रमाणें अंगांणे इ. इ. विकार तावडतोब दूर होतात. किं रु. १॥८

**बाटलीवाला यांचें दंतमंजन.**

हें दंतमंजन मायफळाशीं कांहीं इंग्रजी औषधांचा वैद्यकीय रीतीनें मिलाफ करून बनविलें आहे. किं. ८४

**बाटलीवाल्याचें गजकर्णावर मलम**

यानें गजकर्ण, कुजली खरूज याचा विकार एका दिवसांत नाहींसा होतो. किं. ८४

हीं औषधें सर्व औषधी विकणाऱ्या दुकानावर व डॉ. एच. एल बाटलीवाला जे. पी. मु वरली लेबोरेटरी दादर, मुंबई यांजकडे मिळतात.
नं० नं० १०

## विनंतीपत्र

सा. न. वि. वि.

अकोलें येथें भरलेल्या महाराष्ट्र साहित्य संमेलनाच्या स्वागतकमेटीची सभा ता. २२ जुलै १९१३ मंगळवार या दिवशीं संध्याकाळीं सहा वाजतां रा. रा. महाजनांच्या वरीं भरेल; त्यावेळीं सभासदांनीं अवश्य येण्याचें करावें ही विनंती.

**सभेंत होणारीं कामें—**

१ रिपोर्ट वाचणें व मंजूर करणें.

२ प्रांतिक साहित्य परिषद् स्थापण्याचा विचार करणें.

३ साहित्य संमेलनाचा रिपोर्ट छापण्याबद्दल मुख्य सभेला वर्गणी देणें.

४ इतर सूचना.

वि. मो. महाजनि

अकोलें ता. १६ जुलै सन १९१३.

ता. क. हें पत्र साहित्य हिताचिंतकांस दाखवून त्यांना बरोबर घेऊन यावें.

वि. मो. म.

## पत्रव्यवहार

इनारदार व इनामदार सभा यवतमाळ वार्षिक—सभेचे प्रोसिडिंग ता० १२-७-१३ ई. सभेचे अध्यक्ष रावसाहिब बळवंत रामचंद्र लांडगे इनारदार सोनवाढोना हे होते.

मिळ झाले:— परिय कृष्णाजी को१९११ ई० रिपोर्ट व त्या धित्रन दाखविला व ठराव रा० पो आणिला व रझाक यांचें मतें पास झाला.

२ इनारदार सभेकरितां यवतमाळ येथें एक दिवाणखाना बांधिण्यांत यावा व त्याचे एस्टिमेट व नकाशा तयार करवून सेक्रेटरीनें मॅनेजिंग कमेटीच्या सहायानें तो बांधण्याचे कामीं यावर्षीं तूर्त २५०० रुपये पर्यंत खर्च करावे. हा ठराव रा० नारायण नागोबा गांवडे यांनीं आणिला व त्यास रा० दौलत सदाशिव मानकर यांना अनुमोदन दिल्यावर तो सर्वानुमतें पास झाला.

३ मे० कमिशनर साहेबांकडून आलेल्या फारेस्टच्या खनिज द्रव्य विषयक सरकिलर पत्रास उत्तर ह्मणून एक अर्ज वकिलाच्या सल्लेनें मे० कमिशनर साहेबांकडे पाठविण्यास व्हाइसचेअरमन व सेक्रेटरी यांस अधिकार असावा ठराव आणणार रा० गंगाजी पाटील मानकर व अनुमोदन देणार रा० मुस्ताफाखान ठराव सर्वानुमतें पास झाला.

४ पुढील वर्षापासून सभेच्या खर्चाचें बजेट तयार करण्यांत यावें ही सूचना डा० अबदुलरझाक यांनीं आणिली व तीस रा० गणेश एकनाथ नि० पारवेकर देशमुख यांनीं अनुमोदन दिल्यावर हा ठराव पास झाला.

५ या पुढील शिल्लक कोआपरेटिव्ह क्रेडिट सोसाइटीचे बॅंकेंत ठेवतां येण्यासारखी आहे कीं काय याबद्दल त्या बॅंकेचे नियम मागवून मॅनेजिंग कमेटीनें विचार करावा व ते नियम सोइस्कर असल्यास त्या बॅंकेंत शिल्लक ठेवण्यांत यावी. हा ठराव रावसाहेब लांडगे यांनीं सभेपुढें आणिला व त्यास डा० अबदुलरझाक यांचे अनुमोदन मिळून तो पास झाला.

६ इनारदार सभेच्या मॅनेजिंग कमेटींत १ मि० वाजदहुसेन इ० मेंढला २ मि० शेखदाऊद इ० बिरकुंड या दोन गृहस्थांचीं नांवें जास्त घालावीं हा ठराव रा० दत्तात्रेय कृ० काणे यांनीं आणिला व त्यास शेठ मूळचंद गुळराज यांनीं अनुमोदन दिल्यावर तो पास झाला.

७ इनारदार सभेकरितां नियमांचा मसुदा तयार करवून तो पुढील जनरल सभेपुढे तिच्या पसंती करितां ठेवावा. हा ठराव मि. अबदुलशहा यांनीं आणिला व त्यास शेट फुलमल बकतावरमल यांचें अनुमोदन मिळाल्यावर तो सर्वानुमतें पास झाला.

(८) मि. बळवंत रामचंद्र लांडगे इनारदार सभेचे व्हाइस चेअरमन यांस सरकारनें रावसाहेब ही पदवी दिल्याबद्दल ही सभा सरकारचे आभार मानिते व रावसाहेबांचें अभिनंदन करिते. हा ठराव रा. यशवंतराव देवराव देशमुख यांनीं सभेपुढें आणिला व त्यास रा. सखाराम पाटील धानोरकर यांनीं अनुमोदन दिल्यावर तो सर्वानुमतें पास झाला.

(९) मध्यप्रांत व वऱ्हाड यांतील कायदेकौन्सिलांत सभासद होण्याकरितां रावसाहेब लांडगे यांनीं जमिनदारां तर्फे उमेदवार ह्मणून उभें राहावें अशी ह्या सभेची इच्छा आहे. व निवडणुकीचे वेळीं त्यांस इनारदार लोकांनीं मतें देऊन इतर जमिनदारमतदारांचीं मतें मिळवून देण्याविषयीं कोशीस करावी. हा ठराव रा. दत्तात्रेय कृ. काणे यानीं सभेपुढें आणिला व त्यास डा. अबदुलरझाक यांचें अनुमोदन मिळून तो सर्वानुमतें पास झाला.

(१०) सभेचे कारकून रा. रामचंद्र गंगाधर भागवत यांस त्याचे चांगले कामगिरी बद्दल सन. १९१२-१३ साला करितां ६० रुपये बोनस देण्यांत यावें. हा ठराव अध्यक्ष राव साहेब लांडगे यांनीं सभे पुढें मांडिला व त्यांस सर्वांचें अनुमोदन मिळून तो पास झाला.

(११.) वऱ्हाड समाचार पत्रांत वेळोवेळीं इनारदारसभे संबंधाची हकीकत येत जाईल करितां सर्व इनारदारांनीं त्या वर्तमान पत्राचे वर्गणीदार व्हावें. हा ठराव रा. सेक्रेटरी काणे यानीं सभे पुढें आणिला व त्यास पांढरकवड्याचे रा. हंसाजी भगवंत यांचें अनुमोदन मिळून तो पास झाला.

(१२.) या सभेचे अध्यक्ष व इनारदार सभेचे व्हाइस चेअरमन रावसाहेब बळवंत रामचंद्र लांडगे, आडिटर रा. यशवंतराव देशमुख व सेक्रेटरी रा. दत्तात्रेय कृष्णाजी काणे यांनीं इनारदार सभेचें काम फार आस्थापूर्वक केलें याबद्दल सभेच्या तर्फेनें त्यांचे आभार मानण्याचा ठराव ... भगवंत बाजीराव मानकर इनारदार मोहोरा यांनीं सभेपुढें आणिला व त्यास बीरकुंडचे इनारदार मि. शेख दाऊद यानीं अनुमोदन दिल्यावर तो सर्वानुमतें पास झाला.

या प्रमाणें सभेचे काम झाल्यानंतर सभेचे अध्यक्ष रावसाहेब लांडगे यांनीं आजरोजीं मे. डेपुटी कमिशनर साहेब यवतमाळ यांचे कचेरींत त्यांनीं बोलावलेल्या इनारदारांच्या सभेंत (१) इनाऱ्यांतील पटवाऱ्यांची नेमणूक (२) इनाऱ्यांतील शेतीच्या बांधवाखळया (३) इनाऱ्यांतील असामी लोकांकडून वसूल होणे राहिलेला मक्ता या तीन बाबींबद्दल साहेब बहादुरा कडून विचारपूस होणार आहे. असे सांगितलें. व त्याबद्दल सभेंत वाटाघाट होऊन सभेचें मत ठरविण्यांत आलें.

नंतर पानसुपारी अत्तर गुलाब होऊन सभा बरखास्त झाली.

Sd/ B. R. Landge
व्हाइस चेअरमन
इनारदार सभा यवतमाळ

# वऱ्हाडसमाचार

आषाढ वद्य १ शके १८३५ प्रमादी

## जुनें कां नवें?

कालमान ज्या प्रमाणें फिरत जातें त्या प्रमाणें लोकांच्या विचारांचा ओघही बदलत असतो. एक काळ असा होता कीं, त्या वेळीं ‘ सुधारणा ’ हा शब्द लोकांत अत्यंत अप्रिय होता. सुधारक ह्मणजे नास्तिक, धर्म बुडवे, जुन्या अचारविचारांना लाथा हाणारे, पुराणसंस्थांचे विध्वंसक असे या विसाव्या शतकांतले राक्षसच अशी भाबड्या लोकांची प्रामाणिकपणाची समजूत होती. या समजुतीला दृढ करण्यासारखें त्या काळच्या कांहीं सुधारकांच्या हातून वर्तनही घडलें होतें. पण हळूं हळूं सुधारकांविषयींच्या तिरस्काराची ही तीव्रता कमी झाली. सुधारकांचें आचरण जरी आपणांस मान्य नसले तरी त्यांचे विचार युक्तिसंगत व विचार करण्यासारखे आहेत. केवळ जुन्यांचा संहार करावा असा कांहीं सुधारणेचा उद्देश नाहीं, तर लोकांची उन्नती व्हावी हेंच सुधारणा इच्छिते, मात्र ही उन्नति घडवून आणण्यातें योग्य मार्ग सुधारकांना अद्याप दिसूं लागले नाहींत, असें लोकांना वाटूं लागलें. याच वेळेला असेंही ह्मणणारा एक पंथ निघाला कीं सुधारक ह्मणतात तें सगळें कांहीं बरोबर आहे. पण ते नव्यानव्या संस्था निर्माण करूं पाहतात, त्यापेक्षां जुन्या संस्थानाच हातीं घेऊन त्यांचा जिर्णोद्धार करतील तर बरें. नदीला आपल्या अनेक वर्षे ठरून गेलेल्या जुन्या पात्रांतून वाहणें सोपें जातें, तसें जुन्या संस्थामध्यें नवें चैतन्य घातल्यानें सुधारणेचा विषम मार्ग सुगम होईल. हें मत अद्यापही पुष्कळ प्रचलित आहे. सकृद्दर्शनी हें मत कोणालाही ग्राह्य वाटण्यासारखें दिसतें. पण ही गोष्ट निसर्गाच्या नियमाला धरून आहे काय? नदीचेंच उदाहरण घ्या. एकादी नदी एकदां आपलें पात्र टाकून दुसरीकडे गेल्यावर पुनः पूर्वीच्या पात्रांतून वाहूं लागल्य चें एक तरी उदाहरण आहे काय? कुडींतून प्राण निघून गेल्यावर पुनः तिच्यांतच दुसऱ्या प्राणाचा संचार झालेला कधीं ऐकिला आहे काय? इंग्रजींत एक ह्मण आहे कीं जुन्या शिशींत नवें मद्य उपयोगाचें नाहीं. ‘ जुने डोळे व नवे तमाशे करून चालावयाचें नाहीं. ’ असें स्वामी रामतीर्थ यांनीं ह्मटलें आहे त्यांत पुष्कळ तथ्य आहे. कित्येक लोक असे आहेत कीं त्यांना प्राचीन काळच्या संस्थांची पुनः स्थापना करण्यांतच देशाचें हित एकवटलें आहे असें वाटतें. जुन्या स्थितीचें नुसतें स्मरण सुद्धां त्यांच्या अगांत स्फुरण चढवितें. नवीन स्थितीमध्यें आपलें जुनें घर पाठीवर घेऊन जाणाऱ्या या गोगलगाईच होत. किंवा जुन्या खातेवह्या चाळून मनाचें समाधान करून घेणारे हे दिवाळखोर पेढीवाले ह्मटले पाहिजेत. सध्याच्या नव्या परिस्थितींत कोणत्या जुन्या संस्थांचा जीर्णोद्धार आपणांला करतां येण्यासारखा आहे? तुह्मी का वैदिक काळच्या नियोगासारख्या प्राचीन सामाजिक चाली पुनः सुरू करणार? कां अरण्यांत मठांची स्थापना करून होमहवन करीत बसणार? कां चातुर्वर्ण्याच्या कडक मर्यादा पुनः घालणार? कां ब्राह्मणाचें वर्चस्व पुनः स्थापित करूं पाहणार? कां शूद्राला छळणार? का पूर्वींची राजनीति अजून ही अनुकरणीय आहे असें इंग्रज राज्य कर्त्यांना सांगणार? कां पूर्वींचें अष्टविध विवाह प्रकार पुनः प्रचलित करणार? कां अलीकडच्या शास्त्रीय शोधांना नादान ठरवून हजारों वर्षां मागच्या शास्त्रज्ञानाला कवटाळणार? तुह्मी करणार तरी काय? कोणत्या जुन्या संस्थांचा जीर्णोद्धार हल्लींच्या काळांत शक्य वाहितावह आहे असें तुह्मांला वाटतें? गेल्या शेंदोडशें वर्षांत आमचा देश, आमचा समाज, आमचे रीत रिवाज, आमची भाषा, आमचीं धर्ममतें, आमच्या जीवनाचा मार्ग, आमच्या संस्था या सर्वांतच इतकें परिवर्तन घडलें आहे कीं त्यांत जुन्यांची नुसती ओळखसुद्धां पटण्याची मारामार? अशी स्थिति असतां सध्याच्या काळीं जुनें कीं नवें हा प्रश्नच कसा उपस्थित होतो' हें आह्मांस कळत नाहीं. नवा काळ नव्या संस्था' हें मार्गदर्शक वाक्यच आह्मी आमच्या डोळ्यांपुढें ठेविलें आहे. जुन्यांचा जीर्णोद्धार करण्याच्या मोहास आमचीं मनें वश न होतील तरच सद्यः कालानुरूप अशी कांहीं उन्नतीची गोष्ट आमचे हातून होईल. घडनवें नाहीं, घडजुनें नाहीं अशा तऱ्हेच जुन्याचा जीर्णोद्धाराचा मार्ग सध्याच्या काळीं अगदीं उपयोगाचा नाहीं. ‘हिंदुर्नयवनः’ असा प्रकार केव्हां ही देशाला अपायकारकच होणार. ह्मणून समाजाला आमची अशी विनंति आहे कीं जुन्याचा काळ गेला. त्या काळांत जुन्या संस्थांनीं आपली कामगिरी बजावली. आतां नव्या काळांत नव्या संस्था व नवे नियम पुढें आले पाहिजेत व नव्या तरुण लोकांनीं या संस्था चालविण्याची जबाबदारी पुढें होऊन आपले अंगावर घेतली पाहिजे. आह्माला

जुनें पाहिजे, जुनें पाहिजे, असें जे ह्मणणारे आहेत त्यांना एक तर आपले वरची जबाबदारी कळत नसली पाहिजे, किंवा स्वतःच्या कर्तृत्वशक्तीचा प्रत्यय त्यांचे ठायीं नसला पाहिजे. एरव्हीं भिन्नकाळीं व भिन्न परीस्थितींत पूर्वीचाच धोपट मार्ग आपण पत्करावा व बालपणचें अंगडें टोपडें समाजाच्या वाढत्या अंगांत घालण्याचा प्रयत्न करावा या सारखें हास्यास्पद मत गंभीरपणानें पुढें येणें आणि त्याला सुशिक्षितांचें पाठबळ मिळणें शक्य नाहीं.

## पूर्वीचा दाखला.

हिंदुस्थानांत प्राचीन काळीं काय नव्हतें? वेदांत आगगाड्या, तारायंत्रें, एक्स नांवाचे किरण वगैरेंचा शोध या पूर्वीच लागलेला आहे. पण पूर्वीचा दाखला देऊन हल्लींच्या भिन्न परिस्थितींत त्याचें अनुकरण करण्याची शिफारस करण्याकडे मनुष्य स्वभावाची प्रवृत्तिच असते. या प्रवृत्तीला अनुसरून कलकत्त्याच्या इंडियन वर्ल्डच्या संपादकांनीं पूर्वीच्या काळीं न्याय व अंमलबजावणी हीं खातीं पृथक् होती हें सिद्ध करण्याचा अट्टहास केला आहे. शास्त्रवचनांचा आधार हव्या त्या गोष्टीला मिळण्यासारखा असतो. मात्र कालांत व परिस्थितींत पडलेलें अंतर लक्षांत घेऊन कोणत्याही शास्त्रवचनाचा विचार मनुष्यानें करावयास पाहिजे. पूर्वीच्या काळचे न्यायाधिकारी ह्मणजे राजा स्वतः त्याचे मंत्री व ग्रामपंचायती हे असत. ग्रामसंस्थाकडे पोलिसाची कामगिरी कधीही नसे. त्याच प्रमाणें राजाला किंवा मंत्र्याला स्वत एखाद्यावर गुन्ह्याचा आरोप ठेविता येत नसे, किंवा एकदा खटला सुरू झाला ह्मणजे तो बंद पाडण्याचा ही अधिकार नव्हता. ज्या अंमलदाराकडे गुन्हा शोधण्याचें काम त्याच्याचकडे आरोपीची चौकशी करण्याचें व न्याय देण्याचें काम नसे. हिंदूलोकांची जुनी परंपरा अशी असल्यामुळें न्याय व अंमलबजावणी हीं खातीं एकत्र ठेवणें हेंच त्यांना आवडतें व त्यांच्या आवडीकडे लक्ष देऊनच हिंदुस्थान सरकारनें हल्लींची व्यवस्था केली आहे असें ह्मणणें ह्मणजे केवळ मतलबीपणा ऊर्फ लबाडी आहे. हिंदूलोकाची आवड निवड मुसलमान, पारशी, ख्रिस्ती वगैरे इतर धर्मी लोकांवर तुह्मी कशी लादली असें विचारणारा कोणी अद्याप भेटला नाहीं काय? असल्यास त्यांना काय उत्तरें देण्यांत आलीं तें कळणें इष्ट आहे.

## चीनची वर्तमानस्थिति.

भविष्यवाद्याचें काम कठीण तर खरेंच, पण आपल्या डोळ्यासमोर घडणाऱ्या गोष्टी वरून भाविष्याविषयीं युक्तिसंगत अनुमान काढणें हें काम तितकें कठीण नाहीं. आज चीनमध्यें काय प्रकार चालला आहे. चीननें प्रजासत्ताक राज्यपद्धति स्वीकारली, त्याला वर्ष होऊन गेलें, पण अजून युरोपियन राष्ट्रें अद्याप त्याला प्रजासत्ताक स्वरूपांत ओळखूं लागलीं नाहींत. अमेरिकेचे अध्यक्ष डा० विल्सन यांनीं मात्र चीनचें स्वागत उत्तम प्रकारें करून कर्जाच्या संबंधांत मित्र कार्य केल्याचें श्रेय संपादलें आहे. चीनच्या पार्लमेंटचे अपर व लोअर हाउस असें दोन भाग आहेत. या दुसऱ्या हाउस मध्यें पांचशें सभासद असून त्यांच्यांत डेमोक्रॅटिक, रिपाब्लिकन आणि प्रगतिपर असे तीन पक्ष आहेत. हल्लीं यु-आन-शिकाई हे दुसऱ्या पक्षाचे नायक आहेत. यांच्या स्वभावाची एक खुबी ही आहे कीं त्यांना विरोध केलेला खपत नाहीं. यामुळें आपल्या वाटेंतला सुन्यातसेनचा काटा काढून टाकण्यासाठीं त्यांनी एक निंद्य प्रयत्नही केला होता असें ह्मणतात! युरोपियन राष्ट्रांपासून कर्ज घेण्याचे बाबतींत सुद्धां युआन-शिकाईचें वर्तन धरसोडीचें होतें. त्यांच्या कृत्याला पार्लमेंटची मंजुरी नव्हती, इतकेंच नाहीं, तर पार्लमेंट नकोनको ह्मणत असतां त्यांनीं कर्जरोख्यावर सही केली! युआन शिकाईनें पार्लमेंटशीं प्रतारणा करून मिळविलेलें कर्ज आपणांस मंजूर नाहीं असें सेनेटच्या उपाध्यक्षांना जाहीर करावें लागलें. हें कर्ज नव्हे, युरोपियन राजनीतीचें उंदार्चें पिलूं घरांत घुसवून घेणें आहे ही गोष्ट चिनी लोक जाणून आहेत. युरोपियन सावकाराची चालाखीही सांगण्यासारखी आहे कुळाला कर्ज देणारे हिंदुस्थानचे सावकार शेवटीं त्यांचें रक्त शोषण्यास मागें पुढें पाहत नाहींत अशी ओरड करणारांनीं युरोपियन सावकारांची पुढील कृति नीट डोळे उघडून पहावी अशी आमची सूचना आहे. या सावकारांनीं चीनला अडीच कोट पौंड कर्ज पंनास वर्षांच्या मुदतीनें शें० ५ टक्के व्याजानें देण्याचें कबूल केलें आहे. पण या अडीच कोटीपैकीं चीनच्या हातांत फक्त दोन कोटी दहा लक्ष पौंडच पडावयाचे आहेत! शिवाय दर तीन वर्षांनीं नवा करारनामा करून घेतवेळीं हे सावकार वाव घेतल्याशिवाय थोडेच सोडणार आहेत? अशा नुकसानकारक अटी युआन शिकाई सारख्या मुत्सद्यानें कशा कबूल केल्या याचेंच आश्चर्य वाटतें. पण ह्मण आहे ना? आधीं बुद्धि जाते आणि मागून भांडवल जाते. ही ह्मण चीन संबंधानें दुर्दैवानें खरी ठरणार कीं काय अशी भीती पुष्कळांना वाटत आहे. आपणाला सैन्याचें चांगलें पाठबळ असल्याशिवाय आपली दांडगाई चालावयाची नाहीं हें यु—आन—शिकाईला पूर्णपणें कळून चुकलें आहे, व सैन्य जय्यत ठेवण्यास कर्ज काढण्याशिवाय यु-आन-शिकाईला अन्य मार्ग नव्हता. खरें पाहिलें तर युआनशिकाईचे ग्रह उच्चीचे आहेत तोंपर्यंत चीनला शांतता सुख मिळणें असंभवनीय आहे हें त्यानें चुकतेंच घडलेल्या फाशी प्रकरणावरून व त्यामुळें उत्पन्न झालेल्या असंतोषावरून स्पष्ट दिसत आहे. चीनांत एक राज्यक्रांति झाली खरी, पण तिची पूर्णपणें प्राणप्रतिष्ठा दुसऱ्या एका राज्यक्रांतीच्याच हातून व्हावयाची असा ईश्वरी नेमानेम दिसतो.

## कापणीचें यंत्र.

नर्मदा रीपर नांवाचें एक कापणी करण्याचें यंत्र निघालें आहे. याविषयींची कांहीं माहिती थोडे दिवसांपूर्वी आमच्या पत्रांत येऊन गेली आहेच. या यंत्राचा उपयोग कसा करावा तें दाखविण्यासाठीं जबलपूर येथील शेतकी खात्याचे डेप्युटी डायरेक्टर जनरल साहेब लवकरच एक वर्ग सुरु करणार आहेत असें समजतें. हा वर्ग गव्हाचा पेरा झाल्यानंतर ह्मणजे नोव्हेंबर महिन्याच्या सुमाराला उघडला जाईल. यात कापणीच्या यंत्राचा उपयोग कसा करावा तें गवतावर प्रत्यक्ष प्रयोग करून दाखविण्यांत येईल. त्याच प्रमाणें यंत्र कसें जुळवावें, व त्याची मोडतोड झाल्यास त्याची डागडुजी कशी करावी याविषयीं ही सांगण्यांत येणार आहे. सुमारें दहाबारा दिवसांत हा शिक्षणक्रम पुरा होईल. या यंत्राचा निरनिराळ्या जिल्ह्यांतल्या शेतकी सभांनीं अनुभव पाहिल्या वरून पुढील गोष्टी शाबीत झाल्या आहेत- (१) शेतकऱ्याला बैल सरळ हाकतां आले ह्मणजे हें यंत्र चालविण्यास दुसरी अडचण कांहीं नाहीं. यंत्राच्या आवाजाला पहिल्यानें बैल बिचकतात, पण संवयीनें ही अडचण दूर होते. (२) वाऱ्याच्या दिशेनें हें यंत्र नेऊं नये; तसेंच गारा, पाऊस किंवा तुफानी वारा यांनीं पिकें लवलीं असतील तेव्हां ही या यंत्राचा उपयोग करूं नये. या गोष्टी लक्षात घेऊन यंत्राचा उपयोग केला तर त्याच्या योगानें मजुरीचा खर्च पुष्कळच वाचतो असें अनुभवास येतें. हें यंत्र जड आहे अशी कांहींची तक्रार आहे आणि कांहीं अंशीं ती खरीही आहे. पण यंत्र जर चांगलं मजबूत व टिकाऊ पाहिजे तर तें जड होणारच. शिवाय हें यंत्र फार जड आहे असें नाहीं. साधारण बैलाचीजोडी या यंत्रानें तीन चार तास काम सहज करूं शकते. तीन जोड्या ठेवल्या तर रोज १० तास काम करण्यास हरकत नाहीं. या यंत्रानें कापणी करण्यांत आणखी फायदा हा आहे कीं पिकें अगदीं जमिनीपर्यंत कापलीं गेल्यामुळें अधिक भुसा पदरांत पडतो व झाडें मुळासकट उपटली जात नाहींत. अर्थातच धान्यांत माती मिसळण्याचा संभव फार कमी आहे. हीं यंत्रें जबलपूर व होशंगाबाद येथील सरकारी शेतांवरून ठेवण्याचा सरकारचा विचार आहे. खाजगी रीतीनें कोणास हीं यंत्रें मागावेणें असतील, किंवा यंत्राची डागडुजी वगैरे करवून घेणें असेल तर या कामीं शेतकऱ्यांना मदत करण्यास येथील कामदार तयार आहेत असें कळतें. सारांश, शास्त्रीय पद्धतीनें शेतकी करण्यापासून होणारे फायदे प्रत्यक्ष अनुभवून पाहण्याची ही संधी आमचे शेतकरी फुकट घालविणार नाहींत अशी आह्मी आशा करतों.

## न्यायखात्याचा रिपोर्ट.

मध्यप्रांताचा १९१२ सालाबद्दलचा न्यायखात्याच्या कामाचा रिपोर्ट वाचनीय आहे. त्यांत नेहमींप्रमाणें दिवाणी कज्जांची संख्या त्यांची रकमेची वाटणी, मुदत, अपिलें, वगैरे माहितीतर आहेच, पण याशिवाय गेल्या सालांत कायकाय फेरफार झाले त्याचें व प्रत्येक कामदाराच्या आजपर्यंतच्या कामाचें वर्णन आहे. गेल्या सालांत मुकदम्यांची संख्या १९११ सालापेक्षां शेंकडा १३ या प्रमाणांत उतरली. ही पैशाच्या किंवा जंगम मालकीच्या संबंधाची गोष्ट झाली. स्थावर मिळकतींबद्दलची मुकदम्यांची संख्या उलट वाढली. भंडारा जिल्ह्यांत तर एकाच जमीनदारानें गेल्या सालीं ३०० फिर्यादी लाविल्या! धाऱ्याच्या बंदोबस्तामुळें जमिनीबद्दलच्या मुकदम्यांची संख्याही वाढली आहे. गहाणाबद्दलचे मुकदमे कमी झाले. याचें कारण गहाणदार आपले जिन्नस सोडवून नेण्यास समर्थ झाले हें मानावयाचे असलें तर लोक संपन्न होत चालले आहेत असें ह्मटल्याशिवाय गत्यंतर नाहीं. प्रत्येक जिल्ह्याची कर्जबाजारी किती आहे हें दाखविणारेही एक कोष्टक दिलें आहे. त्यावरून असें दिसतें कीं नेमाडांत लोकसंख्येच्या मानानें ६९ त १ नागपूर जिल्ह्यांत ७६ पैकीं १ आणि रायपुरांत ३३८ पैकीं १ याप्रमाणें कर्ज करणाराचें प्रमाण आहे. फिर्यादीच्या रकमेचें सरासरी प्रमाण मध्यप्रांतांत व वऱ्हाडांत निरनिराळें आहे. मध्यप्रांतांत तें १४० रु. होते, आतां १४७ झालें आहे. पण वऱ्हाडांत तेंच २६० होते त्या ठिकाणीं २९२ झालें आहे. कोर्टांची संख्या वाढली आहे. तरी वऱ्हाडांत मुकदम्यांची संख्या ४को हजारानें कमी झालेली आहे. याला कारण लोकांची निकृष्ट सांपत्तिक स्थिति, कां भांडणाविषयींची पराङ्मुखता आहे तें कळत नाहीं. दुसरें कारण असेल तर ती अभिनंदनीय गोष्ट ह्मटली पाहिजे.

## कापसाची लागवड

लंडन टाइम्सपत्राच्या ता० २७ जूनच्या पुरवणींत हिंदुस्थानांतल्या कापसाच्या लागवडीसंबंधानें माहितीनें भरलेला व विचारपूर्वक लिहिलेला लेख आला आहे तो वाचनीय आहे. त्यावरून हिंदुस्थानांत पूर्वीचे काळीं कापसाची लागवड किती व कशा प्रकारें होत असे, आणि अलीकडे शास्त्रीय पद्धतीनें लागवड करूं लागल्यापासून कसे फायदे दिसूं लागले आहेत तें चांगलें कळतें. हिंदुस्थानांत कापसाची लागवड मुख्यतः मध्यप्रांत, वऱ्हाड, भडोच, धारवाड व संयुक्तप्रांताचा कांहीं भाग या ठिकाणीं होत असते. हिंदुस्थानांतल्या या प्रांतांना जबरदस्त प्रतिस्पर्धी ह्मटला ह्मणजे एकट अमेरिका देशच आहे. [illegible] प्रतिस्पर्ध्याच्या अंगची उद्योगपरता, त्याचें शास्त्रीयज्ञान, व सरकारचें साह्य यांच्या योगानें तो आमच्या फार पुढें गेला आहे. १८ व्या शतकाच्या अखेरीस विलायतेस जाणाऱ्या एकंदर कापसां पैकीं ७२९६४३ पौंड कापूस हिंदुस्थानांतून व ९९३२२६३ पौंड कापूस अमेरिकेंतून गेला होता. पुढें अमेरिकेंतल्या संस्थानांतून यादवी माजून युद्धाचा प्रसंग आला, तेव्हां अमेरिकन माल इंग्लंडांत फारसा गेला नाहीं. त्यावेळीं हिंदुस्थानची निर्गत वाढून अर्धा अधिक कापूस एकट्या हिंदुस्थानांतून गेला. पण लवकरच अमे

लोकांनीं दीर्घोद्योगाच्या योगानें आपली नू सावरून धरली, आणि शास्त्रीय क्षणाच्या प्रसारानें अमेरिकन शेतकऱ्यांना गला हात दिल्यामुळें अमेरिकन काप- न सुधारणा होऊन त्याला चांगला भाव येऊं लागला. हिंदुस्थान मात्र या तींत स्वस्थ बसून राहिला. हिंदुस्थानच्या कऱ्यांची अज्ञान स्थिति जी सतराव्या कांत होती ती अद्याप ही तशीच है. अर्थातच कापूस पिकविण्याच्या नव्या त्रीय पद्धतीशीं त्यांचा बिलकुल परि- झालेला नाहीं. अलीकडे दहापांच त कापसाचें बियाणें निवडणें वगैरे ह्या गोष्टींत सरकारी शेतकी खात्या- न शेतकऱ्यांना उपयुक्त ज्ञान व साह्य ठ लागलें आहे. तेव्हां कापसाच्या ला- डींत सुधारणा होऊन पीक चांगलें व र कशानें येईल या गोष्टीकडे सुशि- त लोकांचें लक्ष लागूं लागलें आहे अभिनंदनीय गोष्ट आहे. ही अभिनं- य स्थिति उत्तरोत्तर वाढत गेली तर कांतरानें तरी हिंदुस्थान अमेरिकेशीं टक्कर यास समर्थ होईल. विलायतेंत जरी मांला अधिक कापूस पाठवितां आला ीं, तरी देशांतल्या देशांत गिरण्यांची वृद्धि होऊन येथला कापूस येथील ण्यांतच खपेल. सारांश, कापसाच्या ावडीसंबंधानें उज्वल भविष्यकाल हिंदु- नापुढें आहे. मात्र तो नजीक आण- स आपण तत्परतेनें व कळकळीनें त्न केले पाहिजेत.

## तुर्की--बाल्कन युद्ध.

या युद्धाला गेल्या दोन तीन आठ- यांत अगदीं अनपेक्षित असें विचित्र रूप प्राप्त झालें आहे. अनपेक्षित ह्मण- ण्याचें कारण कीं तुर्कस्थान व बाल्कन स्थानें यांच्यामध्यें तह ठरविण्याकरितां न येथें जी परिषद भरली होती ्या कामाचा निकाल सर एडवर्ड ग्रे ्या आग्रहामुळें शेवटीं असा ठरविण्यांत ला होता कीं आड्रिआनोपल बल्गेरियाने वें, जानीनावस्क्रीट ही ग्रीसनें संभा- वीं, आलबानियाला स्वतंत्रता मिळावी इनोस-मीडी याच्या मागचा सगळा श तुर्कस्थानकडे असावा. या तहाच्या ी नक्की ठरून तहनाम्यावर सह्या हो- ाचें तेवढें राहिलें होतें व ह्या सर्वांना त असा तह ठरविण्याचें श्रेय सर एड ग्रे यांच्या पदरीं पडून त्यांच्या मुत्स- ीरीची प्रशंसा सर्व जगभर झाली होती ा दैवयोग विचित्र ह्मटला पाहिजे. बाल्कन थानांत आपआपसांत यादवी सुरू झाली. यादवीच्या मुळाशीं सर्विया होतें. र्वियाचा बल्गेरियाशीं झालेला गुप्त तह यतेवेळीं पुढें आला व सर एडवर्ड ग्रे ीं बसविलेली घडी उलगडून एकच ळ सुरू झाला. तुर्क आणि बाल्कन वें झाले नव्हते असें भयंकर युद्ध आप- पसांत सुरू झालें. आणि नुकत्याच आ- य. खबरेवरून कळतें कीं बाल्कन थानांच्या या यादवीचा फायदा घेऊन ाश होऊन पडलेल्या तुर्कांत चैतन्य न झालें आहे व आपलें नष्ट झालेलें वैभव व गेलेला प्रांत पुनः मिळवितां येईल अशी आशा त्याला आतां वाटूं ला- गली आहे. तुर्कांनीं आपलें सैन्य चातल- जा येथील छावणींतून बाहेर काढून कूच करण्याचा हुकुम फर्मावला आहे. बाल्कन संस्थानांत एकोपा होता, तोंपर्यंत तुर्कस्था- नची जेवढी दुर्दशा देवाला करता आली तेवढी त्यानें केली. पण आतां तुर्कस्थानला उच्च ग्रह आले आहेत असें दिसतें. बाल्कन संस्थानांतल्या यादवीमुळें तुर्कस्थानचा उद्देश सर्वांशीं नाहीं तरी पुष्कळ अंशीं तरी सफल होईल असा पुष्कळांचा अजमास आहे. मुसलमान लोक तर ह्मणूं लागले आहेत कीं युरोपांतला अर्धचंद्र आतां अस्ता- स जाण्याची भीती उरली नाहीं. तुर्क लोकांना भरंवसा वाटत आहे कीं आपण धर्मरक्षणाकरितां रक्तपात करीत आहों, तेव्हां आपल्या रक्षणाची काळजी अल्लाला आहेच आणि या धार्मिक भावनेनें तुर्कांच्या अंगांत आवेशानें पुनः संचार करून त्यांना रणांगणावर आणिलें आहे. या खेपेस आतां कसा काय रंग उडतो तें पाहण्यासाठीं अर्थातच सारें जग अत्यंत उत्सुक झालें आहे.

## वाङ्मयाचें अनिष्ट वळण

इंग्रजी वाङ्मयाशीं होत असलेला आमचा वाढता परिचय आणि अनिर्बंध ग्रंथकर्तृत्व यांचा सध्याच्या मराठी वाङ्मयावर अनिष्ट परिणाम होत आहे ही गोष्ट आह्मी अनेक वेळां वाचकांच्या निदर्शनास आणिली आहे. पैकीं पहिलें कारण जसें मराठी वाङ्मयास हानिकर तसेंच अन्य प्रकारें हितावहही असल्यामुळें व कांहीं अंशीं परिस्थितीमुळें ते अपरिहार्य असल्यामुळें इंग्रजी वाङ्मयाचा मराठी वाङ्मयावर सुपरिणाम तेवढा घडेल व दुष्परिणाम टळेल या गोष्टीकडे विद्वानांचें लक्ष जाणें अत्यंत अवश्य आहे. आमच्या मराठी कादंबऱ्यांच्या संबंधांत तर हा दुष्परिणाम अगदीं स्पष्ट दिसूं लागला आहे. ज्याला मराठी समाज, व चालीरीति याचें सूक्ष्म अवलोकन करण्याची यत्किंचितही पात्रता नाहीं, किंवा तिकडे ज्यांचें पूर्ण दुर्लक्ष आहे अशा कित्येक लेखकांनीं इंग्रजी कादंबऱ्या हातीं घेऊन त्यांना मराठी पोशाख चढविण्याचा सपाटा चाल- विला आहे. त्यामुळें युरोपियन तऱ्हेचा प्रणय, युरोपियन पद्धती प्रमाणें विवाहा- पूर्वी प्रणयी जनांची भेट व त्यांचे संलाप आणि विवाहोत्तर त्यांची संसार करण्याची विचित्र पद्धति यामुळें आमचा कादंबरी- ग्रंथसमूह इतका दूषित झाला आहे कीं आमच्या समाजाचें खरें चित्र ज्यांत प्रामा- णिकपणानें रेखाटलें आहे अशी कादंबरी किंवा गोष्ट बहुतेक दुर्मिळच झाली आहे असें ह्मटलें तरी चालेल. आमच्याच वाङ्- मयाची अशी दुर्दशा झाली आहे असें नाहीं. बंगाली भाषेंतल्या नाट्यविषयक वाङ्मयाला अशीच दुःस्थिति प्राप्त झालेली आहे. दिनाजपूर येथें भरलेल्या साहित्य- संमेलनाचे अध्यक्ष बाबू आशुतोष चौधरी यांनीं या दुष्परिणामाचा निषेध आपल्या भाषणांत अत्यंत जोरानें केला असून नामांकित लेखकांनीं तरी या अत्यंत हानिकारक अनुवाद प्रवृत्ती पासून अलिप्त राहावें अशी गंभीर सावधागिरीची सूचना केली आहे. सध्यां बंगाली लेखकमंडळापुढें हा गंभीर प्रश्न विचारासाठीं आलेला आहे. त्याचा आमचे बंगाली बंधु कसा काय निकाल लावतात व ही होत असलेली हानि निवारण्याचा कोणता उपाय योजतात इकडे सर्वांचे डोळे लागले आहेत. आमच्या- मतें हल्लीं मासिकपुस्तकांतून हव्या त्या लेखकाचा जो निर्बंध संचार होऊं लागला आहे त्याचा हा परिणाम आहे हा परि- णाम टाळावयाचा असेल तर उत्तम कुशल लेखकाचेच लेख व तेही आपल्या सामा- जिक परिस्थितींशीं व आचारविचारांशीं जुळतील असे असल्यास आपल्या पुस्तकांत घ्यावयाचे व इतरांना मज्जाव करावयाचा असा निश्चय संपादकांनीं करावयास पाहिजे. ते तसें न करतील तर असे भेडगुजरी लेख घालणाऱ्या मासिकांना वाचकांनीं तरी बहिष्कार घातला पाहिजे. असें कांहीं केल्याशिवाय या प्रवृत्तीला आळा बसणार नाहीं.

## श्री दयाळनाथांची कविता

हें पुस्तक रा० रा० अच्युत सिताराम साठे सबजज्ज, उमरावती, सुंदर निळकंठ पांडे वकील. दर्यापूर, आणि पांडुरंग सखाराम अग्निहोत्री पेनशनदार-तहशीलदार, आकोला या तीन सद्गृहस्थांनीं फार परिश्रम करून या वैदर्भकवींचे समग्रकाव्य पुस्तक रूपानें छापण्याचा संकल्प केला होता. तो त्यांचा संकल्प सिद्धीस जाऊन एक सुंदर पुस्तक जगापुढें येत आहे हें कळविण्यास फार आनंद वाटतो. या ग्रंथाला त्यांनीं वैदर्भकाव्य संग्रहाचा प्रथम गुच्छ अशी अन्वर्थक संज्ञा दिली असून दुसरा गुच्छ श्री० देवनाथांच्या कवितेचा असून तो मुद्रणयंत्राच्याद्वारें सुंदर व मनोहर असा होऊन जगापुढें येण्याच्या मार्गांत आहे. गतवर्षी येथील रसिकसाहित्य परिषदेंत रा० रा० अच्युतराव साठे यांच्या प्रेमळ व भक्तिरसानें ओथंबलेल्या वाणीनें श्रीदयाळनाथाच्या काव्याचें हृदय जेव्हां लोक निदर्शनास आलें तेव्हांच एक प्रकारची उत्कंठा व सहृदयता परिस्फुट झाली. आह्मांस आतां पूर्ण भरंवसा आहे कीं वरील त्रिवर्गाच्या परिश्रमाचें चीज होईल अशा रितीचा उदार आश्रय रसिक वाचक या पुस्तकाला देतील इतकेंच नाहीं तर त्या पुस्तकाच्या माननें व गुणगुण्यानें आपली आध्यात्मिक उन्नती करून घेतील. पुस्त- काची छापणी वगैरे सुंदर असून किंमत १ रुपया आहे. हें पुस्तक वरील ग्रंथ- प्रकाशकाकडे व तसेंच ग्राहकांच्या सोयी साठीं आमच्या छाप- खान्यांत विक्रीला ठेविलेलीं आहेत. या पुस्तकाच्या उत्पन्नांतून धनलाभ करून घे- ण्याची कोणाचीच इच्छा नसून वैदर्भ काव्याचें प्रकाशन अधिकाधीक करण्याचा वरील त्रिवर्ग गृहस्थांचा मनोदय आहे हें एथें नमूद केलें ह्मणजे पुरें आहे. या प्रस्तुतच्या प्रथम गुच्छाकडे पाहून त्याच्या मधुर सुवासाच्या लहरींतच मोठ्या आनं- दानें वरील तिघा काव्यप्रिय विद्याभिलाषी गृहस्थांचें अभिनंदन करितों.

# वऱ्हाडवृत्त.

**हवामान–** गेल्या आषाढी पौर्णिमेला पावसानें सर्वत्र आनंदी आनंदाची वृष्टी केली. या पौर्णिमेच्या पर्जन्याचा ठोकताळा असा आहे कीं आबादानी व धनधान्य समृद्धि विपूल होतील. नद्यानाले पुरांनीं रमणीय दिसूं लागले आहेत. गेगराईच्या अभावामुळें आरोग्याची वृद्धि संतोष- कारक आहे. एकंदर पाणी १४ इंच झालें आहे.

रा. रा. बी. पी. स्टांडन कामिशनर साहेब यांची वार्षिक तपासणी चालूं आहे. शेतकी मंडळें स्थापित करण्यासंबंधानें वि- चार करण्यासाठीं राजश्री आलन डिपुटी डायरेक्टर यांस मुद्दाम बोलावण्यांत आलें असून मे. कमिशनर साहेबांच्या बंगल्यावर पुढील कार्याच्या रूपरेषा ठरविण्यांत येणार आहेत.

रा. रा. माल्कम डिपुटी कांसरव्हेटर, यवतमाळ यांस स्पेशल ड्यूटीवर हेड आ- फिसांत बदलण्यांत आलें.

रा. रा. वुड्स डायरेक्टर, शेतीखातें यांस १९ महिन्यांची रजा या महिन्याच्या अखेरी पासून देण्यांत येणार आहे.

रा. रा. अठवले आफि. नाय. तह- शीलदार चांदूर यांस ३ रे माजीस्ट्रेटाचा अधिकार देण्यांत आला.

रा. रा. जे. टेंपल रेलवे रेसिडेंट इंजि- निअर आकोला यांस ३ वर्ग माजिस्ट्रे- टीचा अधिकार देण्यांत आला.

रा. रा. डी. चिश्लोम सब डिव्हीजनल माजिस्ट्रेट, खामगांव यांस आसि. सेशन जज्जाचे अधिकार देण्यांत आले.

रा. रा. केशव बाळकृष्ण चिटणीस, नायब तहशीलदार यांस जळगांव येथें तह- शीलदार नेमण्यांत आलें.

बेळगांवकर संगीत नाटक मंडळीनें संत कबीर या नाटकाचा प्रयोग गेल्या शनि- वारीं पुनः करून दाखविला. हा नवा खेळ रा. रा. दामोदर विश्वनाथ नेवाळकर यानीं तयार केलेला असून चांगला बोध- प्रद आहे. राजश्री नेवाळकर हे आपलीं पद्यें एखाद्या तज्ज्ञकवी कडून नीटनेटकीं करून घेतील तर यांच्या कल्पनेला शब्द- सृष्टीनें सुंदर स्वरूप येईल. व नाटक कंपनी जर पूर्व रात्रीं खेळ लवकर सुरू करून वेळेला महत्व देईल तर प्रेक्षकांची ही नाराजी होणार नाहीं.

## आकोला बाजारभाव

| | | | |
|---|---|---|---|
| हुंडी दर्शनी | | | १००॥ |
| सोनें | | | २४८≡ |
| चांदी | | | ८० |
| ज्वारी नवी | ८० | ते | ८९ |
| गहुं काठे | १०० | | १०२॥ |
| गहुं बनशी | ११९ | | १२९ |
| जवस | १२२ | | १२८ |
| तेल | | | ८ |
| सरकी | | | ११= |
| तीळ | ७। | | ७॥। |
| कापूस | ९७ | | ९८ |
| नो. नं. १६ ... जीन | | | ७८ |

## जाहीरात.

धी अकोला नेटिव्ह काटन जिनिंग, प्रेसींग, आणि स्पिनींग कंपनी लिमिटेड अकोला (वऱ्हाड)

सर्वत्र लोकांस कळविण्यांत येते कीं, वरील कंपनीनें, ज्या गृहस्थाकडून, रकमा यावयाच्या होत्या त्यांच्यावर फिर्यादी करून खाली दिलेले हुकुमनामे मिळविले आहेत. सदर्हु हुकुमनामे, तारिख २७ माहे जुलई रोज रविवारीं सकाळीं ९ वाजतां कंपनीचें ऑफिसांत जाहीर लिलावानें विकले जाणार आहेत. ते ज्या कोणास घ्यावयाचे असतील त्यांनीं त्या दिवशीं वरील ठिकाणीं हजर व्हावें, ज्यांस स्वतः हजर राहतां येणार नाहीं त्यांनीं पत्रानी मागणी करावी.

१. प्रतिवादी विठ्ठल जयराम बोकारे राहणार तुमसर तालुका व जिल्हा भंडारा मध्यप्रांत- मे० सबजजसाहेब अकोला यांचे कोर्टातील सिव्हिल सुट नंबर ३१९ सन १९११ हुकुमनाम्याची तारीख १९ माहे आगष्ट सन १९१२ रकमरूपये ११९२- १२- ६-

२. प्रतिवादी नंदलाल मोतीलाल मारवाडी राहणार इंदुर- मे० स्मालकाज-कोर्ट जज्जसाहेब अकोला यांचे कोर्टातील सिव्हिलसुट नंबर १६७९ सन १९१० हुकुमनाम्याची तारीख ३ माहे दिसेंबर सन १९१० रकम रुपये १०९- ७- ६.

No. No. 11. K. G. Damle.

अकोला—

तारीख ९ माहे जुलई सन १९१३ ई. चेअरमन बोर्ड ऑफ लिक्विडेटर्स

---

## नोटीस

नोटीस बेशमी राजश्री कृष्णाजी वा॥ खंडुजी पाटील दुकान दिग्रस यांसी खालीं सही करणार याजकडुन नोटीस देण्यांत येतेकीं आह्मी तुमचे पासून मौजे कादळी येथील ६ शेतें विकत किमत रुपये ७९०० हजारास घेतले त्या पैकीं ३५०० हजार रोख नगदी दिलें आणि ४०० हजार रुपयाचा दस्तवैज करून दिला व त्याचे व्याज दरमहा दरशेंकडा ।॥। प्रमाणें देण्याचे ठरलें व दस्तैवजाचे करारावर तुह्मी वरील शेताचा राजीनामा देऊन वर्ग आमचे नांवचा करून द्यावाव एकंदर रुपये द्यावे असें ठरले होतें ह्मणून आह्मी आपले गीरणीवर बोझे गाळून वरील एकंदर रकमेचें व्याज ३३० आणि मुद्दला पैकीं २००० हजार वसुल दिला व बाकी राहिलेले रुपये २००० श्रीराम मारवाडी यांचे दुकानांतून उचलून घ्यावे व राजीनामा देण्यास चलावे ह्मणुन पुष्कळ वेळा आपणास सांगितले परंतु आपण तसे केलें नाहीं हल्ली आपणास कळावें कीं आपली रकम रुपये २००० हजार आपणास देण्याकरितां श्रीराम मारवाडी यांचे दुकानावर धरवर ठेविली आहे तरी शेताचे वर्ग करून देऊन आपली रकम परभारे उचलून घ्यावी तसें नकेल्यास साल गुदस्ता पासून ते शेतांचा राजीनामा व कबुलायत होई पर्यंत आपलें रकमेचें व्याज मिळणार नाहीं व कदाचित आपण दावा कराल तर दाव्याचे खर्चा बद्दल आह्मी जबाबदार राहणार नाहीं आपली रकम १। वर्षापासून आह्मी दुसऱ्याचें व्याजी घेऊन तयार ठेविली आहे तें आपणास कळावें. ता. ३०।६।१९१३

दस्तुर रामजी वा॥ बाळाजी राहणार कांदळी

सहीची निशाणी बाळाजी वा॥ हानवता यांची खुद असे.

नो० नं० १२

---

## नोटीस

नोटीस बेशमी शेखकरीम वा॥ शेख आबास आतार मुसलमान रा० हिवरखेड रूपराव ता० आकोट

यांसः—

नोटीस देणार खालीं सही करणार नोटीस देण्यांत येते कीं माझी सर्व जिनगीचें वाटणी पत्रक तारीख ७ माहे मे सन १९१३ इ. रोजीं तुह्मी मला ऊलट पलट समजावून व मला धमकी देऊन साधे कागदावर बिन नोंदलेलें लिहुन घेतलें आहे तो माझा मुलगा नामें दाउद वा॥ शेख मयबु हा अज्ञान आहे तों पर्यंत मला वाटणी करण्याचा कांहीं एक हक्क नाहीं तर लिहीलेलें वाटणी पत्रक रद्द समजावे. शेते आणि घर याचे वर तुह्मी बिलकूल ताबा करूं नये तुह्मांस जें कांहीं करणें असेल तें कोर्ट मार्फत करावे व माझे सर्व घेण्या देण्या-बद्दलचे स्टांप कागद खरीदी वगैरे आणि जे हुंडीचे रुपये एक हजार १००० असें घेतले आहे ते तुह्मी ही नोटीस पावल्यापासून आठ दिवसाचे आंत मला द्यावें न दिल्यास कायद्याप्रमाणें तजवीज केली जाईल. सर्व इस्टेटीवर तुमचा कांहीं हक्क नाहीं ती सर्व इस्टेट अज्ञानाचे बापानीं कमावली आहे ही नोटीस लिहून दिली कळावें ता० ११ माहे जुलई सन १९१३ इसवी.

दस्तुर नारायण सीताराम पटवारी खंदळ

सही

उमगावची मर्द शेख मयबु मुसलमान आतार नि० खु० नि० हातची बांगडी असून हातचा आंगठा आहे

नो. नं. १३

---

## जाहीर नोटीस

खालीं सही करणार याजकडून नोटीस सर्वत्र लोकास कळविण्यांत येते कीं माझा नातु नारायण वल्द गंगाराम उर्फ मराजी सदार रा. सेनोरी प्र० ता० मुर्तिजापूर जि० आकोला हा अज्ञान आहे व तो अलिकडे सुमारे एक दीडवर्षापासून आमचे जुमानित नाहीं. तरी यामुळें त्याच्याशी कोणीही देवघेवीचा व्यवहार करूं नये. केल्यास तो मझे इस्टेटीस लागू होणार नाहीं व त्याबद्दल मी अगर माझीं मुलें कोणत्याही प्रकारें जबाबदार राहणार नाहींत. कळावें ता. ११-७-१३ इ. सही

सुरेभान माहादाजी सदार

द० खु० मु. आकोला

नो० नं० १४

---

## जाहीर नोटीस.

सर्वत्र लोकांस कळविण्यांत येते कीं मी माझे तर्फे मारुती खुशाल नाईक रा० पिंपळगांव काळे यांस मी कुल-मुखत्यार नेमले होते परंतु अलीकडेस ६ महिन्यापासून तो माझे ह्मटल्याप्रमाणें ऐकत नाहीं व आपले मनास वाटेल त्याप्रमाणें वर्तन करितो. सबब त्याचे मुखत्यारपत्र मी ६ महिन्यापासून रद्द केले आहे. तरी त्याच्यासी माझे नांवावर कोणीही व्यवहार करूं नये. केल्यास त्याची जबाबदारी माझेवर नाहीं मी त्याचे मुखत्यारपत्र रद्द केले आहे. कळावें ता. १२-७-१३

सही

सोनी मर्द जानकीराम कळसकार रा. पिंपळगांव काळे निशाणी

नो. नं. १५ हातची बांगडी

---

## नोटीस

बजी मर्द छोगालाल श्रावगी रा. कजबे जामोद ता. जळगांव ईस रुपचंद वा॥ तुकाराम पाटील रा. शेवगे बु॥ ता. जळगांव याजकडून या नोटीशीनें कळविण्यांत येते कीं, तुह्मी अजमासें १०।१२ दिवस जाहले मयत जानजी भगवान रा. शेवगे बु॥ याचे नांवची एक रुपये २ चा स्टांप मिळवून त्यावर रुपये ३७५ रुपयाचा खोटा दस्तऐवज जानजी भगवानजी याचे नांवचा तयार केल्याचे आह्मांस समजते. सदर्हू जानजी हा मरण पावल्यास बरेंच महिने जाहले असे असून आलिकडे तो हयात नसता त्याचे नांवचा खोटा दस्तऐवज तयार करून घेतला आहे असे कळते. मी सदर्हू मयत जानजी याचा वारस असून मला बुडविण्याचे कपट बुद्धीनें दुसऱ्या लबाड लोकांचे नादीं लागून तुह्मी हा दस्तऐवज बनावट तयार केला असावा असें वाटते तरी तसें असल्यास तो तुह्मास माझे विरुद्ध कायद्या प्रमाणें उपयोगांत आणता येणार नाहीं. या उपर तुह्मी तसे केल्यास आपण फौजदारी गुन्ह्यांस पात्र व्हाल हे आपणास या नोटीशीनें कळविले आहे. कळावें ता० ९।७।१३ इ. सही

रुपचंद वा॥ तुकाराम पाटील

नो. नं. १६ नि० रेघ

---

## नोटीस

रा. रा. शंकर पांडोबा जात सोनार रा. किन्हीराजा ता॥. वासीम यांस खालीं सही करणार इजकडून ह्या नोटीसीनें कळमी करण्यांत येत आहे. तुह्मी माझे लग्नाचे नवरे असून अजमास १४ वर्ष पासून मजला टाकून दिलें आहे आणि तुह्मी दुसरी बायको केली आहे. तुह्मांस कित्येक वेळा नोटीसा केल्या परंतु तुह्मी माझा कांहीच निकाल करीत नाहीं. तरी ह्या नोटीसीनें कळविण्यांत येत आहे कीं आज पावतों खावटी बद्दल ९६० रुपये साहुकारास देऊन मजला घेऊन जावें. अगर तुह्मांस नांदविण्याचे नसल्यास तसें मला कळवावे. सदरहू प्रो. तुह्मी ८ दीवसांत न केल्यास ही नोटीस फारखती समजून व तुह्मास माझी गरज नाहीं असे समजून मी दुसरा घरठाव करीन. पुढें तुमचा लग्नाचा हक्क मजवर राहणार नाहीं असे समजावे. कळावें. ता. २६।६।१३

ई. द. आमदखा पी. रा. आकोला

### ताजा कलम.

मी ज्या ज्या साहुकाराचें कर्ज काढीलें आहे त्याची जबाबदारी तुह्मांवर राहील. जर तुह्मास माझी गरज नसल्यास फारकती लिहून पाठवावी. ता. २६।६।१३ ई.

सही.

बायजी मर्द शंकर द. खु.

नो० नं० १७

---

## नोटीस

नोटीस बेशमी मारुती खुशाल नाईक रा० पिंपळगांवकाळे ता० जळगांव

यांसः—

खालीं सही करणार इजकडून नोटीस देण्यांत येते कीं, तुह्मांस मी माझे तर्फे कुलमुखत्यारपत्र दिलें होतें परंतु तुह्मी माझे सांगण्याप्रमाणें ऐकत नाहीं व आपले मनास वाटेल त्यारीतीनें वागतां व माझे नावावर रा० शंकरलाल मुलतानचे दुकानाहून कांहीं रुपये नेले त्याचा ही अद्यापपर्यंत हीशेब देत नाहीं. आणि आज ६ महिने झाले आपण माझी नोकरी सोडली आहे. तरी या नोटीसीनें आपणास कळविण्यांत येते कीं आपण यापुढें माझे नांवावर मुखत्यार नात्यानें कोणताही व्यवहार करूं नये. तुमचे मुखत्यारपत्र रद्द केले आहे. व्यवहार केल्यास तो मजला कबुल होणार नाहीं व मी त्याची जबाबदार राहणार नाहीं. त्याची जबाबदारी तुमचेवर राहील आणि आपलेकडेस असलेल्या रुपयाचा हिशेब नोटीस पावल्यापासून ८ दिवसांत आणून द्यावा नाहीं तर आपलेवर योग्य कोर्टांत फिर्याद करावी लागेल कळावें ता० १२।७।१३

सही

सोनी मर्द जानकीराम कळसकार नि० हातची बांगडी

नो. नं. १८

अमूल संधी ! अप्रतीम नासिक चूर्ण ! ! अमुल्य रत्न

## टि. सि. एन

### सुगंधी औषधी तपकीर.

जगत प्रसिद्ध असें हें सुगंधी तपकिर, दिर्घ काला पासून कोण्यावधि लोकांच्या उपभोगानंदास पात्र झाले आहे. आलिकडे सर्वत्र याचा जास्त प्रचार झाल्या कारणानें युरोप खंडांतील बहुमान्य गृहस्थांच्याही अंतःकरणांत यानें मकोबनस्या विषयीं तिटकारा उत्पन्न करून स्वतंत्रपणे त्यांना फार प्रिय झाले आहे. लक्षावधि तद्देशीय लोकांनीं हे वापरून याच्या अलौकिक गुणांबद्दल आपला संतोष प्रकट केला आहे.




मस्तकशूल, ज्ञानतंतूची दुर्बलता, स्मरण शक्ति कमी होणें, मानसिक चिंता, औदासिन्य, चक्कर येणें, डोळ्या पुढें अंधेरी येणें इत्यादि विकार हे सुगंधी तपकीर वापरल्यानें एका घटकेंत जातात. विद्यार्थी, शिक्षक, गवयांस, वकील, ब्यारिष्टर वगैरे सारख्या डोक्याच्याच कामाच्या मंडळीनें डोक्याचे हलके पर्णासाठीं हे जरूर वापरून एक वेळां परिक्षा करून पहावी. याच्या गुणांबद्दल हजारो सार्टीफिकीटा मिळालया व नित्य मिळतात.

झोंप घेण्याची वेळ खेरीज करून, दिवसांतून दोनदां किंवा तिनदा ही तपकीर ओढल्यानें मनाला आनंद वाटतो, इतर तपकीर शेरभर वापरल्या पेक्षां ही तपकीर ओढल्यानें नाक सुगंधानें भरून जाते. एक पैशाच्या साध्या तपकीरींत आमच्या सुगंधी तपकीरीच्या दोन चिमटी मिळविल्या असतां सर्व तपकीर सुगंधी होतें. अचुक गुणकारी व अत्यंत सुवासिक आणि अगदीं अल्प किंमतींत मिळणारी अशीं प्रकाराची तपकीर इतर ठिकाणीं आज पर्यंत कोणाच्याही पाहण्यांत आली नसेल. स्वाभाविक गुणकारी व चित्ताकर्षक असें हे एक प्रिय सुगंधी तपकीर केवळ एक चिमटीभर ओढल्याने सुगंधभरित असें श्वास नाकांतून बाहेर येतात व त्या योगानें मनाला उल्हास वाटतो.

किं. एक डबीस ०—४—० वि० पी० चार्ज ०—२—०
' डझन डबीस २—६—० " " ०—६—०

(सुचना) पत्र लिहुन मागविणारानी न्युसपेपराचें नांव व तपकीरीची किंमत लिहुन कळविलें असतां वरील किंमती प्रमाणें पाठविले जातील' किंवा तसें न केल्यास अडिचरुपयांस पाठविलें जाईल. पत्र लिहिणारानीं इंग्रजींत अथवा बालबोध अक्षरानीं आमचेवर दयाकरून लिहावें.

स्वतः तयार करणारे :— टि० सी० नागलिंगप्पा आणि कंपनी'
नं० २० सिंगण्णनरोड.
नो० नं० १९ पार्क टाऊन पोष्ट' मद्रास



# जाहीरात.

### !!! डाक्टर जी. बी. यांची सुवासिक औषधी तपकीर !!!

!! मागवा व खात्री करून घ्या !!

ह्या तपकीरीचा शेंकडों लोकांनीं अनुभव घेऊन सर्टिफिकीटें दिलीं आहेत.




शिवाय वैद्य व डाक्टर लोकांचीं या तपकीरीच्या स्वच्छते बद्दल व गुणाबद्दल अनुकूल मतें आह्माकडे आलेलीं आहेत. ही तपकीर पिनस. अर्धाशिशी, डोके दुखणें व डोक्यांतील मेंदुचे इतर सर्व रोग तसेंच पडसें वगैरे विकारांवर फार वस्ताद आहे. ही ओढल्यानें मेंदुतील दूषित धातु पातळ होऊन नेत्रद्वारें व नाकांतून बाहेर निघून जाते व मस्तकांतील मेंदु स्वच्छ होऊन बुद्धी व ज्ञान तीव्र व वृद्धिंगत होतात. मज्जेसंबंधीं रोग दूर करणारें या सारखें सुलभ साधन दुसरें नाहीं. साधी तपकीर दहा वीस वेळां ओढून जो उपयोग होतो तो गुण आमची ही सुवासिक तपकीर फक्त दोन तीन वेळ ओढल्यानें करते. एक पैशाच्या साध्या तपकीरींत आमच्या सुवासिक तपकीरीच्या दोन चिमटी मिळविल्या असतां सर्व तपकीर सुगंधी होते. शेंकडों लोक ही तपकीर आपल्या कुटुंबांत नित्य लागणाऱ्या औषधाप्रमाणें संग्रही ठेवतात साध्या तपकीरी प्रमाणें ह्या आमच्या तपकीरींतील सुवास व तीव्रता एकदोन दिवसांत नष्ट होत नाहींत हे गुण आमच्या तपकीरींत एक वर्षपर्यंत कायम रहातात ही तपकीर आह्मीं मोठ्या श्रमानें व वैद्यलोकांच्या सहायानें तयार करविली आहे. एक वेळ अनुभव घेऊन खात्री करून घ्यावी. एक आण्याचीं तिकीटें पाठविल्यास असतां नमुन्याची बाटली पाठवूं. सर्वांस घेण्यास सुलभ पडावी ह्मणून हिची किंमत आह्मीं फायद्याकडे न पहातां फारच माफक ठेविली आहे.



एक बाटलीस ४ आणे व बंगी टपाल व व्ही. पी. खर्च ३ आणे
डझन बाटल्यास रु. २—८ " " " ६ आणे

सूचना ] पत्र लिहिणारानीं इंग्रजींत अथवा बालबोध लिपींत आमचेवर दया करून लिहीणें कळावें. तपकीर मिळण्याचें ठिकाणः—

गुरुबसवा आणि कंपनी,
नो. नं. २० सावकार पेठ, मद्रास



सर्वोत्तम रक्तशुद्धि करणारा



डॉ० वामन गोपाळ यांचा

## आयोडाईज्ड सार्सापरिला.



हा सार्सापरिला हजारों लोकांनीं पन्नास वर्षें अनुभवून उत्तम रक्तशुद्धि करणारा आहे असें ठरविलें आहे. ह्या औषधानें रक्तशुद्धिवर गुण वाटून इतर रक्तशुद्धि करणाऱ्या औषधांत "सर्वोत्तम" अशी ख्याति मिळविली आहे जुना संधिवात, त्वचे संबंधीं रोग अशक्तता यांवर हें रामबाण औषध असून त्याचा सर्व जगभर फार वाखाणणी होत आहे. गुणकारी शक्ति देणारें औषध आहे याच्या दररोजच्या सेवनानें मन आणि शरीर यांस उल्हास वाटतो. किंमत एका बाटलीस सव्वा रुपया शिवाय टपाल खर्च.

औषध मिळण्याचें ठिकाणः-- डॉ. गौतमराव केशव
५६३ ठाकूरद्वार मुंबई.

नो० नं० २१



## Oriental Government Security LIFE ASSURANCE COMPANY Limited

ESTABLISHED IN 1874.
R. Paterson, Brown, Manager,
HEAD OFFICE—BOMBAY

### FUNDS Exceed 4 crores

CLAIMS PAID FOR OVER 3 CRORES
IMMEDIATE SETTLEMENT OF CLAIMS

If there be one thing of more importance than another in connection with Life Assurance, it is when claims arise, that the amount due under the policy be paid to the Claimants at the earliest possible date. This the Directors of the 'Oriental' keep well before them and act up to, treating their clients with the utmost liberality.

UNQUESTIONABLE SECURITY.

It is not sufficient to read that a Company's funds amount to a given sum, but it is essential to know how such Funds are invested:—if in miscellaneous and risky investments or how secured.

The Funds of the 'Oriental' are invested in Government Securities and lodged with the Government Official Trustee of Bombay in terms of the Company's Trust Deed, as Security for Claims arising through deceased of assured lives, and endowment policies matured.

Government Officers, Professional men, Tradesmen and others by employing portion of their annual income or profits in effecting life policies, at once create a fund equivalent to the savings of many years.

No man can be sure how long he will live, and although he may save money yet, if he dies early before he had time to save much, his wife and family may be in distress. Life Assurance is a means by which this danger is got over. Life being so uncertain, the sooner a man makes up his mind to assure his life the better. Once satisfied of the propriety of the step, do not delay. There are numerous instances in the records of the Oriental' where the delay of a month or less, has left the family without the intended provision.

INFLUENTIAL AND ENERGETIC AGENTS WANTED. For terms please apply to the undersigned.

Prospectuses, forms and any further information can be obtained on application to

M. DESOUZA,
CHIEF AGENT, Nagpur

CHIEF AGENCY FOR C. P., BERAR & KHANDESH No. No 22


हें पत्र आकोला येथें कैलासवासी खंडेराव बाळाजी फडके यांच्या वऱ्हाडसमाचार छापखान्यांत नारायण खंडेराव फडके यांनीं सदाशिवआश्रमांत छापून प्रसिद्ध केलें.

Regd. NO N. 150

# वऱ्हाडसमाचार.

Berar Samachar.

वर्ष ४७ ] आकोला—— सोमवार तारीख २८ माहे जुलै सन १९१३ ई० [ अंक २९

## वर्गणीचे दर

आकोल्यांतील लोकांस........१ रुपया
बाहेरगांवीं ट हां. ........ २ रुपये
वर्गणी आगाउच घेण्याची वहिवाट ठेविली आहे.

## नोटीशीचे दर

दर ओळीस दीड आणा.
हेडिंगच्या दोन ओळी धरल्या जातील.
नोटीस सुवाच्य असली पाहिजे.

**सूचनाः—** गुरुवारच्या आंत येणाऱ्या नोटीसा त्याच आठवड्यांत घेतल्या जातील. पाठुदें येणाऱ्या नोटिसास स्पेशल चार्ज पडेल.

### जाहिरात

**मुंबई ब्यांकेची सेव्हिंग ब्यांक.**

ह्या बँकेंत खालीं दिलेल्या अटींवर ठेवी ठेवितां येतात.

कोणत्याही वर्षाचे १ ले जानेवारी आणि ३१ दिसेंबर याच्या दरम्यान एक हजार रुपये पर्यंत पैसा ठेविला जाईल.

ठेवी दोन अथवा अधिक इसमांच्या नांवावर ठेवतां येतील आणि तो पैसा त्यापैकीं एकास अथवा जास्त इसमांस अगर त्यापैकीं मयताचे मागें राहील त्यांस काढतां येईल

व्याज दर साल दर शेंकडा तीन रुपयाप्रमाणें दिलें जाईल. व्याजाची आकारणी प्रत्येक महिन्याची भी कनिष्ठ शिल्लक असेल तिजवर केली जाईल. मात्र पांच हजारावरील शिल्लक रकमेस व्याज नाहीं. नियमांच्या प्रती बँकेंत अर्ज केला असतां मिळतील.

मुंबई ब्यांक / G. A. Phillips.
आकोला ९.१२.०९ ( एजंट
नं १

## मुंबई बँकचें सोनें.

मुंबई बँकचा छाप असलेल्या उत्तम कसाच्या सोन्याच्या चिपा मुंबई बँकच्या आकोले आणि उमरावती येथील ऑफिसांत विकत मिळतील. गिऱ्हाइकानें जास्त माहिती कारितां बँकेंत तपास करावा.

एका चिपचें वजन २६¾ तोळे असतें. साधारण भाव वऱ्हाड समाचार वर्तमानपत्रांत बजारभाव ह्या सदराखालीं सांपडेल.

मुंबई बँक G. A. PHILLIPS.
आकोला २१-९-१० एजंट
नो० नं० २

### जाहिरात

सर्वत्र लोकांस जाहीर करण्यांत येते कीं श्रीसमर्थ गजानन आवलीया महाराज संस्थान शेगांव यांचे समाधीचें ( मंदिराचें ) काम बांधण्याचें सुरू आहे यास लागणारा खर्च फार असून तो लोकाश्रयावर अवलंबून आहे. वर्गणीचें कामीं संस्थानाकडून हरी कुकाजी आणि वेंकटलाल भवानीदास व गोपाळ मारुती लउळ व रावजी नारायण महाजन यांस वसूल करतें नेमिलें गेले आहे. कांहीं लोक हरदास संन्याशी वगैरे हे या मठाचें कामासाठीं वर्गणी वसूल करतात ह्मणून समजतें त्यांस वर्गणी न देतां या वरील ४ इसमासच वर्गणी देत जावी. चार इसमाबद्दल ज्यास संशय येईल त्यांनीं वर्गणी शेगांवकर भिकाजी खंडुजी पाटील यांचे दुकानीं मनीआर्डरीनें पाठवावी. व्यवस्थापक

रामचंद्र कृष्णाजी पाटील
नो० नं० ३

### वऱ्हाडांत खात्रीची उत्तम नवीन सोय.

## खरे गारेचे थंडचष्मे

आह्मीं मुद्दाम वऱ्हाडच्या लोकाकरितां डोळे तपासून सर्व तऱ्हेच्या फ्रेमीसहित **खरे गारेचे थंड चष्मे माफक दरानें** विकण्याचें दुकान काढलें आहे. मुंबई वगैरे मोठ्या ठिकाणच्या भपक्यावर मंडळी कशी फसतात हें सर्वांना श्रुतच आहे सर्व गरजूनीं अनुभव घेवून पहावा.

गोपाळ पांडुरंग आणि कंपनी
नो० नं० ४ आकोला

### अनेक पदवीधरांनीं चालविलेलें; लोकप्रिय

## ज्ञानमित्र मासिक

यांत अनेक विद्वान तज्ज्ञ पदवीधरांचे सोप्या भाषेत लिहिलेले निवडक शास्त्रीय लेख, बोधप्रद व सुरस गोष्टी, नवे शोध, सोपे कलाहुन्नर, स्थलवर्णनें, नामांकित कार्वेच्या प्रासादिक कविता इ० अनेक सर्वोपयोगी विषय येतात. चालू वर्ष ७ वें. **सालअखेर उत्कृष्ट कादंबरी बक्षीस.** वा. वर्गणी व्ही. पी सह फक्त दीड रुपया. नमुना अंक ८३॥ त्वरा करा!

ज्ञानमित्रकर्ते, पुणें-सिटी,
नो० नं० ५

## अजब करामत.

**बालक्षुधा निवारण—** लहान मुलांस वर दूध घालण्यानें होणारें संग्रहणी, उडतें इत्यादि सर्व विकारावर हें सत्व अप्रतीम गुणकारी आहे. मुलें हैसेनें घेतात. किं० १ तो० ८२ आणे.

**हेमसुधा—** धपणी हा रोग पुष्कळ स्त्रियांना जडतो. यावर खात्रीचा उपाय न मिळाल्यानें कित्येक स्त्रिया कुचमत आहेत. या औषधानें कसलीही धुपणी नाहींशी होऊन अंगांत तरतरी येते. परमा व गरमी यावर ही याचा तात्काल गुण येतो. कित्येकांची खात्री झाली आहे किं० १ बाटलीस ३ रु०

**कामधेनुगुटिका—** अलीकडील निरानिराळ्या परिस्थितीमुळें लेकुरवाळ्या आयांना दूध येत नाहीं. त्यामुळें मुलें अशक्त व रोगी होतात. याचे सेवनानें पुष्कळ निरोगी दूध येते. पुष्कळांना अनुभव आला आहे. किं० ३ गोळ्यास ८६ आणे.

जानकीबाई गानडे नर्स अँण्ड मिड्वाईफ. } सांगली,
नो० नं० ६

### रामबाण उपाय.

**रक्तपिती व कोड**

दहाहजार पुड्याफुकट. आह्मीं आमच्या औषधाची खात्री पटावी ह्मणून १०००० नमुन्याच्या पुड्या करण्याचें योजिलें आहे या पुड्या वरील महारोग दुरुस्त होण्यासारख्या आहेत. हे त्या निःसंशय सिद्ध करितील. या पुड्या वापरून अनुभव पहावा ह्मणजे खात्री होईल. नमुन्याच्या पुडीची किंमत फक्त ८= ठेविली आहे. ही किंमत फक्त टपाल हशील वगैरे खर्चापुरतीच आहे

२ आह्मीं रक्तपिती, कोड, हे कसे उद्भवतात त्याची शुश्रुषा कशी करावी? वगैरे माहितीचे इंग्रजी व बंगाली भाषेत पुस्तक तयार केलें आहे तेंही पण गरजूनीं अवश्य वाचण्या लायक आहे. ह्मणजे त्या पासून त्वचे संबंधीं रोगाची पूर्ण माहिती होईल किंमत फक्त ट. ख. सह ॥=सर्व पत्र व्यवहार इंग्रजींत करावा.

पन्डीत कृपाराम
८ नंदीबागानेलेन पो. साळकिया जि. हावरा.
नो० नं०७

### शास्त्रोक्त वशीकरणयंत्र

इसे सीधी भुजामें बांधकर जिस किसी स्त्रीपुरुषसे प्रीति करोगे तो वही आपके वशमें होगा दक्षिणा ।॥। पैकींग डा० म० जुदा पत्र हिन्दी इंग्रेजीमें देना. डोडूवाला चमत्कारी कार्यालय जलेसर जिला एटा
नों. नंबर ८

### अनायासें देवदर्शन.

**नोटपेपर्सः—** श्री गजानन, दत्तात्रय, मारुती, शंकर व नरहरी या पैकीं कोणती ही एक मूर्ती रंगांत दाबून उठाव (एम्बास) छापलेले, १०० ग्रेप्रनाईट नोट पेपर्स व त्याच्या बेताची चैाकोनी १०० कव्हरें प्रत्येकीं किंमत ८८ व्हीपीनें ८१२ दोन्हीमिळून किंमत रु. १ व्हीपीनें रु. १८६




**सर्वत्र एजंटस् पाहिजेत**

पताः— बेंद्रे आणि कंपनी पुणे सिटी
नो० नं० ९

### हिंदुस्थानावर अरिष्ट.

हिंदुस्थानातील रहिवाशांच्या पाठीस ज्वर व हिंवताप यांचें अरिष्ट सदोदित लागलेलें आहे पण त्याचा प्रतिकार करण्यास बाटलीवाला यांचें हिंवतापाचें औषध व गोळ्या हे रामबाण आहेत. ताप किंवा शीतज्वर येणारसें वाटतांच हें औषध घ्यावें. किं. १ रु

**बाटलीवाला यांच्या निस्तेज लोकांसाठीं शक्तिकारक गोळ्या**

हें औषध घेतल्यानें भागवटा, मेंदूचे श्रम, पौरुषनाश, अशक्तता व क्षयरोगाचें स्वरूप, त्याप्रमाणें अजीर्ण इ. इ. विकार. ताबडतोब दूर होतात. किं रु. १८८

**बाटलीवाला यांचें दंतमंजन.**

हें दंतमंजन मायफळाशीं कांहीं इंग्रजी औषधांचा वैद्यकीय रीतीनें मिलाफ करून बनविलें आहे. किं. ८४

**बाटलीवाल्यांचें गजकर्णावर मलम.**

यानें गजकर्ण, कुजली खरूज याचा विकार एका दिवसांत नाहींसा होतो. किं. ८४

हीं औषधें सर्व औषधी विकणाऱ्या दुकानांवर व डॉ. एच. एल. बाटलीवाला ने. पी. मु वरळी लेबोरेटरी दादर, मुंबई यांजकडे मिळतात.

नो० नं० १०

### जाहीर नोटीस.

सर्वत्र लोकांस कळविण्यांत येतें कीं मौजे निमगांव ता० मलकापूर जि० बुलठाणा येथील शेते स० नं० १०८ व १६९ यांतील मयत त्र्यंबक विठ्ठल करमरकर यांचे मालकीचे हिस्से हे खालीं सही करणार इचे मालकीचे वारस ह्या नात्यानीं झालेले आहेत. खालीं सही करणार हा अज्ञान असल्यामुळें सदरहू शेते तिचा चुलता रामचंद्र विठ्ठल करमरकर यांचे ताब्यांत गैर हक्कानें आहेत व त्यांचा विचार हीं शेतें विकण्याचा आहे असें कळतें या कारणावरून जाहीर करण्यांत येते कीं वरील शेते विकण्याचा रामचंद्र विठ्ठल यांस मुळींच अधिकार नाहीं व कोणी गैर माहीतगार मनुष्यानें फसून खरेदी घेऊं नयेत. ह्मणून ही माहीती प्रसिद्ध करण्यांत येत आहे

सही

अनुसया त्र्यंबक करमरकर अ०

पा० क० आजी सरस्वतीबाई

मो० नं० २६ दिवेकर नि०

---

## इजारदार व इनामदार सभा यवतमाळ

### वार्षिक रिपोर्ट

### ( सन १९१२-१३ इ० )

परिशिष्ट (अ)

अध्यक्ष महाराज व सभ्य गृहस्थ हो,

नोटिसींत प्रसिद्ध केल्याप्रमाणें आपण सर्वजण तसदी घेऊन आलां आणि इजारदार सभेबद्दल आपली आस्था व्यक्त केली याबद्दल आनंद वाटतो.

गेल्या सालीं ही वार्षिक सभा जून महिन्याच्या २९ व्या तारखेस भरली होती. त्यानंतर गेल्या नोव्हेंबरांत यवतमाळ येथें दरबार होऊन ना० चीफकमिशनर साहेब यांस मानपत्रें अर्पण करण्याचा प्रारंभ झाला; त्या प्रसंगींही आपणांपैकीं कित्येक इजारदार आले होते. सदरहु समारंभ हा इजारदार सभेच्या कार्यांपैकीं महत्वाचें कार्य होय. व तें इजारदारांच्या इतिहासांत प्रामुख्यानें गणलें जाईल या समारंभापासून आपल्या या इजारदारांच्या सभेस सरकारांत एक प्रकारचें महत्व आलें आहे. या मानपत्रांत इजारदारांनीं इच्छा दर्शविल्याप्रमाणें मध्यप्रांताला मिळालेल्या कायदे कौन्सिलांत इजारदारांतर्फें जरी नाहीं तरी वऱ्हाडच्या जमीनदारांतर्फें एक मेंबर घेण्यांत यावा असा ठराव झाला आहे. तसेंच श्रीमत् प्रजापूज्य बादशहा पांचवेजार्ज यांच्या सरकारानें हिंदुस्थानांत 'इंडियन सिव्हिल सर्व्हिस' संबंधानें चौकशी करण्याकरितां जें रायल कमिशन नेमलें गेलें आहे त्या कमिशन पुढें आपली कैफियत देण्याकरितां इजारदार सभेच्या सेक्रेटरीस लिहून आलें होतें. या जिल्ह्यांतील इजारदारांचा सरकारनें सत्कारच बहुमानच केला समजावयाचा.

यावरून आपणांस उमेद बाळगण्यास बळकट कारण आहे कीं, इतउत्तर कौन्सिलांत उपस्थित होणाऱ्या इजाऱ्याच्या प्रश्नांत सरकार या सभेचें मत घेत जाईल. व तसल्या बाबतींत काहीं सुचविण्यासारखें असल्यास तें सुचविण्यास तरी आपणास आतां कांहीं अटक राहणार नाहीं.

४ गेल्या सालच्या जूनपासून तों नोव्हेंबर पर्यंत इजाऱ्या संबंधानें घडलेल्या गोष्टींचा उल्लेख या सभेनें प्रसिद्ध केलेल्या प्रासिद्धिपत्रक नंबर ४ मध्यें केलाच आहे. त्यानंतर इजारदार सभेकडे मेहेरबान कमिशनर साहेबांनीं फारेस्ट संबंधाचें ज्यांत इजाऱ्यांतील खनिज द्रव्याच्या हक्कदारीची वाट लाविली आहे असें मार्कीकर पाठविलें आहे तें अद्याप सभेच्या मताकरितां तसेंच शिल्लक आहे. त्यास आपलेकडून उत्तर जावयाचें आहे.

५ या सालांत इजारदारांसंबंधानें सरकारनें बरीच विचारपूस चालविली आहे. मे० कामिशनर साहेब वऱ्हाड यांनीं याच कामाकरितां मुद्दाम या जिल्ह्यांत गेल्या हिवाळ्यांत दोन महिने दवरा काढिला व जिल्ह्यांतील बहुतेक इजाऱ्यांत स्वतः जाऊन व तेथील इजारदारांना व कुळांना भेटून एकंदर परिस्थिति बारकाईनें अवलोकन केली. साहेब बहादुरांच्या या दौऱ्यानें इजारदार व त्यांचीं कुळें यांजमध्यें चाललेल्या कांहीं शुष्क भांडणावर बराच चांगला परिणाम होण्याची आशा आहे नुकतेंच मे० कमिशनर साहेबांनीं या जिल्ह्यांतील डेप्युटीकमिशनर साहेबांस लिहून या बाबींकडे लक्ष पुरविण्यास सांगितलें आहे. ज्या भांडणास कायद्याचा फारसा आधार नाहीं. अशीं भांडणें न भांडण्याविषयीं उभयपक्षीं—इजारदार व कुळें यांनीं खबरदारी घ्यावी असा उपदेश सरकारचे वजनानें होऊन राहिला आहे.

६ इजारदारांस विशेष उमेदकारक गोष्ट नुकतीच घडून आली आहे; तिचा उल्लेख या ठिकाणीं करणें जरूर आहे. इजारामालखेड येथील इजाऱ्याच्या शेतां संबंधाचें एक अपील नाज्युडिशिल कमिशनर सा. नागपूर यांचे कोर्टांत होतें; तें त्या कोर्टाच्या फुलबेंचनें नुकतेंच निकालास लाविलें आहे. त्यांत आर्ग्युमेंट करण्या करितां मि. मोरो विश्वनाथ जोशी बी.ए. एल एल. बी. ॲडव्होकेट उमरावती यांस या सभे मार्फत मुद्दाम दोन तारखांस पाठविलें होतें. सदहू अपिलाचा निकाल इजारदारांस पूर्णपणें फायदेशीर असा झालेला आहे. त्यांत कौलांतील सातवें किंवा आठवें कलम इजारदार व कुळें यांचे मध्यें शेतांसंबंधानें लेखी करार असावा अशा बद्दलचें कौलांत घालण्यांत आलें होतें त्या बद्दल न्यायमूर्तींनीं योग्य विचार करून तें कलम कोणत्याही प्रकारें इजारदारांस बंधक होऊं शकत नाहीं असा निर्णय दिला आहे. या निकाला संबंधानें इतकेंच या वेळीं कळवितां येण्या सारखें आहे. कारण त्या जज मेन्टच्या नकला अद्याप मिळाल्या नाहींत.

७. आपल्या सभेचे नेहेमीचे सल्लागार वकील मि. मोरो विश्वनाथ जोशी यांची इजारदारास व त्यांच्या सभेला अशी सूचना आहे कीं, त्यांनीं आपसांत कांहीं नियम करावे, कीं जेणें करून कुळाना इजारदारांकडून कांहीं सवलती मिळतील इजारदार आपण होऊन अशा प्रकारच्या सवलती आपल्या कुळांना देण्यास तयार असल्यावर या बाबतींत निराळा कायदा करण्याचें सरकारास फारसें कारण राहणार नाहीं. व तसा एकादा कायदा सरकार करूं लागल्यास त्यांचे मनांत इजारदारां संबंधानें सहानुभूति उत्पन्न करण्यास एक कारण होईल.

८. सर्व इजारदार लोकांना भूषण वाटण्या सारखी व इजारदार सभेस महत्व येण्या सारखी आणखी जी एक गोष्ट यावर्षीं घडली तिचाही निर्देश प्रस्तुत प्रसंगीं करणें जरुर आहे. राजश्री बळवंत रामचंद्र लांडगे इजारदार सोन वाढोना व आपल्या इजारदार सभेचे व्हाइसचेअरमन यांस सरकारनें महाराजाधिराज पंचम जार्ज यांच्या वाढदिवसा निमित्त " रावसाहेब " ही पदवी देऊन त्यांचा बहुमान केला ही ती गोष्ट होय.

९. या सर्व हकीकती वरून आपणांस दिसून येईल कीं, इजारदार सभेचें अस्तित्व हें आह्मीं पूर्वीं अनुमानिल्या प्रमाणें इजारदारांच्या दर्जास व दौलतीस फायदेशीरच होत आहे व हें अनुमान अनुभवानें जसजसें खरें ठरत जाईल तसतसें या सभेविषयीं अद्यापिही जे कोणी इजारदार सांशक, बेफिकीर, किंवा निराश असतील त्यांसही या सभेला येऊन मिळावें असें वाटेल; अशी आह्मांस खात्री आहे.

१०. या वर्षीं कारकुनानें यवतमाळ, केळापूर वणी व काहीं दारव्हा या तालुक्यांत फिरून ३२७॥. रुपये वर्गणी वसूल केली. यंदाही त्यांस वर्गणी देण्यास कां कूं करणारे कांहीं इजारदार भेटले. या सभे विषयीं आस्था बाळगणारे सर्व इजारदारांनीं मनांत आणिल्यास वर्गणी वसूल करण्याचें काम फार सोपें जाईल; व केवळ वर्गणी वसूल करण्या करितांच कारकुनास जिल्हाभर फिरावें लागतें त्याचे ऐवजीं त्यास दुसरे एकादे महत्वाचें काम करावयास फावेल.

११. वऱ्हाडा करितां टेनान्सि आक्ट होणार आहे त्यांत इजाऱ्या संबंधानेंही कांहीं ठराव होईलच. त्या वेळीं इजारदारांस आपली बाजू सरकार पुढें मांडावी लागेल, त्या करितां व इजारदार सभेचा दिवाणखाना बांधण्या करितां पैशाची फार जरूरी आहे, ज्या अर्थी आजपर्यंतच्या एकंदर प्रकारावरून वसरकारी धोरणावरून या जिल्ह्यांतील इजारदारांची सभा नेहमीं करितां असणें जरूर झालें आहे, त्या अर्थीं त्या सभेकरितां तिच्या आफिस करितां वगैरे एक दिवाणखाना जिल्ह्याचे ठिकाणीं बांधून ठेवणें अवश्य आहे, तरी या दोन्ही गोष्टींचें महत्व जाणून इजारदार लोक ठरलेली वर्गणी लवकर व बिनहरकत देतील अशी आशा आहे.

१२, गेल्या तेरा महिन्यांचा जमाखर्चाचा खर्डा आजरोजीं सभे पुढें तिच्या पसंती करितां मांडण्यांत येत आहे त्या वरून दिसून येईल कीं सभेपाशीं या जून अखेर सारे ९१९२।✎ च शिल्लक आहेत, सदर्हू खर्डा पाहून तो पास करावा. अशी विनंति आहे.

| | |
|---|---|
| यवतमाळ<br>ता १२-७ १९१३ | आपला दत्तात्रेय कृष्णाजी काणे सेक्रेटरी<br>इजारदार व इनामदार सभा |

वऱ्हाडसमाचार

आषाढ वद्य १० शके १८३५ प्रमादी

## हिंदुस्थानांतलें अभ्रक

खनिज पदार्थांपैकीं सर्वांत निकृष्ट गणिलेला हा पदार्थ हिंदुस्थानांत निदान चौदा हजार मजुरांना रोज अन्न देत आहे. अभ्रकाचा व्यापार करण्याला फारसें भांडवल लागत नाहीं. तें खणून काढण्याला मेहनत ही लागत नाहीं, किंवा धनूंसारखें त्याचें शोधनही करावें लागत नाहीं. याच्या उद्योगांत इतर देशांकडून स्पर्धा लागण्याचें भयही नाहीं.

अभ्रकाचा उपयोग पूर्वींचेक लोक तकाकी आणण्याकडे करीत असत. अभ्रकाचे अंगीं पारदर्शकता, लवचीकपणा, चिवटपणा, मजबुती, उष्णतामानांत एकदम होणारे बदल सहन करण्याचें सामर्थ्य आणि चपटेपणा इ० गुण आहेत. हा एवढा गुण समुच्चय दुसऱ्या कोणत्याही पदार्थाच्या अंगीं नाहीं. वर ह्मटलेंच आहे कीं तकाकी किंवा चकचकितपणा आणण्याचें कामीं पूर्वीं अभ्रकाचा उपयोग होत असे. आतां त्याचा उपयोग काचेच्या ऐवजीं पुष्कळ ठिकाणीं होतो. बोटीवरच्या खिडक्यांचीं तावदानें, होकायंत्र, दिव्याच्या चिमण्या, फोनोग्राफ मधलें डायफ्रेगाम, व टेलिफोन यांच्यामध्यें अभ्रकाचें काम लागतें. हल्लीं विद्युत्यंत्रांत त्याचा फार उपयोग होऊं लागला आहे. बिनतारेच्या तारायंत्रांतही त्याचा उपयोग होतो.

हिंदुस्थानांत नीलगिरि, मुंबई इलाखा व राजपुताना यांत थोडेसें अभ्रक होतें. पण हजारीबाग जिल्हा व नेलोर जिल्हा यांत मात्र तें रगड सांपडतें. आतां सांगितलेल्या ठिकाणीं इतके दिवस जमिनीच्या पृष्ठभागीं थोडेंसें पांचचार फूट खाणिलें तरी हवें तेवढें अभ्रक सांपडे. पण आतां स्थिति पालटली आहे. सध्या हिंदुस्थानांत जुन्या तऱ्हेच्या ज्या अभ्रकाच्या खाणी आहेत त्यांत पाणी उपसून टाकण्याची कांहीं सोय केलेली नसल्यामुळें अभ्रकाचा फार नाश होत आहे. पण तिकडे कोणी लक्षच देत नाहीं.

अभ्रक खाणींतून काढलें ह्मणजे त्याच्या गुणांवरून त्याचें वर्गीकरण करतात आणि तीस तीस पौंडाचे वेगवेगळे गठ्ठे बांधतात. हे बांधतांना अभ्रकाच्या चारी बाजू कातरीनें चांगल्या कातरून साफ करतात. हें वर्गीकरण नुसत्या अभ्रकाच्या वडीच्या आकारावरून करीत नाहींत. तर त्याचा रंगही पाहतात. कित्येक अभ्रक तांबूस असतें. कित्येकांत मध्यें काळे डाग असतात. आणि कित्येक अगदीं काळें असतें. कित्येकांत इतर रंगांची झांक असते.

हिंदुस्थानांतलें बहुतेक सगळें अभ्रक लंडन येथील मिसिंग लेन मार्केट नांवाच्या बाजारांत जातें. तेथें दर तिसऱ्या आठवड्यांत

दलालांच्या मार्फतीनें विक्री होते. ही विक्री होण्याच्या अगोदर दोन दिवस त्या दलालांकडे मालाचे नमुने जातात. ते नीट तपासून पाहिल्यावर तिसरे दिवशीं मालाचा लिलाव पुकारण्यांत येतो. या ठिकाणीं हिंदुस्थानाशिवाय, सिलोन, दक्षिण आफ्रिका आस्ट्रेलिआ, कानडा, जपान, वगैरे देशांहूनही अभ्रक आलेलें असतें. पण हिंदुस्थानच्या मालाला गिऱ्हाईक चांगलें मिळतें. बहुतेक हिंदुस्थानचा माल जर्मनी, व अमेरिका हेच देश घेतात.

## पूर्वेकडील प्रजातंत्रक राज्यें.

प्रजातंत्र राज्यपद्धति पूर्वेकडील देशांना अपरिचित आहे अशा अर्थाचे उद्गार लॉर्ड मोर्ले यांनीं पांच सहा वर्षांपूर्वी काढले होते. तेव्हां बौद्ध कालीन इतिहासांतली उदाहरणें देऊन आह्मी वरील विधानाचें खंडन केलेलें वाचकांस स्मरत असेल. हिंदुस्थानच्या बाहेर मुसलमानी राज्यांत ह्मणजे बगदाद येथेंही प्रजातंत्र राज्य पद्धति कशी होती याचें एक उदाहरण अलीगड कलेजचे प्रो० फेरोज उद्दिन यांनीं आपल्या एका लेखांत दिलें आहे. ते ह्मणतात खलीफा उमर याच्या वेळेस प्रजेचा अधिकार केवढा असे हें पाहिलें ह्मणजे त्या पद्धतीला प्रजातंत्रक राज्य कां ह्मणूं नये तें कळत नाहीं. राज्याचा महसूल किती वसूल होतो, तो पैसा कोणत्या कामीं खर्च होतो, तो वसूल करतांना लोकांवर जुलूम होतो कीं काय, वसूल ठरविण्याच्या पद्धति काय आहेत, सरहद्दीचें रक्षण कशा प्रकारें करण्यांत येतें, वगैरे गोष्टी पाहून त्यांत खलीफाच्या हातून चूक होत असल्यास त्याला मनाई करण्याचा अधिकार प्रजेला असे. खलीफाची नेमणूक प्रजेनें ठरविलेली असे, आणि ती इतकी कमी असे कीं गरिबीनेंच त्याला संसार करावा लागे. रोजचा सगळा खर्च ह्मणजे आठ आण्याच्या आंत असे. पण पुढें तो पुरेना ह्मणून त्याला इतर कामें हातीं घ्यावीं लागत, तेव्हां प्रजा मंडलाकडून रोजचा कचा खर्च सरकारी तिजोरींतून देण्यास मजलिस कडून मंजुरी मिळाली. या वर्णनावरून प्रजेचा अधिकार राज्य कार्यावर केवढा असे तें कळून येईल. हल्लींच्या प्रजातंत्रक राज्यांतून सुद्धां प्रजामंडळाचे हातीं इतकी सत्ता आहे कीं नाहीं याची शंका आहे. अशीं उदाहरणें इतिहासांत असून लॉर्ड मोर्ले साहेबासारखे मुत्सद्दी जेव्हां एशिआखंडाला प्रजातंत्रशासनाला अपात्र ठरवितात, तेव्हां त्यांचे भाषण अज्ञान सूचक ह्मणावें कीं मुत्सद्देगिरीचें ह्मणावें याचें मोठें गूढ पडतें.

## विद्यार्थ्यांची झोप

शाळेंतल्या विद्यार्थ्यांच्या आरोग्य सुधारणेकडे सध्या सरकारी अधिकारी व पालक यांचें लक्ष अधिकाधिक लागूं लागलें आहे. अशा वेळीं आरोग्यांतला एक घटक--झोप--याचें प्रमाण विद्यार्थ्यांमध्यें किती आहे व किती असावयाला पाहिजे याविषयीं शास्त्रसिद्ध अशा कांहीं गोष्टींचा उहापोह करणें गैरवाजवी होणार नाहीं. मद्रासच्या इंडियन एज्युकेशन नामक शिक्षणविषयक मासिकांत एकजण लिहितो कीं आमच्या विद्यार्थ्यांना पुरेशी झोप मिळत नाहीं. बोर्डिंगांत राहणार विद्यार्थ्यांना सरासरी सहापासून आठ तास पर्यंत झोप मिळते. मोठाल्या मुलांना आठ तास झोप बस आहे. पण लहान मुलांना दहा अकरा तास पाहिजे. बोर्डिंगांत न राहणाऱ्या पुष्कळ मुलांना आठ तास ही झोप मिळत नाहीं. त्या मुळें त्यांची प्रकृति बिघडते. आमच्या मतें मुलें किती तास निजतात हें पाहण्यापेक्षां तीं कशा प्रकारें निजतात यांचे परीक्षण करणें अधिक अवश्य आहे. पुष्कळ मुलें रात्रीं जेवण नंतर हातावर पाणी पडलें न पडलें तों अंथरुणावर पडून घोरावयाला लागतात; आणि निजल्यानंतर ही तोंडावरून पांघरूण घेऊन स्वच्छहवेचा मार्ग बंदकरून ठेवतात. आमच्या लोकांची ही संवय अतिशय घातुक आहे. रात्रीं भोजनोत्तर निजण्याचे आधीं तास दोन तासांचा काळ आरोग्यशास्त्राच्या नियमाप्रमाणें जावयास पाहिजे तो जात नाहीं व स्वच्छ हवेचें तर महत्व मुळींच कळत नाहीं. यामुळें झोपेपासून ताजेतवानेपणा यावयाचा, त्याच्या फायद्यास आमचा विद्यार्थी वर्ग मुकतो. या गोष्टी कडे बोर्डिंगवरले अधिकारी व मुलांचे पालक लक्ष देतील तर सहा तास झोप घेऊन सुद्धां मुलांना ताजेतवानेपणा अधिक वाटेल.

## इंग्लंडचे राजकवि

इंग्लंडचे राजकवि मि. आस्टेन हे वारल्यापासून ही जागाच आजिबात बंद होईल अशी वदंता उठली होती. डॉ. ब्रिजेस याची नेमणूक झाल्याचें नुकतेंच प्रसिद्ध झालें आहे. तत्वतः पाहिलें तर ही जागा टेनिसन याच्यामृत्यु पासून बंदच झाल्या सारखी आहे. कारण कीं ज्या राजकवींची पदवी बेनजॉनसन, ड्रायडन, साउदे, वर्डस्वर्थ व टेनिसन यांच्या सारख्या उच्च प्रतीच्या कवींनीं भूषित केली त्या पदवीला मि. आस्टेन किंवा डा. ब्रिजेस अथवा रडयर्ड किपलींग यांच्या सारख्यांनीं पाय लावणें हें ज्या ठिकाणीं व्याघ्र सिंहासारख्या पराक्रमी व वन्यपशूंनीं राज्य केलें त्या ठिकाणीं ग्रामवराह किंवा कुत्रीं मांजरें यांच्या सारख्यांनीं लोळून त्या स्थानाचें माहात्म्य दूषित करण्यासारखें आहे. हें माहित असूनही इंग्रज प्रधानमंडळानें राजकवीची जागा अजीबात काढून न टाकतां कायम ठेविली यावरूनच इंग्रज लोकांची पुराण संस्थाविषयींची निष्ठा उत्तम प्रकारें व्यक्त होते. आमच्या लोकांनीं सामाजिक व धार्मिक सुधारणा करतांना या पासून घेतां येणारा बोध डोळ्यापुढें ठेविला तर समाजांतली पुष्कळशी दुही मोडून पुष्कळसे गैरसमज दूर होतील. संस्था कायम राहिली तर सत्पात्र व्यक्ति पुढें मागें तरी निर्माण होऊन तिच्या ठायीं विराजमान होईल. आजचे शंकराचार्य जरी त्या थोर पदवीस सर्वस्वीलायक नसले तरी आद्यआचार्यांची गादी आज शेकडों वर्षें चालत आली आहे तशीच पुढें चालल्यास नवीन सुधारलेल्या काळाला लायक असा शंकराचार्य कालांतरानें तरी निर्माण होईल. गादीच नष्ट झाली तर सगळेंच नाटक संपलें ह्मणावयाचें!

## अमेरिकेंतले हिंदी रहिवाशी

शिक्षणाच्या निमित्तानें अमेरिकेंत जाऊन राहिलेले रा० अनंत महादेव गुर्जर बी० एस० सी० यांनीं अमेरिकेंतल्या हिंदी रहिवासीयाबद्दलचा आपला अनुभव व बरीच शोध पूर्वक माहिती चित्रमय जगताच्या जूनच्या अंकांत प्रसिद्ध केली आहे. ती अत्यंत खेदजनक आहे तरी ‘आत्मैवात्मनः शत्रुः’ या गीतावाक्याची सत्यता दाखविणारी असल्यामुळें तिचा उल्लेख येथें करणें अवश्य आहे. अलीकडे कानडा प्रांतांत गेलेल्या शीख लोकांचा तिकडे गोरकायांकडून बराच छळ होऊं लागला आहे अशा वदंता प्रसिद्ध होतात त्या वाचल्या ह्मणजे संताप, दुःख, व उदासीनता हीं प्राप्त होतात. पण ही स्थिति आमच्या लोकांना तिकडे कां प्राप्त झाली या गोष्टीचें रहस्य रा० गुर्जर यांनीं दिलेल्या माहितींत आहे. थोडक्यांत सांगावयाचें ह्मणजे आमच्या लोकांची शीलभ्रष्टता आमच्या दुःखाच्या मुळाशीं आहे असें ह्मणावें लागतें. आमचे लोकांची दुही तर प्रसिद्धच आहे. पण हें दुहीचें गाठोडें परदेशीं सुद्धां आमचे देशबंधु नेत असतील अशी कल्पना नव्हती. आमचे विद्यार्थी परदेशांत जाऊन तेथें आपल्या घरांत स्वेच्छ आचाराविचारांचा इतका धुडगुस घालतात कीं शेजाऱ्यांना त्यापासून मनस्वी त्रास होतो. भर रस्त्यावर असभ्यपणाच्या व निर्लज्जपणाच्या गोष्टी करणें, एकमेकाचीं टाळकीं फोडणें वगैरे प्रकार ज्या विद्यार्थ्यांत दिसतात त्यांच्या विषयीं परदेशीयांचा चांगला ग्रह कसा व्हावा व तो न झाला तर आह्मी त्यांना बोल तरी कसा लावावा? विद्योपार्जनासाठीं गेलेल्या सुशिक्षित लोकांची ही स्थिति, मग बोलून चालून आडदांड निरक्षर अशा हलक्या दर्जाच्या मंजूर वर्गाच्या वर्तनासंबंधानें तर बोलायासच नको. कालमानानुरूप व परिस्थितिप्रमाणें वागणें ठाऊक नसल्यामुळें या लोकांनीं स्वतःला अमेरिकनांच्या द्वेषास व तिरस्कारास निष्कारण पात्र करून घेतलें आहे. हिंदी पोषाखापैकीं एक पागोटें खेरीज करून बाकीचे सगळे कपडे बदलून साहेबी पोषाख करण्यास आमच्या लोकांचा ना नाहीं. पण पागोटें तेवढें आपलें ठेवण्याचा त्यांचा हट्ट अमेरिकनांना आवडत नाहीं. तसेंच अमेरिकेंतले सगळे लोक सारखे हक्काचेच स्वतंत्र आहेत असें असतां हिंदी लोक सुदैवानें प्राप्त झालेले हक्क उपभोगण्यास मागें घेतात. यामुळें ही ते स्वतःची किंमत कमी करून घेत आहेत. आमच्या लोकांत जूट नाहीं. मत्सर, द्वेशभाव, व आपल्याच बंधूचें सामान चोरण्याची दुष्ट बुद्धि इ० कारणांमुळें हिंदी लोकांनीं आपली किंमत अगदींच कमी करून घेतली आहे. मग परदेशी लोक आह्मांला पायांतल्या खेटराप्रमाणें मानूं लागले तर आह्मांला कुरकुर करण्यास कांहीं जागा आहे काय?

## आधीं काय? सामाजिक सुधारणा? कीं राजकीय सुधारणा?

हा प्रश्न हिंदुस्थानांत यापूर्वी इतका वेळ विचारण्यांत आला आहे कीं त्यावर आतां कांहीं नवीन प्रकाश पडण्याचा व या प्रश्नाचा कायमचा निकाल लागण्याचा संभव दिसत नाहीं. तथापि सर विल्यम वेडरबर्न साहेबांनीं लिहिलेल्या ह्यूम साहेबाच्या चरित्राच्या शेवटीं पारीशिष्ट ह्मणून जोडलेल्या ह्यूम साहेबांच्या पत्रांतल्या एका वाक्यानें या प्रश्नावर थोडा तरी अधिक प्रकाश पडेल. न्या. रानडे, तेलंग प्रभृति सुधारकांप्रमाणेंच मि. ह्यूम यांचेंही मत सामाजिक सुधारणा आधीं व्हावी असें होतें. तथापि त्यांनीं कांग्रेसच्या रूपानें राजकीय सुधारणेचा पाया प्रथम घातला सकृद्दर्शनीं दिसणाऱ्या या विरोधाचें कारण त्यांनीं जें दिलें आहे. तें खरोखर विचार करण्यासारखें आहे. ते ह्मणतात कीं सामाजिक बाबतींत स्वतःवरची जबाबदारी ओळखण्याची पात्रता अंगीं येण्यास प्रथम माणसाचें अंगीं स्वाभिमान पाहिजे. ज्याला कोणतेही हक्क नाहींत व ज्याची महत्त्वाकांक्षा दाबून टाकण्यांत आली आहे त्याच्या अंगीं स्वाभिमानाची अपेक्षा कोठून करतां येईल? हा स्वाभिमान जागृत करण्यासाठींच केवळ प्रथम राजकीय हक्क संपादनाच्या उद्योगाला लागावें लागलें. मि. ह्यूम यांनीं आमच्या राष्ट्रीय शैथिल्याची केलेली ही मीमांसा फार दूरदृष्टीची आहे. उघडच आहे कीं जो स्वतः सर्वथा पराधीन तो आपल्या स्त्रीवर्गाला तरी दास्यांतून मुक्त कोठून करणार? राजकीय हक्क मिळून थोडासा माणुसपणा अंगीं येतांच समाजसुधारणेच्या बीजास हिंदुस्थानांत कसा अंकुर फुटला व या अंकुराचा मोठा वृक्ष होऊन तो कुटुंबसुखाची छाया व्यक्तिमात्रास देऊन लवकरच सर्वांना आनंदित करील अशी जी उमेद वाटूं लागली आहे ती मि. ह्यूमसारख्या दूरदृष्टि सुधारकाच्या शहाणपणाचें फळ आहे. मि. ह्यूम यांच्या चरित्रांत अशा बारीक सारीक दिसणाऱ्या पण खरोखर महत्त्वाच्या अनेक गोष्टी आहेत. या दृष्टीनें त्यांचें चरित्र जितकें राजकीय सुधारकास, तितकेंच सामाजिक सुधारकांस अत्यंत उपयुक्त आहे. यांत शंका नाहीं

## महाकवि भास

एका संस्कृत कवीनें सरस्वती देवीचें वर्णन करतांना निरनिराळ्या महाकवींना त्या देवीच्या भूषणांची उपमा दिली आहे. त्यांत महाकवि भास याला सरस्वती देवीचें हास्य अशी संज्ञा दिली आहे. पण दुर्दैवाची गोष्ट कीं थोड्यादिवसांपूर्वींपर्यंत या महाकवीचे ग्रंथ उपलब्ध नसल्यामुळें विद्वन्मंडळी जागचेजागीं झुरत होती. पण सुदैवानें त्रावणकोर सरकारच्या पदरीं असलेल्या एका विद्वानानें महत्प्रयासानें भास कवीच्या ग्रंथांचा शोध लावून तो आपला शोध इंडियन ॲंटिकेरीच्या द्वारें प्रसिद्ध केला. त्यावरून या थोर कवीसंबंधानें आतां बरीच माहिती लोकांस प्राप्त झाली आहे. भास कवीचीं दहा नाटकें उपलब्ध झालीं आहेत. त्यांत चारुदत्त नांवाचें एक नाटक आहे. शूद्रक

कवीचें मृच्छकटिक नाटक याच नाटकाच्या आधारें लिहिलें असावें. या नाटकांतल्या कांहीं श्लोकांचें मृच्छकटिक नाटकांतल्या श्लोकांशीं अत्यंत साम्य आहे. इतकेंच नाहीं तर भास कवीची कविता कालिदासाच्या कवितेहून ही सरस, सरळ, स्वाभाविक व ओजस्वी होती असें ही दिसून येतें. चौथ्या शतकांत झालेला कौटिल्य चाणक्य, आठव्या शतकांतला कविदंडी, वगैरे महान ग्रंथकारांनीं ही आदरपूर्वक भासाच्या ग्रंथांतलीं अवतरणें घेतलीं आहेत. यावरून भास हा चौथ्या शतकाच्याही पूर्वी झालेला असला पाहिजे हें उघड आहे. इतक्या प्राचीन काळीं संस्कृत भार्षेत अव्वल प्रतीचीं सरस काव्यें व नाटकें होतीं हें संस्कृत वाङ्मयास अत्यंत भुषणावह असें कोण ह्मणणार नाहीं. मुंबईच्या 'ज्ञानांजन' कर्त्यांनीं या कवीविषयींची नवी माहिती महाराष्ट्रवाचकांस उपलब्ध करून दिली हें त्यांचे उपकारच ह्मटले पाहिजेत.

---

गतवर्षी तुर्कोबाल्कन युद्ध ऐन जोरांत होतें व रणभूमीवर जखमी होऊन पडलेल्या तुर्की शिपायांना औषधपाणी देण्यास व जखमी बांधण्यास पुरेसे डाक्तर नाहींत अशी बातमी आली तेव्हां हिंदुस्थानांत एक फंड उभा होऊन त्या फंडाच्या खर्चानें इकडून डाक्तर मंडळी स्वेच्छेनें प्रेरित होऊन तिकडे रवाना झाली होती. या डाक्तर मंडळीनें तिकडे जी उत्कृष्ट कामगिरी केली तिजबद्दल तिचा जेवढा गौरव करावयाचा तेवढा तुर्की आफिसरांनीं व खुद्द सुलतान साहेबांनीं केला. हें सांगण्याचें विशेष कारण कीं या पूर्वी ह्मणजे बोअर युद्धाचे वेळीं मुंबईचे दातृशूर भाटिया गृहस्थ रा. दामोदर शेट सुखडवाला यांच्या खर्चानें अशीच एक डाक्तरांची पार्टी इंग्रजी शिपायांच्या मदतीसाठीं गेली होती. पण तिचा असा कोठें गौरव झाल्याचें कळलें नाहीं व रा० दामोदर शेट ही अद्याप साधे दामोदर शेटच आहेत त्यांच्या मागून कित्येक लोक 'सर' पदवीनें विभूषित झाले, पण सरकारचा गुणग्राहकता रूपी मेघ दामोदर शेटजीकडे वळला नाहीं किंवा गेलेल्या डाक्तरांचा आदर शुष्क शद्बांनीं सुद्धां ब्रिटिश सरकारनें केला नाहीं! ब्रिटिश सरकारपाशीं गुण ग्राहकता, कृतज्ञता, किंवा पात्रापात्रतेचा विचार यांचा अभाव आहे असें आह्मी ह्मणत नाहीं. पण सरकारी कामाच्या पद्धतीच्या चरकाचे स्क्रू अशाच विचित्र रीतीनें बसलेले आहेत कीं जो मूकवृत्तीनें बसेल त्यानें देशाची व सरकारची कितीही अंतःकरणपूर्वक सेवा केली तरी त्याच्या सेवेची खबर मुख्य सरकार पर्यंत पोंचतच नाहीं. तुर्की युद्धांत गेलेल्या डाक्तर मंडळीपैकीं कित्येकांनीं आपले अनुभव इकडे वर्तमान पत्रांना कळविले आहेत त्यांत जागजागीं ह्मटलें आहे कीं तुर्की लोकांसारखे प्रेमळ, कृतज्ञ, उदार आणि धर्मासाठीं सर्वस्वाचा त्याग करण्यास तयार असे थोडेच लोक पृथ्वीच्या पाठीवर सांपडतील? अशा लोकांशीं वागतांना मनुष्याची संकोचवृत्ती लयपावून बुद्धी विकास पावते, मन उदार होते, क्षुद्र भेदभाव व अहंभाव गलित होतात आणि विश्वकुटुंबवृत्ति प्रकट होते यांत नवल काय? या डाक्तर मंडळींत डा. मुकंगुद नांवाचे मुंबईचे एक हिंदु डाक्तर होते. हे तिकडे असतां तुर्कस्थानचे मुख्य वजीर महमुद साकेत पादशाहा यांचा कोणी दुष्टानें वध केला, तेव्हां त्यांच्या शवाला खांदा देण्यांत डा. मुकगुंद हे प्रमुख होते! हिंदूनें मुसलमानाच्या शवाला खांदा द्यावा हें केवढें आश्चर्य? पण मनोदार्याचीं अशीं उदाहरणें आज प्रत्यक्ष घडत आहेत. हा शिक्षणाच्या, संस्काराचा परिणाम आहे. इकडे आल्यावर समाजाकडून डा. मुलगुंद यांच्या मागें प्रायश्चित्ताबद्दलचा लकडा न लागो ह्मणजे झालें.

---

## एक चुटका.

(खेडवळ आणि पोष्टमास्तर यांचा संवाद.)

खेड - मास्तर साहेब, मला एक कारट द्या, हा घ्या पैसा. पो.मा.— हापीस बंद झालें. आतां नाहीं कार्ड मिळत. उद्या रविवारची सुटी आहे. परवा सोमवारीं ये ह्मणजे मिळेल. खेड.- गरीबावर दया करा. आतां माझ्या देखत तुह्मी त्या पोलीस शिपायाला कारट दिलं तसं मला ही द्या. फार जरूरीचें पत्र जायचं आहे. भाऊ फार आजारी होता त्याचा समाचार विचारायचा आहे. पो.मा.— कां उगाच बडबड लाविली आहे? एकदा सांगितलंना हपीस बंद झालं ह्मणून? चल निघ जा. खेड.— हपीस पांच वाजतां बंद व्हायच. आजून पावणे पांच ही झाले नाहींत. मास्तर साहेब, असं करूं नका. कांहीं तरी दया करा.

पो.मा.- आह्मी काय तुझ्या बापाचे नोकर आहों वाटेल त्या वेळीं तुला कारट द्यायला? चल निघ जा, नाहींतर पोलिस शिपायाला बोलवावें लागेल.

खेड.- असं काय करतां महाराज! गरिबावर दया करा.

पो.मा.- कोण आहेरे तिकडे? पोष्टमन! याला पकडून पोलिसच्या हवालीं कर. मी फौजदार साहेबांना चिठ्ठी देतों येवढी त्यांना नेऊन दे. उगाच लोकाचे येथें त्रास द्यायला येतात!

खेड.- येवढी तसदी कशाला घेतां! मी आपला जातों कसा! ( जातो )

पो.मा.- गेली एकदाची ब्याद. आतां मला तुकारामाची गाथा वाचण्यास बरी शांतता आणि फुरसत मिळेल.

---

## सहवास

### ( रा. रा. स्टांडन साहेबांचा )

बहुविध कार्यें करण्याची कुशलता रा. रा. बी. पी. स्टांडन कमिशनर यांस चांगली साधली आहे. येथील त्यांच्या पंधरवाड्याच्या मुक्कामांत त्यांनीं पुष्कळशा गोष्टी लोकांपुढें मांडल्या. त्यांनीं शेती खात्याचे डिपुटी डायरेक्टर रा. रा. आलन यांस बोलावून आणून 'शेतकी मंडळा'-संबंधानें विशेष खल केला. हीं मंडळें वऱ्हाडांत स्थापित झालीं आहेत तेव्हां त्यांची नोंद 'सहकारी मंडळी'च्या कायद्याअन्वयें करण्याविषयीं लोकमताचा अंदाजा घेण्यांत आला. सरकारी देखरेख व अशा नोंदणी पासून होणारे इतर लाभ ही लोकांस अवश्य पाहिजे आहेत. 'शेतकी मंडळें' सध्यां रोझिआ कपाशीचे बीजाचा प्रसार करण्या पुरतीं सध्यां स्थापिलीं आहेत पण त्यांचा कार्य प्रसार उत्तरोत्तर अधीक होण्याचा संभव आहे. आकोल्यास पाणी आणण्यासंबंधानें वाटाघाट करण्यासाठीं मेजर ओल्डहाम सानिटरी इंजिनिअर हे मुद्दाम आले होते. आणि मे. कमिशनर साहेबांनीं मुनसिपल सभासदांपुढें ६ लाख रुपये खर्च लागणारी योजना विचारासाठीं आणिली. पूर्वींची योजना १० लाख रुपये खर्चाची होती आणि तीच विशेष फायद्याची होती. ही नवी योजना तलावाच्या पद्धतीवर असून पाण्याचा पुरवठा वाढविण्यासाठीं कापशीच्या विहिरीच्या जवळ तटबंदी करून पाणी अडविण्यांत येणार आहे. ही नवी योजना मुनसिपालिटीस आवडल्याचें दिसत नाहीं आणि सध्यां तिच्याविषयीं भवतिनभवति चालू आहे.

गेल्या जून महिन्याच्या १ ले तारखेला बोरगांवास जो रेलवेवर भयंकर अपघात झाला त्या समयीं ज्या कांहीं पाटील, देशमूख वगैरे गृहस्थांनीं लोकांस व रेलवेच्या अधिकाऱ्यांस मोठी मदत दिली त्यांच्या उपकाराची धन्यता लोकांस कळविण्यासाठीं सभा भरविली होती. त्या सभेंत सरटिफिकीटें देण्यांत आलीं व चांदीचें कडे व नगदी रक्कमा बक्षिसें ह्मणून देण्यांत आलीं. रेलवे कंपनी कडून हीं बक्षीसें वाटण्या साठीं आलेलीं होतीं. राजश्री स्टांडन साहेब गेल्या गुरुवारीं येथील मित्र समाजांत आले होते. तेथें त्यांच्या आदरसत्कार करण्या साठीं राव बहादूर ठाकूर साहेब, डिस्ट्रीक्ट जज्ज हे अग्रणी होते. युरोपियन अधिकारी मंडळी व मित्र समाजाचे सभासद एकत्र खेळ खेळण्यांत' सुखसंवादांत व नानाविध मनोरंजनाच्या गोष्टींत अगदीं तल्लीन होते. आणि अशा मित्रभावाच्या स्थितींत पुष्कळशा चांगल्या कार्यांची घटना होत असते ही आनंदाची गोष्ट होय.

---

## स्मारक

### (रायपुरच्या राजकुमार कालेजास देणगी)

राजनांदगांव संस्थानचे गादीवर श्री० सर्वेश्वरदास नांवाच्या ७ वर्षांच्या मुलास बसविलें असून त्या संस्थानाच्या माजी दोन्ही संस्थानिकांच्या स्मारकाच्या निमित्तानें ६ लक्ष रुपये देणगी त्या संस्थानानें रायपुरच्या राजकुमार कालेजास देण्यांत आली आहे. या कालेजांत मध्यप्रांत, बिहार व ओरिसा येथील राजकुमार व श्रीमंत जमीनदार यांस विद्या शिकविण्यांत येतात. हें स्मारक फार उत्तम होय.

---

# वऱ्हाडवृत्त.

हवामान—या सप्ताहांत पावसानें मोठी गर्दी करून सोडली आहे. यंदा सारखा विपूल पर्जन्य अगदीं योग्य वेळीं पुष्कळ वर्षांत आला नव्हता; आणि एकंदर पाणी १७ इंचापर्यंत झालें असून पीकें चांगलीं जोमांत आहेत. तीन दिवसांचा ताप ह्मणून एक नवीनच डेंग्यु नांवाचा ताप सुरू आहे आणि चौथे दिवशीं मनुष्य दुरुस्त होतो.

लेफटेनंट—कर्नल मॉडवी डिपुटी कमिशनर यांस रजा संपतांच नरसिंगपूर येथें डिपुटी कमिशनर नेमण्यांत आलें.

रा. रा. जे. हुल्ला आफि. डिपुटी कमिशनर, नरसिंगपूर यांस शेती खात्याचे डायरेक्टर नेमण्यांत आलें.

लेफटेनंट कर्नल आर. पी. हार्सबरो डिपुटी कमिशनर, हुशंगाबाद यांस नर्मदा-डिव्हीजनचे कमिशनर नेमण्यांत आलें हें कळविण्यास आनंद वाटतो.

रा. रा. एच. ए. क्रम्प फायनान्स कमिशनर यांस ३ महिन्यांची हक्काची रजा देण्यांत आली असून रा. रा. जे. वाल्कर साहेब यांस फायनानशिअल कमिशनर नेमण्यांत आलें.

रा. रा. हजारीलाल एक्स्ट्रा असि. कमि. यवतमाळ यांस १ महिना २६ दिवसांची रजा दिली असून रा. रा. महमद अबदूल सतार एक्स्ट्रा असि. कमि. यांस यवतमाळास नेमण्यांत आलें.

रा. रा. रंगनाथ गणेश उटगीकर आफि. तहशीलदार, दर्यापूर यांस १ रे वर्ग माजिस्ट्रेटीचे अधिकार देण्यांत आले.

रा. रा. गोपाळ वामन बापट आफि. डिस्ट्रिक्ट जज्ज, नरसिंगपूर यांस आकोल्यास स्मालकोर्टावर न्यायाधीश नेमून त्यांस आडिशनल डिस्ट्रिक्ट जज्जचे अधिकारही देण्यांत आले आहेत.

रा० रा० बमनजी बेझनजी मेहता जज्ज स्माल काजकोर्ट, आकोला यांस भंडारा येथें डिस्ट्रीक्ट जज्ज नेमण्यांत आलें.

रा० रा० महमद अबदूल हादी आफि० सब जज्ज, यांस हर्दा येथें सबार्डिनेट जज्जच्या हुद्यावर कायम करण्यांत आलें.

---

## आकोला बाजारभाव

| | | | |
|---|---|---|---|
| हुंडी दर्शनी | | | १००।॥ |
| सोनें | | | २४८≡ |
| चांदी | | | ८० |
| जवारी नवी | ८० | ते | ८९ |
| गहुं काठे | १०० | | १०२॥ |
| गहुं बनशी | ११९ | | १२९ |
| जवस | १२२ | | १२८ |
| तेल | | | ८ |
| सरकी | | | ११।= |
| तीळ | ७। | | ७।॥ |
| कापुस | ९७ | | ९८ |
| रुई आकोला जीन | | | ७८ |

## नोटीस

नोटीस बेशमी सूर्यभान रावोजी वनारे कुणबी रा० लोखंडमाळे ता० खामगांव

यांसः—

खालीं सही करणारीकडून नोटीस देण्यांत येते कीं तुह्मी मध्यस्ती पडून माझे मुलीची फारकती मिळवून देण्याबद्दल मजजवळून रोख नगदी १३९ रुपये घेतले. पुढें तुमचे विश्वासानें मी तुह्माजवळ बराच काळ ती मागितली नाहीं. मला आतां माझ्या मुलीचें पुनः गंधर्व करावयाचे असल्यानें मी ती फारकती तुमचेजवळ मागितली असतां तिजबद्दल पुनः तुह्मी १३९ रुपये मागतां तुमचे हें करणें गैर आहे. मी पूर्वी रुपये पंचासमोर दिले आहेत. व पंचासमोर तुह्मी फारकती आणल्याच कबूल केलें आहे. तरी आतां तुह्मास कळविते कीं ही नोटीस पावल्यापासून आठ दिवसाचे आंत तुह्मी मला माझे मुलीबद्दल फारकती आणून द्यावी. नाहींपेक्षां तुह्मी फारकती न आणल्यामुळें मी गंधर्वा प्रित्यर्थ केलेल्या खर्चाचे नुकसानीस आपण जबाबदार व्हाल. व मी माझे १३९ रुपयाबद्दल व तुमचे विश्वासघाताबद्दल कोर्टा मार्फत फिर्याद करून सर्व खर्च भरून घेईन. ता० २३ मे १९१३ इ०

सही

तानाबाई मर्द शामजी दिवाने कुणबी रा० हल्लीं तरोडा ता० बाळपूर हिचा निशानी आंगठा असे.

नो० नं० ११

---

## नोटीस

सर्वत्र लोकांस कळविण्यांत येते कीं आमचे बापानें अंत्री मर्द परशराम धनगर इजला ठेविलें होतें तरी तिजला आह्मी घर राहण्यास दिलें ते आमचे मालकीचे आहे दुसरे कोणाचा हक्क नाहीं तरी पूर्वेस सरकारी रस्ता पश्चिमेस तुकाराम भीउ याचें घर दक्षिणेस सरकारी रस्ता उत्तरेस लक्ष्मण धनगर याचे घर या सदरहु चतुःसिमेची आंतील घर जर कोणी आमचे परवानगी शिवाय गहाण अगर खरेदी वगैरे घेतल्यास रद्द असे. ता० २१-७-१३

दस्तुर गणेश जैराम देशपांडे

सही

मुकाजी जानजी द० खु०

सिताराम जानजी देशमूख द. खु.

नो० नं० १२

---

## नोटीस

नोटीस बेशमी जाणू वा राणू पाटील राहणार चिंचेली रुद्र पो० राजंदा ता० आकोला.

यांसः—

खालीं सही करणारीकडून नोटीस देण्यांत येते कीं, तुह्मी माझे लग्नाचे नवरे असून लग्नास सुमारे ७-८ वर्षे झालीं लग्न झाल्यावर मी तुमचे घरीं १ वर्ष होते. व पुढें तुह्मी मला माझे आईचे घरीं आणून घातले. मला सज्ञान होऊन आतां ३ वर्षे होतात. त्यांकडेस ह्मणजे ४ वर्षांपासून तुमचे अंगावरून वारें गेल्यानें माझेतर असोच पण स्वतःचे अन्नवस्त्राची मारामार आहे. मी २ वर्षांपूर्वी जेव्हां तुमचेकडे आले तेव्हां मला असें आढळून आलें. ह्मणून पुनः तुह्मी मला माझे आईचे घरीं आणून घातले. तरी या नोटिसीनें कळविते कीं माझे खावटीबद्दल ४ वर्षाचे २४० रुपये ही नोटीस पावल्यापासून १५ दिवसांत द्यावे असें न केल्यास व तुह्मी घेऊन जाण्यास न आल्यास हीच फारकती समजून मी दुसरा घरठाव करीन मग तुमचा लग्नाचा हक्क राहणार नाहीं कळावें ता० २२ जुलाई सन १९१३ इसवी

सही

जनी मर्द जाणू पाटील रा० आकोला (नबाबपुरा) निशानी आंगटा असे

नो० नं० १३

---

## त्रिकाल दर्शी आरसा?

तुह्मास भूत, भविष्य वर्तमान जाणणें असल्यास ही जाहिर खबर वांचून त्वरित ऑर्डर धाडा. ह्या आरशासारखें त्रिकाळ ज्ञान प्राप्त करण्याचें साधन जगांत दुसरें एकही नाहीं. तत्संबंधानें शेकडों- सरटीफिकीटें मिळालीं आहेत. श्रद्धाळु मुलें, स्त्रीया आणि पुरुष स्वतःचे विचार आणि त्यांचे परिणाम पाहूं शकतात. गांव परगांव दूरदेशांतर आाणि दूरच्या मित्र व सोयऱ्यांच्या खबरा तुह्मांस सहज मिळूं शकतील. अमूक काम होईल किंवा कसें? अमूक बाबतीचे काय परिणाम होतील, व्यापारात नफा किंवा तोटा, अमुक पदार्थाच्या किंमतीची कमीजास्ती, परिक्षेचे परिणाम, चाकरी वगैरे कांहीं तुमच्या मनाचा खुलसा करवयाचा असल तो सर्व होऊं शकेल. किंमतः—

साध्या कांचेचा रु. २-९
बिल्लोर कांचेचा मजबूत रु. ३-९
मुद्दाम माठे बिल्लोर कांचेचा मजबूत रु. ६
} प्रत्येक पोस्टेज सहित.

हिंदुस्थाना बाहेरच्या ग्राहकानें २ रु० जास्त धाडावें.

आशाभाई वाघजीभाई पटेल मु० करमसद, ता० आनंद जिल्हा खेडा.

नो० नं० १४

---

## जाहीर नोटीस

सर्वत्र शेट सावकार व असाम्या यांना नोटीस देण्यांत येते कीं जवाला बाईचा व माझा कोर्टांत दावा चालू आहे तर सर्वांना जाहिर नोटीस करण्यात येतें कीं बोर्शीटाकळी दुकानचे पैसे जवाला बाईस देऊं नये व कर्जाऊ पैसे वगैरे देऊ नये दिल्यास त्याची जबाबदारी तुमच्यावर आहे कळावें तारीख १७.७.१३

सही

मुकुंदलाल गोपालदास अ. पा. क. जनकबाप धनराज मानकचंद अगरवाले रा. बार्शीटाकळी द. खु.

नो. नं. १५

---

## नोटीस

भिकुलाल बालमुकुंद अगरवाले मुक्काम गोन्हापुर ता. मलकापूर

यांसः--

गोपाळदास नानकराम अगरवाले रा. खामगांव यांजकडून नोटीस देण्यांत येते कीं. मौजे गोंधनापुर येथील शेत सर्वे नं. ११ पैकीं २ एकर गुंठे ४८६ आकार रुपये ३। हें शेत माझें मालकिचे असून तें मी हसन अल्ली नुरअल्ली यास खरेदी करून नोंदून दिलें आहे. असें असतां आपण सदर्हू शेत मजपासून दहा १० वर्षां करितां भाडेपठ्यानें घेतले अशा अर्थाचा एक खोटा भाडेपठ्ठा माझ्या अपरोक्ष तयार करून तो माझ्या संमती शिवाय नोंदून घेतला आहे असें मजला समजते. सदर्हू शेत मी आपणास कधींही वहाण्यास दिलें नाहीं. व आपणास देण्याचा आजपर्यंत कधींही करार केला नव्हता. असें असून आपण हा दस्तऐवज खोटा तयार करून फौजदारी गुन्हा केला आहे. तरी आपणास या नोटीशीनें बजाविण्यांत येते कीं, सदर्हू खोट्या भाडेपठ्यावरून आपणास सदर्हू शेतावर कांहीं हक्क प्राप्त होत नाहीं व आपण कांहीं हक्क दाखविल्यास किंवा मजवर अगर दुसऱ्या कोणावर कोणत्याही प्रकारचा दावा वगैरे केल्यास त्याची सर्व जबाबदारी आपणावर राहील. व आपण फौजदारी गुन्ह्यास पात्र व्हाल. हें आपणास या नोटीशीनें कळविलें आहे. कळावें तारिख १९।७।१३ इसवी.

सही

गोपाळदास नानकराम द. खु.

नो. नं. १६

---

## नोटीस

नोटीस बेशमी रामचंद्र वा हरबा जात सुतार रा. कानसनी ता० आकोला

यांसः--

खालीं सही करणाराकडून नोटीस देण्यांत येते कीं तुह्मी माझे गंधर्वाचे नवरा असून गंधर्वास सुमारें १॥ वर्ष झाले. तेव्हां पासून ३ महिने तुमचे घरीं होते. पुढें तुह्मी मला बोपुरी ता. मजकूर येथें जावयाचे येथें आणून घातले. तेव्हां पासून मजूरी करून पोट भरते. तरी खावटीबद्दल १५ महिन्याचे रुपये ६० मला ही नोटीस पावल्यापासून ८ दिवसाचे आंत देऊन मला घेऊन जावे. असें न झाल्यास हीच नोटीस फारकती समजुन मी दुसरा घरठाव करीन मग तुमचा हक्क कोणतेंच प्रकारचा राहणार नाहीं. मागें तुह्मांस पोष्टानें १ नोटीस दिली होती. ती तुह्मी घेतली नाहीं. ह्मणून ही वर्तमान पत्रांतून मुद्दाम दुसऱ्यानें दिली आहे ता० २१ माहे जुलई सन १९१३

सहीची निशानी आंगठा

रुखमाई मर्द रामचंद्र सुतार रा. बोपुरी पो. कुरम ता० मुर्तिजापुर यांचा

नो. नं. १७

---

## नोटीस.

नोटीस बेसमी रंभाजी जानजी पाटील रा.रायखेड ता. आकोट यांस

खालीं सही करणारा कडून नोटीस देण्यांत येते कीं तुह्मी आमचे बाप असून आह्मी ५ भाऊ आहोत. पैकीं ३ तुमच्या जवळ असून २घे आह्मी वेगळे आहों. आमच्या वांटण्या व्हावयास सुमारें ५ वर्षे झालीं; त्या बद्दल आमच्या हिश्य बद्दल पावत्याही झालेल्या आहेत. असे असून तुह्मीं रामसुख मोतीलाल साहु दुकान हिवरखेड. यांस आमची वाटेकेली आमचेच ताब्यांत असलेली जमीन १००० रूपयानी ताबे गहाणानीं कां दिली? य बद्दल ही नोटीस पावल्या पासून ८ दिवसांत जबाब द्यावा. तुह्मी जी वर दिलेली जमीन ताबेगहाण दिली. त्याची जबाबदारी आमचे वर नाहीं. व यापुढे तुह्मी आमचे हिश्याचे जमीनी बद्दल कोणतीही देवघेव करूं नये. केल्यास त्या बद्दल आमचे हिश्यावर बोजा राहणार नाहीं कळावे ता. २३ माहे जुलाई १९१३ ई.

सद्या

सदाशिव रंभाजी दस्तुर खुद.

वीठु वा॥ रंभाजी पा. दस्तूर खुद.

नो. नं १८

---

## नोटीस

नोटीस बेशमी तुळशी मर्द गणाजी जात कुणबी ठाकरे राहणार लोहारी बु॥ ता० आकोट इजला:—

खालीं सही करणार याजकडून नोटीस देण्यांत येते कीं तुमचेवर आह्मी आकोला येथील वि० जु० मु० साहेब यांचे कोर्टांत खालीं लिहिलेलें शेताचे ताब्याबद्दल दि० मु० नंबर ५०६ सन १९०९ चा दावा केला असतां त्याचा निकाला ता० ८-१२-१० ई० रोजीं माझे वतीनें झाला. त्याजवर तुह्मी वि० आ० डी० [illegible] आकोला यांचे कोर्टांत दि० [illegible]

आतां मजला कोणी
करितां ही जाहिर
आहे. तरी सदर्हु
प्रसिद्ध होईल. त्या
चे आंत तुह्मी
टाकावे. तसेंच
१९ दुरावले आहे.
कीचा मजला घेऊन
निकाल गां ज्या अर्थी
आमचे ळीच पत्ता
नोटिसीनें कोणत्या
पिंपरी जै का नाहीं.
सर्वे नं० राखण्या-
पश्चिमेकडील आहे.
हिस्सा पिकी त तुमचे
आक्टोबर त फारकत
आमचे मग
आमची पावती
वर्तन नकेल्यास हक्क
कोर्टांत दावा कमचे-
विनाकारण खर्चांत
सबब मुद्दाम नोटि
कळावें. ता० २२
चिनकाजी र

नो० नं० १९

## नोटीस

नोटीस बेशमी लडु वल्लद कोंडाजी बागवान रा० मुंगळ ता० वाशीम

यांसः—

खालीं सही करणार इजकडून या नोटीसीअन्वयें कळविण्यांत येते कीं, तारीख १२-११-१९१२ इ० रोजीं रजिष्टर नंबर ३ सन १९१२ चें मृत्युपत्राअन्वयें माझी स्थावर व जंगम माल मिळकत माझे मरणानंतर तुह्मांस मिळावी ह्मणून मी तुमचे नांवानें तें करून दिलें. सदहू अस्सल मृत्युपत्र हल्लीं तुमचे जवळच आहे. मृत्युपत्र केल्या नंतर फार दिवस झालें नाहींत तोंच तुह्मी मजबरोबर दगाबाजीचें वर्तन सुरू करून तुह्मांस ता० १२-११-१२ इ. रोजीच खरेदी दिलेले शेत मी यात्रेस जाऊन परत येईन ह्मणजे तुह्मी मला पुनः परत करावे अशी आपली कबुली असल्यामुळें भरणा वगैरे न घेतां पोकळ खरेदी दिलें होतें तें हल्लीं मी यात्रेवरून आल्यापासून तुह्मांस परत मागत असतां तुह्मी देत नाहीं. व ते पचवून बसण्याचा तुमचा इरादा दिसतो यामुळें माझें मनांत तुमचे विषयीं जी वात्सल्यबुद्धी होती ती नष्ट झाली सबब मी तुह्मांस मृत्युपत्रावरून माझे मरणानंतर माझे स्थावर जंगम मिळकतीची तुह्मांस मालकी दिली होती. ती आज ही नोटीस देऊन मुद्दाम रद्द करीत आहे. सदहू मृत्युपत्र मी आपले हयातींत रद्द केलें आहे. माझे मरणानंतर तुह्मांस या मृत्युपत्रावरून माझे कोणतेंही मिळकतीवर कांहींच अधिकार राहिला नाहीं. सदहु मृत्युपत्रांतील मिळकत माझे मरणानंतर तुह्मांला न मिळतां माझा जो कोणी योग्य वारस असेल त्यास मिळेल. या मिळकतीवर तुमचा आतां कोणतेही प्रकारचा हक्क राहीला नाहीं.

[illegible]

…त
…हु
…लें
…त्यु-
…डाजी
…ही
… इ०
…पिटीश-

… बागवान
…ुगळ नि०
…ांगठा असे

…त वा। रावजी
…कुणबी रा० पाथर्डी

यांसः—

…गारी कडून नोटीस
… माझे लग्नाचे नवरे
…सुमारें १९ वर्षे झालीं.
… तुमचे घरीं १
…पुढें तुह्मास वेड लाग-

त्यानें तुह्मी मारहाण पुष्कळ केली. व शेवटी मला घरांतून हाकून दिले. अद्याप तुह्माला वेड आहेच तुमचे येथून मी माझे आईबापाचें घरीं आले त्यास ही आज २ वर्षे होतात. तरी आपणांस कळविते कीं सदर २ वर्षांत झालेला अन्नवस्त्राचा खर्च (सावकाराला द्यावयाचें) सुमारें १२९ रुपये ही नोटीस पावल्यापासून ८ दिवसांत देऊन जर तुमचें वेड बरें झालें असेल तर मला घेऊन जावे. नाहींपेक्षां हीच फारकती समजून दुसरा घरठाव करीन मग तुमचा नवरेपणाचा हक्क राहणार नाहीं व खर्चाबद्दल फिर्याद करून वरील पैसे वसूल केले जातील कळावें ता० १७ जुलई १९१३ इ.

सही

सहीची निशानी आंगठा गंगा मर्द गणपत कुणबी रा० वैराट

नो० नं० २१

## नोटीस

चिरंजीव मंगळचंद धनराज मारवाडी रा. मौजे खानापूर ता० बाळापूर

यांसः—

नोटीस खालीं सही करणार देतो कीं मी तुला दत्तक पुत्र घेण्याचे उद्देशानें मजवळ गेल्या सन १९११ चे मे महिन्यांत आणून ठेविले व माझ्या मर्जीप्रमाणें तूं वागल्यास मी तुला माझा दत्तकपुत्र ह्मणून घेईन व माझे मागें माझी सर्व इस्टेट तुझी होईल असें ठरविले. परंतु आपल्या झालेल्या ठरावाचा एक लेखी मसुदा असावा असा तूं फार आग्रह धरून एक करारनामा ता० १३-९-११ रोजीं करविला व त्यावर मी सही करून माझे मर्जीप्रमाणें न वागल्यास मी दत्तक घेण्याचें रहित करीन असेही पुढें लिहून ठेविलें. व तो करारनामा रजिष्टर करून तूं माझे पसंतीस येईपर्यंत व नंतर दत्तविधान होईपर्यंत तो करारनामा माझेच जवळ ठेवावा असे ठरल्यामुळें तो माझे जवळच पडलेला आहे. त्याच तारखेस ह्मणजे ता० १३।९।११ रोजीं तुह्मी मजला एक करारनामा करून दिला. व माझे मर्जीप्रमाणें वागण्याचे कबूल केले परंतु आतां असे आढळून आले आहे कीं तुह्मी माझे पश्चांत माझे पैशाची फार अफरातफर करता व माझी रक्कम घेऊन आपल्या वडील भावाचे घरीं जाऊन बसला. तुह्मी माझे जवळ राहून मजला ह्यातारपणी कोणतेंही सुख देत नाहीं. सबब तुह्मांस या नोटीशीनें कळवितों कीं तुह्मांस दत्तक घेण्याचा बेत मी रहित केला आहे. व तुह्मी यांपुढें माझे घरीं येऊं नये. माझा तुमचेवर कोणत्याही तऱ्हेचा हक्क राहीला नाहीं व तुमचा ही माझेवर नाहीं. कळावें ता० १६-७-१२ इ. मु० आकोला.

सही (मारवाडींत)

महादुलाल रुपचंद मारवाडी रा० खानापूर द० खु०

नो. नं. २२

## जाहिर नोटीस.

सर्व लोकांस खाली सही करणार यांज कडून जाहीर करण्यांत येते की माझा भाऊ नामें शंकर वा। जानजी चांभार रा. भोनगांव हा अज्ञानपणामुळें जिनगीची अफरातफर करण्याचे इराद्यानें लोकां जवळून कर्ज वगैरे काढून पैसा फाल्तु उधळीत आहे तरी या पुढें जो कोणी त्याच्याशी घेण्याचा व देण्याचा व्यवहार करील त्याच्या या आमचे जिनगीशी किंवा आह्मा स्वतःशीं कांहीं संबंध न राहतां त्याचा तो जबाबदार राहील व यापुढें त्याच्याशी कोणीही असेप्रकारचा व्यवहार करूनये कळावे. त.मजकुर.

सहा.

संपत्या वा। जाणुजी चांभार

नो. नं.२३ याचा नी. असे.


सर्वोत्तम रक्तशुद्धि करणारा



डॉ० वामन गोपाळ यांचा

आयोडाईज्ड सार्सापरिला.



हा सार्सापरिला हजारों लोकांनीं पन्नास वर्षें अनुभवून उत्तम रक्तशुद्धि करणारा आहे असें ठरविलें आहे. ह्या औषधानें रक्तशुद्धिवर गुण वाटून इतर रक्तशुद्धि करणाऱ्या औषधांत "सर्वोत्तम" अशी ख्याति मिळविली आहे जुना संधिवात, त्वचे संबंधीं रोग अशक्तता यांवर हें रामबाण औषध असून त्याचा सर्व जगभर फार वाखाणणी होत आहे. गुणकारी शक्ति देणारें औषध आहे याच्या दररोजच्या सेवनानें मन आणि शरीर यांस उल्हास वाटतो. किंमत एका बाटलीस सव्वा रुपया शिवाय टपाल खर्च.

औषध मिळण्याचें ठिकाणः-- डॉ. गौतमराव केशव

नो० नं० २४ ५६३ ठाकूरद्वार मुंबई.

Oriental Government security

LIFE ASSURANCE COMPANY

Limited

ESTABLISHED IN 1874.

R. Paterson, Brown, Manager,

HEAD OFFICE—BOMBAY

FUNDSExceed 4 crores

CLAIMS PAID FOR OVER 3 CRORES

IMMEDIATE SETTLEMENT OF CLAIMS

If there be one thing of more importance than another in connection with Life Assurance, it is when claims arise, that the amount due under the policy be paid to the Claimants at the earliest possible date. This the Directors of the 'Oriental' keep well before them and act up to, treating their clients with the utmost liberality.

UNQUESTIONABLE SECURITY.

It is not sufficient to read that a Company's funds amount to a given sum, but it is essential to know how such Funds are invested:—if in miscellaneous and risky investments or how secured.

The Funds of the 'Oriental' are invested in Government Securitie and lodged with the Government Official Trustee of Bombay in terme of the Company's Trust Deed, as Security for Claims arising through deceasr of assured lives, and endowment policies matured.

Government Officers, Professional men, Tradesmen and others by employing portion of their annual income or profits in effecting life policies, at once create a fund equivalent to the savings of many years.

No man can be sure how long he will live. and although he may save money yet, if he dies early before he had time to save much, his wife and family may be in distress. Life Assurance is a means by which this danger is got over. Life being so uncertain, the sooner a man makes up his mind to assure his life the better. Once satisfied of the propriety of the step, do not delay. There are numerous instances in the records of the Oriental' where the delay of a month or less, has left the family without the intended provision.

INFLUENTIAL AND ENERGETIC AGENTS WANTED. For terms please apply to the undersigned.

Prospectuses, forms and any further information can be obtained on application to

M. DESOUZA,

CHIEF AGENT, Nagpur

CHIEF AGENCY FOR C. P., BERAR & KHANDESH No. No 25


हें पत्र आकोला येथें कैलासवासी खंडेराव बाळाजी फडके यांच्या वऱ्हाडसमाचार छापखान्यांत नारायण खंडेराव फडके यांनीं सदाशिवआश्रमांत छापून प्रसिद्ध केलें.

## नोटीस

विद्यमान मुनसफ सा० कोर्ट मलकापुर.
दि० मु० नंबर ४२८
१२

१ गणेशलाल हीरालाल कलाल रा० वसाडी बु॥ २ नामदारखा वा॥ अकबरखा मुसलमान रा० वसाडी बु॥० ३ गणुसा वा॥ रामजीसा रंगारी रा० वसाडी बु॥

विरुद्ध

१ नीबाजी वा॥ आंबुजी माळी रा० मौजे वसाडी बु॥ २ तुकाराम वा॥ बापु पाटील रा० वडाळी ता० मलकापुर ३ राजमहमद वा॥ महमदयासीन मयत वारीस मुलें १. पयारमद २ याकुबमहमद ३ मुनफ पैकीं मुनफ अ० पा० क० माऊ पयारमद रा० कोळब तालुके मलकापुर

दावा रुपये

वसाडी बुजरुख येथील सेत सर्वे नंबर ५६ हा वसाडी येथील लोकांचे समाईक मालकीचा असून गावचराई करितां आहे असें ठरवून घेण्याकरितां व सदर्हू सेताचा ताबा मिळण्याकरितां दावा.

१ वरील वादी नंबर १ ते ४ रा० वसाडी बुजरुख ता० मलकापुर ह्यांनीं वरील नंबरचा मुकदमा प्रतिवादी १ ते ५ याजवर केला असून सदर्हू दाव्यांत वसाडी येथील सेत सर्वे नंबर ५६ हा वसाडी येथील लोकांचे समाइक मालकीचा असुन गांवचराई करितां आहे. असें ठरवून घेण्याबद्दल व सदर्हू सेताचा ताबा मिळण्याबद्दल वादी नंबर १ ते ४ ह्यांनीं दावा आणिला आहे.

२ सदर्हू दावा वादी १ ते ४ ह्यांनीं वसाडी येथील रहीवाशातर्फे आणिला असून सी० प्रो० आ० १ रुल ८ प्रमाणें. रहीवाशातर्फे चालविण्याची परवानगी मागितली आहे तर वसाडी बुजरुख येथील सर्व रहीवाशांस कळविण्यांत येतें कीं सदर्हू दाव्याची तारीख २७।८।१३ इ० ची नेमकी असून ज्या कोणांस हरकत वगैरे करावयाची असेल त्यांनीं वरील तारखेस आमचे कोर्टांत येऊन दाखल करावें आज तारीख १८ माहे जुलै सन १९१३ इ० रोजीं आमच्या सहीनिशी व कोर्टाचे शिक्यानिशी दिली.

G. K. Agarwala
मुनसफ मलकापुर
पश्चिम वऱ्हाड

नो० नं० २७

---

## नोटीस

नोटीस बेशमी गोविंदा वा॥ नारायण दांदडे रा. कुटासे ता० आकोट

यांस:—

खालीं सही करणाराकडून नोटीस देण्यांत येते कीं मी तुमची लग्नाची बायको आहे. लग्न होण्यास सुमारें १२ वर्षे झालीं. शहाणी होऊन सुमारें ३ वर्षे झालीं. तुह्मी संसारास अयोग्य ह्मणून माझी खात्री झाली. असे असतां मी आजपर्यंत कांहीं दिवस तुमचे घरीं राहिले. मध्यंतरी आपण फारकती देतो असें माझे बापास कबूल केले असून अद्याप फारकती देत नाहीं. तरी या नोटीसीनें कळवितें कीं ही नोटीस पावल्यापासून ८ दिवसांत माझे फारकतीचा निकाल करावा तसें न केल्यास मग मी जनरीतीप्रमाणें आपली हीच फारकती समजून दुसरा घरठाव करीन. मग तुमचा नवरेपणाचा हक्क राहणार नाहीं. तुह्मी संसाराचे योग्य आहां अशाबद्दल पंचाचे समोर खात्री करून द्यावी मग मी नांदण्यास तयार आहे. मी माझे जन्माचे नुकसान करूं इच्छित नाहीं. कळावें ता० २३ माहे जुलई सन १९१३ इ.

सही
जानकी मर्द गोविंदा दांदडे
रा० देवरी इचे हातचा आंगठा

नो. नं. २८ असे

---

## जग जाहिर नोटीस.

परमपूज्य नन्हापा कोंडापा लिंगायत वाणी गंजवे रा. मौजे चिंचांबभर प्र. रिसोड ता. वाशीम जि. आकोला. यांस खाली सही करणार इज कडून जाहिर नोटीस करण्यांत येते कीं अजमासे १२ वर्षांवर दिवस होऊन गेले. तुह्मी लिंगापा खंडापा चिंचांबेकर याची बायको काढून देशांतरावर निघून गेले, त्या दिवसापासून तुमचें पत्र नाहीं निरोप नाहीं व तुह्मी कोठें आहा हेंहि समजत नाहीं. ज्या अर्थीं मी तुमची लग्नाची बायको आहे. त्याअर्थीं तुमचे शोधाची मजला जरूरी आहे. तुह्मी सदर्हू रांडेचे नादीं लागून मजला सोडून गेला. आज पर्यंत मी बापाचे तर्फें लोकांचे सहाशे रुपये कर्ज काढून खाल्ले आहेत. आतां मजला कोणी कर्जहि देत नाहीं. करितां ही जाहिर नोटीस तुह्मांस केली आहे. तरी सदर्हू नोटीस वर्तमान पत्रांतून प्रसिद्ध होईल. त्या तारखेपासून एक महिन्याचे आंत तुह्मी येऊन लोकांचे कर्ज देऊन टाकावे. तसेंच जात पंचानें तुह्मास जातीत दुरावले आहे. त्याचाही निकाल करून मजला घेऊन जावें. वास्तविक पाहिले असतां ज्या अर्थी बारा वर्षांपासून तुमचा मुळीच पत्ता नाहीं त्या अर्थी तुमचा मजवर कोणत्याही प्रकारचा मुळींच हक्क राहीला नाहीं. परंतु दोन्ही कुळांचा अभिमान राखण्याकरितां ही नोटीस तुह्मांस केली आहे. तरी वर लिहिलेल्या प्रमाणें मुदतींत तुमचे कडून घडून न आल्यास हीच फारकत समजून मी दुसरा घरठाव करीन. मग तुमचा माझेवर कोणतेही प्रकारचा हक्क चालणार नाहीं. या नोटीसीचा खर्च तुमचेवर आहे. कळावे. तारीख १४।७।१९-१३ इ.

सही.
सेवंती वा॥ यादव वानी राहणार
रिसोड निशानी बांगडी.

नो. नं २९